साप्ताहिक

# माणूस



चित्रवार्ता
पुस्तक पुरवणीसह

शनिवार • २१ जून १९७५
एक रुपया





अलाहबाद
अहमदाबाद
आणि
विरोधक





# गरिबी हटाव





अपयशापेक्षा यश, पराभवापेक्षा विजय पचवायला अधिक कठीण असतो असे म्हणतात.

विरोधी पक्षांच्या बाबतीत हा अनुभव फार यत आहे.

गुजराथमध्ये कांग्रेस व विरोधक तसे तुल्यबल आहेत: निर्णायक पराभव तसा फक्त चिमणभाईंचाच म्हणता येईल. जनता आघाडी इंदिरा काँग्रेसपेक्षा फार आघाडीवर आहे असे नाही. अब्रू बचावली, अस्तित्व टिकून राहिले, पुढच्या प्रयत्नांना थोडा आधार लाभला, ढासळत चालला होता तो आत्मविश्वास सावरला गेला, यापेक्षा जनता आघाडीच्या विजयाला फारसा मोठा अर्थ नाही. हा लहानसा विजय नम्रतेने, जबाबदारीने स्वीकारून, बिहारसाठी, पुढील सार्वत्रिक निवडणुकांसाठी दमदार पायरोवा करण्याऐवजी विरोधक किती एकदम गगनाला गवसणी घातल्यासारखे बोलत आहेत ? काही तर अगदी बरळतच आहेत.

अलाहबादचा इंदिरा गांधींचा पराभवही तसा फार मोठा नाही. निदान सुप्रीम कोर्टाचा, निवडणूकमंडळाचा निर्णय होईपर्यंत तरी नाही. हे अंतिम निर्णय बाहेर पडायच्या आतच विरोधकांनी इंदिरा राजिनाम्यासाठी किती एकदम हाकाटी चालवली आहे ?

कोणी म्हणाले : काँग्रेसजनांनी इंदिरा गांधींविरुद्ध आता 'बंड' करावे.

आणखी कोणी म्हणाले : इंदिरा गांधींनी एक दिवससुद्धा यापुढे सत्तेवर राहणे 'लांछनास्पद' आहे.

मोठमोठे शब्द वापरून-वापरून विरोधक त्यातील सगळी ताकदच घालवून टाकीत आहेत.

ही वेळ खरी तर अगदी शांत राहायची. गजबजलेल्या, रहदारीच्या रस्त्यावर एकदम काही वेळ नि:शब्द शांतता पाळून परिणाम साधावा, तशा प्रकारचा कार्यक्रम योजण्याची. 'देशातील सर्वश्रेष्ठ सत्ताधारी व्यक्ती आज कलंकित ठरलेली आहे. आम्ही दु:खी आहोत. शरमेने आमची मान आज खाली जात आहे...' बस्स. यापेक्षा निषेधाचा स्वर जराही वर न चढवण्याची. फार तर न्यायमूर्ती सिन्हांच्या नि:स्पृह, रामशास्त्री बाण्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून स्वस्थ राहण्याची. काही काही वेळा मौनच अधिक प्रभावी ठरत असते. तो अनुभव या वेळी घेऊन पाहायचा. त्याऐवजी आजवर शेकडो वेळा केली गलेली राजिनाम्याची मागणी पुन्हा एकदा तारस्वरात करून विरोधकांनी काय साधले ? अगोदरच या मागणीतला सगळा गंभीरपणा वरचेवर ती केली गेल्यामुळे अगदी नाहीसा झालेला आहे. बाई पुन्हा बोलायला मोकळ्या... 'पहा, विरोधकांना दुसरेतिसरे काहीही नको आहे. त्यांना फक्त मला घालवायचे आहे. मला मात्र गरिबी हटवायची आहे; देश बलवान-समृद्ध करायचा आहे. विरोधक आड यतात. त्यांनी मला विसरून काम करावे. तर त्यांनाही यश मिळेल...'

बाईंच्या म्हणण्यात खोल, राजकीय अर्थ आहे हे विरोधकांनी अजूनही ध्यानात घेतलेले दिसत नाही.

इंदिरा गांधी सत्ताबाज, भ्रष्ट राजकारणी आहेत हे सांगून सांगून विरोधकांची सत्तापिपासा, भ्रष्टता लपून राहणार आहे का ?

इंदिरा लाट ओसरली म्हणजे विरोधकांची लाट उंचावली असे होते का ?

विरोधकांची लाट तेव्हाच उंचावेल जेव्हा विरोधाला काही तात्त्विक अधिष्ठान लाभेल, विरोधकांच्या सेवाभावाची, लोककल्याणप्रवृत्तीची लोकांना रोकडी प्रचीती येऊ लागेल. नाही तर इंदिरा लाट जाईल, दुसरी कुठली तरी येईल. विरोधकांच्या नाकातोंडात पुन्हा पाणी ते पाणीच.

आणि इंदिरा आज–आत्ताच जाण्या न जाण्याने काय फरक पडतो आहे ?

ही झोपडपट्टी वाढायची थांबणार आहे ?

हे फुटपाथ रिकामे आणि स्वच्छ राहणार आहेत ?

हे भिकेसाठी पसरले जाणारे हात उद्योगात गुंतणार आहेत ?

हे दारिद्र्य, ही विषमता, ही कुरूपता.........

इंदिरा गांधी ही वस्तुस्थिती बदलू शकत नाहीत. त्यांचे वॉटर्लू या आर्थिक आघाडीवर आहे. या वॉटर्लूवर त्यांच्याशी खरा मुकाबला केला पाहिजे. विरोधकांनी ही हिंमत बाळगावी. त्यासाठी शक्ती साठवावी. इंदिरेला विसरून काम करावे. इंदिरा–भगाओ सारखे पोरकट कार्यक्रम हाती घेऊन अहमदाबाद–अलाहाबाद येथे मिळालेल्या लहानग्या विजयांची सांडलवण करून टाकू नये......

■




सत्पाल आला, सत्पालला पाहिले आणि सर्वजण धूम पळाले. रुस्तम - ए - हिंद स्पर्धेची ही शोकांतिका.

भारतीय कुस्तीवर पडलेले असे हे दुर्दैवी सावट दूर होण्याचे कुठलेच चिन्ह या स्पर्धेत दिसून आले नाही.



गणपत खेडकर / सुखचैन
गणपतला या लढतीत विजयी होणे सहज जमले असते - जरा हुशारीने खेळला असता तर!

हिरामण बनकरचे यशही असेच - अंगचुकार खेळाबद्दल हिरामणला दोनदा ताकीद देण्यात आली तर प्रतिस्पर्धी पंजाबच्या पीशोरासिंगला तीनदा - आणि एवढ्या फरकावर हिरामण विजयी ठरला.



हरबन्स (सेनादल) / दिवाण (हरियाना)
'सुपर हेवी' गटात फक्त हेच दोन मल्ल उतरले. आणि दोघांनाही अंगचोर खेळाबद्दल एकाचवेळी बाद करण्यात आले. बाक्षिस समारंभाच्या वेळी नांवे पुकारण्याआधीच हे दोन्ही मल्ल 'व्हिक्टरी स्टँड' जवळ हजर राहिले. आणि बऱ्याच विचारविनिमयानंतर यांना संयुक्त विजेते ठरविण्यात आले. पदकेही देण्यात आली - हट्ट करणाऱ्या मुलांना खाऊ देतात तशी!



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २१ जून | अंक : तिसरा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# महाराष्ट्रातील मल्लांच्या अपयशाविषयी थोडेसे–

मुकुंद मणूरकर

जरासंधाच्या हाडापासून बनविलेले फासे भीमाचा नुसता आवाज ऐकला की थरारून हेलपाटत जात अशी महाभारतात आख्यायिका आहे. यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी किमान आशय लागू पडेल अशी परिस्थिती सध्या भारतीय कुस्तीत निर्माण झालीय.

सत्पाल नावाच्या पंचविशीतील दिल्लीकर मल्लाने ही किमया केली आहे. विशेष म्हणजे सत्पालच्या पदरी काही भव्य परंपरा वगैरे आहे अशातला काही भाग नाही, तर केवळ एका स्पर्धेतील त्याचा पराक्रमच ही किमया साधू शकला! महिन्यापूर्वी कोल्हापूरला झालेल्या रुस्तुम-ए-भारत स्पर्धेत सत्पालने तथाकथित नामवंत मल्लांची प्रचंड दाणादाण आणि त्याबरोबर झोपही उडवली. अंतिम फेरीत दादू चौगुलेचा पाय धरून त्याला खसाखसा ओढले तर दादूपेक्षाही ताकदीत भारी असलेल्या लक्ष्मण वडारला दोन्ही हातांनी वर उचलले. शांत चेहऱ्याच्या व लाल मातीबाहेर गरीबपणाने वावरणाऱ्या सत्पालचा मग महाराष्ट्रातील कुस्तीशी एकवटलेल्या करवीरनगरीने प्रचंड धसका घेतला.

आणि हा धसका कसा आणि किती प्रमाणात होता याची प्रचीती फक्त महिन्याभरातच पाहायला मिळाली.

पुण्यात पंचविसावी राष्ट्रीय अजिंक्यपदाची व त्यालाच जोडून रुस्तुम-ए-हिंद किताबासाठी कुस्तीस्पर्धा होती. सत्पाल अर्थातच यात उतरणार होताच. आणि हे माहीत असल्यामुळे महाराष्ट्रातील नामवंत मल्लांनी एकदम दडी घेतली–लहान पोराचाही विश्वास बसणार नाही अशी फालतू कारणे सांगून!

अर्थात ही परिस्थिती फक्त महाराष्ट्रातच आहे असं नाही. भारतातील कुठलाच पैलवान आजघटकेला सत्पालशी लढायला तयार नाही. परवा पुण्यात जमलेल्या शंभर-सव्वाशे मल्लांपैकी एकही हरीचा लाल सत्पालशी लढायला तयार नव्हता. कुस्ती न होताच सत्पालला किताब देणे हा स्पर्धेचा फार मोठा अपूर्ण शेवट ठरणार होता म्हणून की काय संघटकांनी एकाला अक्षरशः पाया पडून सत्पालशी लढायला उभं केलं. हरियानाचा दिवाणसिंग हा तो मल्ल.

प्रत्यक्ष कुस्तीच्या वेळची परिस्थिती काय वर्णावी? सत्पाल मोठ्या रुबाबात आखाड्यात उतरला आणि मग सिंहाच्या पिंजऱ्यात एखाद्या माणसाला बळेबळे ढकलल्यावर त्याच्या चेहऱ्यावर जे भाव दिसतील ते भाव धारण करून दिवाणसिंगने प्रवेश केला. क्षणार्धात सत्पालने पट काढून दिवाणला खालती घेतले न घेतले तोच हात दुखावल्याचे निमित्त करून दिवाणने पळ काढला आणि सत्पाल 'रुस्तुम-ए-हिंद' झाला.

आता इतर पैलवानांचं एक वेळ जाऊ द्या, पण ज्या महाराष्ट्रात ही कुस्त्यांची दंगल झाली त्या महाराष्ट्रातील एकही पैलवान सत्पालशी लढायला सरसावला नाही! कुठे गेली ती महाराष्ट्राची आणि कोल्हापूरची कुस्तीतील भव्य परंपरा? याच्यापूर्वी कोल्हापूरकर मल्लांवर आघात करणारे प्रसंग काही कमी घडलेत काय? गामा, कल्लू, भोला बंधू, सादिक यांच्या आव्हानातील दर्पोक्ती निपटून काढण्याचा पराक्रम कोल्हापूरने केला होताच ना? मग आता खंचनाळे, माने, आंदळकर यांच्यापेक्षाही सवाई ठरविल्या गेलेल्या त्यांच्या शिष्योत्तमांनी अशा शेपट्या का घालाव्यात?

ही घबराट उडवून द्यायला सत्पालचा पराक्रम जसा कारणीभूत आहे तसाच आमच्याच काही मंडळींचा अतिउत्साहीपणाही जबाबदार आहे. या मंडळीत काही पत्रकार आघाडीवर आहेत. आता हे खरं की सुयोग्य प्रसिद्धी दिल्यास खेळाडूचा आत्मविश्वास दुणावतो. पण हीच प्रसिद्धी जर विकृत, फसवी आणि भडक प्रमाणात दिल्यास मात्र उलटा परिणाम होतो.

महाराष्ट्रीयन मल्लांबाबत नेमके हेच झाले.

कोल्हापूरला झालेल्या रुस्तुम-ए-भारत स्पर्धेच्या वेळी एका दैनिकाने 'आता रुस्तुम-ए-भारत कोल्हापूरकडेच' अशा तऱ्हेचा जाड मथळा पुढचा-मागचा विचार न करताच दिला. सुरुवातीपासून कोल्हापूरकरांचे अवास्तव कौतुक त्यांनी सुरू केले होते. नंतर आलेले अपयश जास्तच नामुष्कीचे ठरले ते यामुळेच. या साध्यासाध्या गोष्टीच आत्मविश्वास नाहीसा करण्यास कारणीभूत ठरतात हे पत्रकार-मित्रांनी ध्यानात ठेवावे.

परवा पुण्यातही तसेच झाले. पहिल्या दिवशी सत्पालबरोबर महाराष्ट्राच्या अप्पा कदमची कुस्ती होती. 'आजची प्रमुख लढत' 'आकर्षक लढत' वगैरे लिहून अप्पा कदमबद्दल भलत्याच अपेक्षा निर्माण करण्यात आल्या. प्रत्यक्ष कुस्तीत सत्पालने अप्पा कदमचा


छायाचित्रे : मोहन नावेलकर कुस्ती छायाचित्रे : सुनिल राडकर मुखपृष्ठ : सुनिल कुरणे

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०। दूरध्वनी ४३४५९

झटक्यात फडशा पाडला. पण दुसऱ्या दिवशी पेपरात चार कॉलमी हेडलाइन–'कुस्ती जिंकली सत्पालने, पण मने मात्र अप्पा कदमने!'–काय म्हणायचं याला? वरील मथळा वाचून अप्पा कदमही मनोमन लाजला असेल स्वतःशी! एकदा का असं चढवून ठेवलं की थोडसं अपयशही अप्पाला कुस्तीतून बाहेर काढण्यास कारणीभूत ठरेल.

आणखी एक प्रसंग, सुपर हेवी गटात गणपत खेडकर आणि दिल्लीचा सुखचैन यांची लढत झाली. गुणांवर सुखचैन विजयी झाला आणि फार मोठ्या अपेक्षा निर्माण केला गेलेला गणपत खेडकर बेभान झाला. कुस्ती संपल्यावर सरळ तो पत्रकारांकडे आला आणि आपल्या पराभवाचे खापर त्याने बिनधास्तपणे पंचांवर फोडले. इतपतही ठीक; पण नंतर तो म्हणाला, 'हे असे पंच असतात म्हणूनच कोल्हापूरचे पैलवान इथं येत नाहीत.' आता असे हे पंच ही काय नवीन गोष्ट आहे? यापूर्वी हेच पंच असताना कोल्हापूरचे पैलवान स्पर्धेत उतरलेच होते ना आणि त्यात विजयीही झाले होते ना? पण तेही जाऊ द्या. गणपत खेडकरचे ते वैयक्तिक मत असू शकेल. पण गणपतचे हे विधान हेच कोल्हापूरकरांच्या बहिष्काराचे खरेखुरे कारण आहे अशा अर्थाने दुसऱ्या दिवशी काही वर्तमानपत्रांनी याला प्रसिद्धी दिली. गंमतीची गोष्ट म्हणजे कोल्हापूरकर का आले नाहीत याची 'अधिकृत' कारणे याच वर्तमानपत्रात दोन तीन दिवसांपूर्वी आली होती. कुणाचं लग्नच आहे, तर कुणी जत्रेतील इनामी कुस्त्यांसाठी गेलाय, कुणाच्या तालमींची दुरुस्ती चाललीय म्हणून ते सरावात नाहीत ही ती 'अधिकृत' कारणे! ही कारणे खरी का गणपतने दिलेले कारण खरे? गणपतने आपल्या पराभवाची मखलाशी केली आणि ती जशीच्या तशी छापून गणपतचा पराभव पंचांमुळेच झाला हे सिद्ध करण्याचा वर्तमानपत्रांनी प्रयत्न केला. यात त्यांनी स्वतःला तर फसवलंच, वाचकानांही फसवलं. पण खरा फसला गेला तो गणपत खेडकरच! आणि हे काही ठीक झालं नाही.

अर्थात अपयशाची इतरही अनेक कारणे आहेतच. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रियन मल्लात असलेला योजकतेचा अभाव! हे मल्ल ताकदीत श्रेष्ठ आहेत, कलात्मकताही त्यांना तितकीच अवगत आहे; पण आधुनिक कुस्तीत विजयी होण्याचे नेमके मर्म काय याचा त्यांनी विचारच केला नाही असे वाटते.

गणपत खेडकरचेच उदाहरण घ्या. सुखचैनबरोबर त्याची लढत होती. आता सुखचैनपेक्षा गणपत ताकदीने किती तरी भारी. पहिल्या फेरीत सुखचैनने केलेले अनेक डाव गणपतने केवळ ताकदीच्या जोरावर मोडून काढले. पहिल्या फेरीतच सुखचैन दमलेला दिसला. पण तो स्वतःच्या मर्यादा पूर्णपणे जाणून होता. गणपतला चितपट करणे आपल्याला जमणार नाही हे त्याला माहीत होते. त्यामुळे काही गुण पदरात पाडून घेणे हेच ध्येय त्याने ठेवले होते. त्याबरोबरच स्वतः अंगचोर खेळाचा अवलंब करून गणपतलाही तसे करण्यास भाग पाडणे, डोक्याने ढुशा देऊन गणपतला चिडविणे व परिणामी त्याला नियमबाह्य वर्तन करण्यास भाग पाडणे अशा चालीही तो खेळला. त्याच्या गुणांचे पारडे त्यामुळेच जड होत गेले. गणपत मात्र ही कुस्ती चितपटच मारायची अशा आविर्भावात खेळत होता. प्रतिस्पर्ध्याला गुण मिळताहेत इकडे त्याचे लक्षच नव्हते. पंचांनी झुकतं माप सुखचैनला दिलं असेलही, पण चितपट कुस्तीचे वेड डोक्यातून काढून गणपत लढला असता तर नक्कीच सुवर्णपदकाचा मानकरी ठरता!

महाराष्ट्राच्या रामकृपालचे काय झाले? सहा बॅड पॉइंट मिळाल्यामुळे तो तिसऱ्या स्थानावर होता. पहिल्या व दुसऱ्या स्थानासाठी सेनादल व हरियाना यांच्या मल्लात कुस्ती चालू होती. पण दोघांनीही तिन्ही डावात अंगचोर खेळ केल्यामुळे पंचांनी त्यांना तीन वेळा ताकीद देऊन बाद केले. परिणामी त्यांच्या बॅड पॉइंट्सची संख्या रामकृपालपेक्षा अधिक झाली आणि स्वप्नातही नसलेले सुवर्णपदक रामकृपालच्या गळ्यात पडले. महाराष्ट्राला गादीवरील कुस्त्यात मिळालेले हे एकुलते एक सुवर्णपदक!

नामवंत मल्लांच्या अनुपस्थितीमुळे महाराष्ट्राचा संघ कमजोर होताच; पण आहे या परिस्थितीतही महाराष्ट्राला यापेक्षाही जास्त यश मिळू शकलं असतं. सेनादल व दिल्ली यांनी पदके मिळविण्यासाठी आखाड्याबाहेर काही करामती केल्या असतीलही; पण आखाड्यात केलेल्या करामती नक्कीच कौतुकास्पद होत्या. ठराविक तीन-चार मल्लांना खेळवूनही सेनादलाने सर्वसाधारण अजिंक्यपद मिळविले ते यामुळेच!

असो. आता बाळासाहेब लांडग्यांसाठी दोन शब्द. बाळासाहेब, आपण महाराष्ट्राचे कोच आहात. भारतीय संघाचे कोच म्हणूनही आपण ऑलिंपिकला गेला होताच. कुठल्याही गोष्टीचे अलिप्तपणे परीक्षण करणे आपणास जमते. आपले दोष लपवून न ठेवता ते उघड करून त्यावर परखडपणे विचारही आपण करता. आता एकच करा. गर्भगळित झालेल्या अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करण्याची जशी कृष्णाने कामगिरी केली तसे काही तरी करा. लपून बसलेल्या महाराष्ट्रियन मल्लांना बाहेर खेचा. तेही जमले नाही तर आपले वजन खर्चून या मल्लांवर कारवाई करण्यास भाग पाडा.

कारण सत्पालचे यश त्याच्या दृष्टीने कौतुकास्पद असले तरी ते त्याला ज्या तऱ्हेने मिळाले ती भारतीय कुस्तीची शोकांतिका ठरू शकेल! □□

[ कुस्ती : आणखी काही छायाचित्रे पृष्ठ ४०.वर ]

# पुन्हा एकदा अक्कलकुव्याचे 'पट' प्रकरण

**श. द. कुलकर्णी**

अक्कलकुव्याच्या पटनिवारण आंदोलनाची पार्श्वभूमी सांगणारा डॉ. वसुधा धामणकर यांचा एक लेख माणूस ३१ मे अंकात प्रसिद्ध झाला. या लेखाची नोंद घेऊन म. टाइम्सने या विषयावर एक अग्रलेख लिहिला. आता काही राजकीय पक्षांचे लक्षही या विषयाकडे वळाले आहे व हा प्रश्न लौकर निकालात निघाला नाही तर आंदोलन अधिक उग्र होण्याचीही शक्यता आहे. पुण्याच्या ग्रामायन संस्थेद्वारा प्रा. शरद कुलकर्णी हे या आंदोलनाशी व मूळ प्रश्नाशी अगदी प्रथमपासून संपर्क ठेवून आहेत व या प्रश्नाच्या कायदेशीर बाजूचा बराच तपशील त्यांनी आतापावेतो त्या भागात वरचेवर जाऊन गोळा केलेला आहे. आदिवासी आणि कायदा हे प्रा. कुलकर्णी यांच्या अभ्यासाचे विशेष प्रेम आहे व नुकत्याच झालेल्या आदिवासी जमिनींच्या हस्तांतराबाबतच्या कायद्यासंबंधीची त्यांची पुस्तिका 'ग्रामायन' ने प्रसिद्धही केली आहे. ठिकठिकाणी चालू असलेल्या आदिवासी क्षेत्रातील विकासकार्याला या पुस्तिकेचा खूप उपयोग होतो असा अनुभव आहे.

अक्कलकुव्याच्या पटनिवारक आंदोलनासंबंधी अधिक खोलात जाऊन विचार करणाऱ्यांना प्रा. कुलकर्णी यांचा हा लेख उपयुक्त ठरू शकेल.

---

महाराष्ट्र सरकारने अक्कलकुवा तालुक्यात नेमलेल्या खास टेनन्सी मामलेदारांनी सुमारे १०,००० शेतकऱ्यांना धडाधड नोटिसा देणे सुरू केले आहे. ज्या जमिनी ते मालक म्हणून अनेक शतके कसत होते त्यांची मालकी शेतकऱ्यांनी पुन्हा मिळवावी म्हणून त्यांनी पैसे भरण्यासाठी या नोटिसा दिल्या जात आहेत. या शेतकऱ्यांपैकी सुमारे ९० टक्के आदिवासी आहेत. हे सर्वच प्रकरण सरकारची आदिवासी-विषयींची अनास्था स्पष्ट करते. या प्रकरणाचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देण्याची हमी दिली आहे. तसेच सरकारने दुबळ्या समाजघटकांची विशेषत: वर्गीकृत जाती व जमाती यांची खास काळजी घेऊन त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक हिताचे रक्षण करावे व त्यांचा सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून संरक्षण करावे असे मार्गदर्शक तत्त्व नमूद केले आहे, (कलम ४६). याच राज्यघटनेच्या दुसऱ्या एका कलमाखाली दिलेला एक न्यायालयीन निर्णय आदिवासींच्या शोषणाला कारणीभूत ठरावा हा दुर्विलास आहे. अक्कलकुवा प्रकरणात कायदा व न्याय यासंबंधीचे काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे या प्रकरणाचा अधिक अभ्यास होणे आवश्यक झाले आहे.

अक्कलकुवा तालुका महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात असून तो गुजराथ राज्याला लागून आहे. हा तालुका ६ मेवासी इस्टेटी एकत्र करून १९५० साली बनविण्यात आला. त्यापूर्वीच्या शिरगणती अहवालात मेवासी इस्टेट असा या भागाचा उल्लेख करण्यात आला आहे.

१९४१ साली मेवासी इस्टेटीत २०२ खेड्यांचा समावेश होता व त्यांची लोकसंख्या ४४,१४० असून त्यांपैकी ३७,७९५ व्यक्ती (८५·५३ टक्के) आदिवासी जमातींच्या होत्या. १९५० साली काठी, गव्हाळी, नळ, नवलपूर, चिखली व सिंगपूर इस्टेटी एकत्र करून त्यांचा अक्कलकुवा तालुका बनविण्यात आला. या तालुक्याची वस्ती १९५१ साली ५८,५६१ होती व तालुक्यात १९८ गावांचा समावेश होता. यापैकी काही गावांत मनुष्यवस्ती नव्हती. १९६० साली राज्यपुनर्रचनेत यांपैकी ३७ गावे गुजराथ राज्यात घालण्यात आली. १९६१ सालच्या शिरगणतीप्रमाणे या तालुक्यात १६६ गावे होती. तालुक्याची लोकवस्ती ५६,३५७ होती व त्यापैकी ५१,१३४ (८९·१५ टक्के)आदिवासी जमातीची होती. १९७१ सालच्या शिरगणतीत या तालुक्यात १७३ गावे असल्याची व लोकवस्ती ७८,७०७ असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यांपैकी ६६,४५१ (८४·४३ टक्के) वस्ती आदिवासींची होती. वरील सर्व माहितीवरून या तालुक्यात सुमारे ८५ टक्के वस्ती आदिवासींची आहे हे दिसून येते.

या तालुक्याचा काही भाग सपाटीवर असून बराचसा भाग सातपुड्यातील डोंगरांवर वसलेला आहे. डोंगरावरील जमीन, सपाटीवरील जमिनीच्या मानाने कमी सुपीक आहे. तालुक्यातील जमिनीचा बराचसा भाग जंगलांनी व्यापलेला आहे तर काही भाग मशागतीला योग्य नाही किंवा बिगर शेतकी कामासाठी वापरण्यात आला आहे. तालुक्याचे क्षेत्रफळ ८५,४०२ हेक्टर असून त्यांपैकी सुमारे ५३·३३ टक्के भाग म्हणजे ४७,२५२ हेक्टर जंगलांनी व्यापलेला आहे. सुमारे ४१२६ हेक्टर (४·८३ टक्के) लागवडीस योग्य नाही किंवा बिगर शेतकी कामासाठी वापरण्यात आला आहे. अशा रीतीने तालुक्यातील सुमारे ४० टक्केच जमीन लागवडीस योग्य आहे. त्यातील बरीच डोंगराळ भागात असून कमी सुपीक आहे. तालुक्यातील मुख्य व्यव-

साय शेती असून बहुसंख्य आदिवासी लहान शेतकरी आहेत. या तालुक्यातील बऱ्याच गावांची पाहणी झालेली नाही व जमीन-महसूल पाहणीवरून ठरवण्यात आलेला नाही असे १९६१ च्या जिल्हा शिरगणती अहवालात म्हटले आहे.

या मेवासी राज्यांचा इतिहास बराच मनोरंजक आहे. १८८० साली प्रसिद्ध झालेल्या मुंबई गॅझिटिअरमध्ये मेवासी राज्ये हा एक अर्धवट स्वतंत्र भाग आहे असे म्हटलेले आहे. जुलै १८१८ मध्ये खानदेश ब्रिटिश आधिपत्याखाली आला. परंतु १८२५ पर्यंत व त्यानंतरही यातील भिल्लांची बंडे चालूच राहिली. अखेरीस १८५९ मध्ये या विभागात शांतता प्रस्थापित झाली. या भागात मुख्यत्वेकरून भिल्लांची वस्ती असून ते डांग विभागातील भिल्लांपेक्षा अधिक अशांत प्रवृत्तीचे आहेत. या विभागातील दिवाणी व फौजदारी न्यायव्यवस्था १८४६ सालच्या ११ व्या रेग्युलेशनप्रमाणे चालते. छोट्या केसेस त्या-त्या इस्टेटीतील चीफ चालवतात. तेथे कायम स्वरूपाचे पोलीस नाहीत व इस्टेटमुख्यांच्या दिमतीला असलेले दहा-पंधरा रक्षकच पोलिसांची कामे व इतर कामे करतात वगैरे माहिती या गॅझिटिअरमध्ये देण्यात आलेली आहे.[१]

गॅझिटिअरमधील माहितीप्रमाणे मेवास हा शब्द मेष व वास या दोन संस्कृत शब्दांपासून बनलेला असून याचा अर्थ मेंढ्यांची जागा किंवा लागवडीखाली नसलेला वैराण प्रदेश असा आहे. मात्र बेडन पॉवेल या लेखकाने या शब्दाचा अर्थ त्रासदायक किंवा अशांत प्रदेश आहे असे म्हटले आहे.[२]

मेवासी राज्ये अर्धवट स्वतंत्र ठेवण्याच्या धोरणाचा पाया दक्षिण विभागाचा कमिशनर माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यानेच घातला. त्याने आपल्या गव्हर्नर जनरलला सादर केलेल्या अहवालात मेवास विभागात भागलपूर आणि मिदनापूर या जंगलविभागातल्याप्रमाणेच राज्यव्यवस्था इतर विभागांपेक्षा वेगळी ठेवावी असे लिहिले. त्याच्या मते या जंगलीविभागात जंगली जमातींच्या प्रमुखांकरवीच राज्यकारभार करावा. पेशव्यांनी हेच धोरण ठेवले होते व तेच ब्रिटिश सरकारनेही चालू ठेवावे. कारण बळाच्या जोरावर भिल्लांवर राज्य करण्याचे प्रयत्न असफल ठरले आहेत.[३]

ह्या धोरणाप्रमाणे मुंबई सरकारने १८४६ साली एक रेग्युलेशन करून मेवासी चिफ्टनांच्या गावांना मुंबई राज्यातील कायदे लागू होणार नाहीत असे जाहीर केले. (मेवासी राजांना चिफ्टन असे या रेग्युलेशनमध्ये म्हणण्यात आले आहे. हेच नाव पुढे प्रचारात आले. अक्कलकुव्यात आजही हे राजे चिफ्टन म्हणून ओळखले जातात.) या रेग्युलेशनने मेवासी राज्यांची न्यायव्यवस्था, पोलिसव्यवस्था वगैरे गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी एजंट नेमण्यात येऊन त्यांच्यासाठी सरकारने नियम तयार करावेत असे अधिकार सरकारला दिले.

त्याप्रमाणे मुंबई सरकारने एक नोटिफिकेशन काढून खानदेशच्या कलेक्टरने मेवासी राज्यात पोलिटिकल एजंट म्हणून कशा प्रकारे कारभार पहावा हे जाहीर केले. ( ज्युडिशिअल डिपार्टमेंट नोटिफिकेशन, ता. १३-७-१८६४ )

१८७४ साली भारत सरकारने 'शेड्युलड् डिस्ट्रिक्टस् ॲक्ट' नावाचा कायदा केला. या कायद्याचा मुख्य उद्देश सर्वसाधारण कायद्यांच्या कक्षेत न आलेले किंवा कक्षेतून वगळलेले विभाग निश्चित करणे व या विभागात लागू असलेले कायदे स्पष्ट करणे हा होता. या कायद्यात एक तक्ता ( शेड्युलड् ) देण्यात आला व ह्या तक्त्यात नमूद केलेल्या विभागात चालू असलेले कायदे जाहीर करण्याचा अधिकार इलाख्यांच्या गव्हर्नरांना देण्यात आला. ( भारत कायदा १८७४ चा क्रमांक १४ ) या तक्त्यात सहाही मेवासी राज्यांचा समावेश करण्यात आला होता. त्याप्रमाणे मुंबईच्या गव्हर्नरने आपले १८६४ चे नोटिफिकेशन अंमलात राहील असे जाहीर केले.

त्यानंतर १८७४ पूर्वीप्रमाणेच खानदेशच्या कलेक्टरने नोटिफिकेशनमध्ये दिल्याप्रमाणे मेवासी राज्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे चालू ठेवले. १८७४ नंतर मुंबई इलाख्याच्या कारभारासंबंधी प्रसिद्ध झालेल्या वार्षिक अहवालात मेवासी राज्यांच्या कारभारासंबंधीचे उल्लेख आढळतात.

अशा रीतीने मेवासी राज्यांची अर्धवट स्वतंत्र अशी स्थिती टिकून राहिली. १९३५ सालच्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया कायद्यात सरकारला काही विभाग सर्वसाधारण कायद्यातून पूर्णपणे वगळलेले किंवा अंशतः वगळलेले म्हणून जाहीर करण्याचा अधिकार देण्यात आला. ( कलम ९१ ). या कायद्याने गव्हर्नरला अशा पूर्णपणे किंवा अंशतः वगळलेल्या विभागांसाठी रेग्युलेशन करण्याचा अधिकार देण्यात आला. ( कलम ९२ ). सहा मेवासी चिफ्टनांच्या मालकीच्या खेड्यांचा समावेश अंशतः वगळलेल्या विभागात करण्यात आला. अशा रीतीने ब्रिटिश सरकारने हा विभाग अर्धवट स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला चिफ्टन जमीनसारा वसूल करीत. तसेच सर्व जंगले ह्यांच्या खासगी मालकीची मानली जात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या विभागाचा स्वतंत्र संस्थाने म्हणून विचार करण्यात आला नाही. तसेच एक प्रकारची जहागिरी किंवा वतन म्हणूनही विचार करण्यात आला नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम २४४ व पाचवे शेडयूल यांच्या खाली हा विभाग शेड्यूलड् विभाग म्हणून जाहीर करण्यात आला. ( नोटिफिकेशन सी. ओ. ९ तारीख २६-१-१९५० )

१९४९ मध्ये मुंबई गव्हर्नरने मेवासी विभागाला लागू असणाऱ्या कायद्यांविषयीचे संशय दूर करण्यासाठी 'दी बॉंबे वेस्ट खानदेश मेवासी इस्टेटस् रेग्युलेशन, १९४९' पास केला. या रेग्युलेशनद्वारे ब्रिटिश पार्लमेंट केंद्रीय व प्रांत सरकारचे मुंबई राज्यात लागू असणारे सर्व कायदे मेवासी विभागाला लागू होते व आहेत असे समजण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. या रेग्युलेशनद्वारे 'बॉंबे लँड रेव्हेन्यु कोड' हा कायदा काही दुरुस्त्यासह मेवासी विभागांना लागू करण्यात आला.

या रेग्युलेशनमुळे लागू करण्यात आलेल्या 'बॉंबे लँड रेव्हेन्यु कोड'मुळे मेवासी चिफ्टन हे त्यांच्या विभागातील सर्व जमिनीचे मालक ठरले व तोपर्यंत जमीन कसत असलेले सर्व शेतकरी त्यांची कुळे ठरली. तोपर्यंत चिफ्टन आपल्याला या विभागाचे राजे समजून जमीनमहसूल वसूल करीत असत व सर्व शेतकरी आपण जमीनमालक आहोत असे मानीत असत; परंतु १९४९ च्या रेग्युलेशनने ही नाती संपुष्टात आली. वास्तविक चिफ्टन हे स्वातंत्र्यापूर्वी जवळजवळ मेवासी विभागाचे राजेच आहेत असे मानले जात असे.

१८७३/७४ नंतर प्रसिद्ध झालेल्या मुंबई इलाख्याच्या शासनविषयक अहवालात मेवासी विभागाचा कलेक्टर व पोलिटिकल एजंट यांच्या आधिपत्याखालील विभाग असाच उल्लेख आहे.

या विभागातील काही खेडयांचा १९१० साली सर्व्हे करण्यात आला होता. त्या सर्व्हेच्या नोंदीत देखील शेतकऱ्यांचा जमीनमालक असाच उल्लेख आहे. या सर्व्हेचा अहवाल प्रसिद्ध झालेला नाही; परंतु एका रेग्युलेशनमध्ये अशा प्रकारचा सर्व्हे झाल्याचा उल्लेख आहे. १९५४ च्या रेग्युलेशन क्रमांक २ मध्ये मेवासी विभागात झालेले सर्व्हे लँड रेव्हेन्यु कोडच्या नियमाप्रमाणे झालेले आहेत असे मानण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मेवासी राज्यांचा संस्थाने म्हणून विचार करण्यात आला नाही हे या लेखात याआधी स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे एक प्रकारची जमीन धारणा पद्धती ( टेन्युअर ) म्हणूनही मेवासी विभागांचा विचार महाराष्ट्र सरकारने केला नाही. ( अशा प्रकारचा विचार फक्त गुजराथ सरकारने केला व त्याचा परिणाम काय झाला हे आपण पुढे पाहू. ) मेवासी जमीन धारणा पद्धती या प्रकारची जमीनधारणापद्धती पूर्वीच्या मुंबई इलाख्यात अस्तित्वात होती. बेडन पॉवेल यांनी त्यांच्या लँड सिस्टिमस् इन ब्रिटिश इंडिया या पुस्तकात मेवासी जमीन धारणा पद्धतीचे वर्णन केले आहे. अशान्त काळात काही स्थानिक प्रमुखांनी शेतकऱ्यांना लुटालूट करणाऱ्या पेंढाऱ्यांपासून संरक्षण दिले. या प्रमुखांनी मोठ्या इस्टेटी तयार करून काही गावांवर प्रभुत्व मिळविले. अशा प्रकारची पद्धत अहमदाबाद भागातील परंतीज तालुक्यात चालू असल्याचे त्यांनी लिहिले आहे. ( खण्ड तिसरा, पान २७९ ).

मुंबई सरकाने प्रसिद्ध केलेल्या एका रेकॉर्डमध्येही मेवासी पद्धतीचा उल्लेख आढळतो. कैरा व अहमदाबाद जिल्ह्यात काही खेडी मेवासी खेडी म्हणून ओळखली जात. ही खेडी मेवासी कोळी किंवा राजपूत प्रमुखांच्या मालकीची असत. हे प्रमुख एके काळी मोठे लुटारू असून त्यांचा या भागात मोठा दरारा होता. गुजराथमधील तालुकदारी-प्रमाणेच ही पद्धत होती. ४ मात्र बेडन पॉवेल यांच्या पुस्तकात तसेच वर नमूद केलेल्या सरकारी रेकॉर्डमध्ये खानदेशातील मेवासी विभागांचा उल्लेख नाही. कदाचित हे मेवासी विभाग अर्ध स्वतंत्र राज्ये मानली गेली असल्यामुळे त्यांचा जमीन धारणा पद्धती म्हणून उल्लेख केला गेला नसेल. गुजराथमधील मेवासी पद्धती १९४९ साली नष्ट करण्यात आली व ते करताना मेवासदारांना सरकारने नुकसान-भरपाई दिली. ( १९४९ सालचा मुंबई राज्याचा कायदा क्रमांक ६३ ).

खानदेशातील मेवासी विभाग राज्यातील इतर विभागांसारखेच आहेत असे मानून मुंबई सरकारने १९४९ च्या रेग्युलेशनद्वारे आपले सर्व कायदे त्यांना लागू केले. त्यामुळे कूळकायदा या नावाने ओळखला जाणारा १९४८ सालचा दि बॉम्बे टेनन्सी अँड अ‍ॅग्रिकल्चरल लँडस् अ‍ॅक्ट हा कायदाही या विभागाला लागू झाला. या कायद्यात १९५५ साली क्रांतिकारक दुरुस्त्या करण्यात आल्या व कुळांना जमिनींचे मालक म्हणून घोषित करण्यात आले. १ एप्रिल १९५७ रोजी कुळांनी ते कसत असलेली जमीन विकत घेतली आहे असे समजण्यात येईल असे या कायद्याने जाहीर केले. या जमिनींच्या किंमती कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेत सरकारने नेमलेल्या ट्रायब्यूनलनी निश्चित कराव्यात असे ठरले. मागासलेल्या विभागांसाठी जमिनींच्या किमतींच्या किमान व कमाल मर्यादा ठरविण्याचे अधिकार सरकारला देण्यात आले. ( १९५६ सालच्या १३ व्या क्रमांकाचा कायदा ). त्याप्रमाणे सरकारने ३१ मार्च १९५७ रोजी एक हुकूम काढून कायम कुळांसाठी जमीनधाऱ्याच्या किमान ६ पट व इतर कुळांसाठी कमाल ८० पट अशा मर्यादा जाहीर केल्या.

मात्र त्याच्या अगोदर सरकारने १९५६ मध्ये एक हुकूम काढून चिफटनांची नावे त्यांच्या हद्दीतील जमिनींचे मालक म्हणून रेकॉर्डवर लावावीत असा आदेश दिला. त्याप्रमाणे महसूलअधिकाऱ्यांनी नोंदी केल्या. या हुकुमामुळे पूर्वीचे सर्व जमीनमालक रेकॉर्डवर चिफटनांची कुळे म्हणून ठरली. त्यांना १९५६ च्या कायद्याप्रमाणे चिफटनांना जमीनधाऱ्याच्या काही पट रक्कम भरून ती कायदेशीरपणे आपल्या मालकीची करून घेणे भाग पडले. या काही पट रक्कम भरण्याच्या तरतुदीपासून अक्कलकुव्यात 'पट' प्रकरण सुरू झाले. बहुसंख्य जमीनधारकांनी हा पट भरण्याचे नाकारले. कारण त्यांच्या मते ते कुळे नसून जमिनीचे मालकच होते. त्याशिवाय बहुसंख्य आदिवासी जमीनधारकांना या रकमा भरणे जवळजवळ अशक्य होते.

मेवासी विभागातील सर्व जमीनधारकांना कुळे ठरवून त्यांच्याकडून जमिनीची किंमत वसूल करणे ही गोष्ट अयोग्य आहे. तसेच बहुसंख्य जमीनधारकांना ही रक्कम भरणे अशक्य आहे ही गोष्ट महाराष्ट्र सरकारच्या उशीरा का होईना पण लक्षात आली. त्यामुळे सरकारने १९६१ साली एक नवा रेग्युलेशन केला. या रेग्युलेशनचे शीर्षक 'दी वेस्ट खानदेश मेवासी इस्टेटस् ( प्रोप्रायटरी राइटस् अ‍ॅबॉलिशन एटसेट्रा ) रेग्युलेशन असे होते. रेग्युलेशनने मेवासी चिफटनांचे जमिनीवरील मालकी हक्क रद्द केले व काही प्रकारच्या जमीनधारकांना जमीनमालक म्हणून घोषित केले. तसेच मामलेदाराला अशा प्रकारच्या जमीनधारकांची व कुळांची यादी करावयास सांगितले. या रेग्युलेशनप्रमाणे कुळांनी चिफटनांना जमीनसाऱ्याच्या ३ ते ६ पट रक्कम भरून जमीन आपल्या मालकीची करून घ्यावयाची होती. १९६० साली राज्यपुर्नरचनेनंतर गुजराथ राज्यात गेलेली ३७ गावे सोडून मेवासी भागातील इतर सर्व १७३ गावांना हा रेग्युलेशन लागू पडावयाचा होता. ही सर्व गावे अक्कलकुवा तालुक्यातील होती.

हा रेग्युलेशन १ एप्रिल १९६२ रोजी अंमलात आला. त्यापूर्वी महाराष्ट्र सरकारने एक नोटिफिकेशन काढले व मुंबई कूळकायदा (दुरुस्ती) यातील ३२ ते ३२ आर् ही कलमे मेवासी जमिनींना लागू नाहीत असे जाहीर केले. या कलमात जमीनमालकीसाठी कुळांनी घ्यावयाची किंमत ठरविण्याविषयीच्या तरतुदी होत्या. १९६२ च्या रेग्युलेशनने या बाबतीत निराळ्या तरतुदी केल्या असल्याने कूळकायद्यातील तरतुदी मेवासी विभागाला लागू नाहीत हे जाहीर करणे भाग होते. २४ फेब्रुवारी १९६२ रोजी निघालेल्या नोटिफिकेशनने हे जाहीर केले. या नोटिफिकेशनचा अंमल पूर्वीपासून म्हणजे १ ऑगस्ट १९५६ पासून सुरू झाला असे गृहीत धरावे असे नोटिफिकेशनमध्ये नमूद करण्यात आले.

१९६२ चा रेग्युलेशन व नोटिफिकेशन यांचा उद्देश मेवासी विभागातील जमीनधारकांना शेतसाऱ्याच्या ३ ते ३ पट रक्कम भरून

पृष्ठ ३१ वर

गुजरातेतून । चंद्रशेखर

# सभा : वर्तमानपत्रातली आणि प्रत्यक्षातली!

५ जून १९७५ गुरुवार! पाऊस येणार असे दुपारपासून वाटत होते. तसे झाल्यास इंदिरा गांधींची सभा कशी काय होणार? सहा वाजले. हवेत ढगाळपणा, धुळीचे वादळ वगैरे होते. पण पावसाचे चिन्ह नव्हते. गुजरात कॉलेज मैदानाकडे निघालो. गुजरातच्या 'विजयी' प्रचारदौऱ्याची सांगता म्हणून इंदिरा गांधींची ही शेवटची सभा अहमदाबादमध्ये होती. अगोदर दोन दिवस गुजरात समाचारमध्ये या सभेची भली मोठी जाहिरात येत होती. गर्दी बरीच होईल अशी अपेक्षा होती. जिमखाना पॅव्हेलियनच्या मागच्या बाजूला पोहोचलो तेव्हा रस्त्यावर शे-दोनशे लोक इंदिरा गांधींना पाहण्यास उभे होते.

काही वेळ तेथे उभा राहिलो. धक्काबुक्की व पोलिसांची किचकिच सुरू झाली तसा उठून मैदानात गेलो. साडेसहा वाजले होते. मैदानात तुरळक गर्दी होती. पोलीस व मिलिट्री यांची संख्या प्रचंड होती. एखाद्या युद्धतळावर आल्यासारखे वाटत होते. दाराजवळ रस्त्यावर दोन माऊंटेड पोलीस होते. (प्रत्येक दारावर ते होते) त्यांची घोडी लाउड स्पीकरचे आवाजाने व वर्दळीने बिथरत होती. एक कुत्रे घोड्यांच्या अंगावर भुंकू लागले तेव्हा घोडे जास्तच बिथरले.

घोड्यावरचे पोलीस पाहून, माझ्या मुलाने (इयत्ता ६ वी) हे काय आहे म्हणून विचारले. काय उत्तर द्यावे हे कळेना. जमाव हटत नसला की जमावात घोडी घालतात असे मोघम सांगितले. पण माणसांना घोड्याच्या टापा लागतील की' त्याने शंका काढली. मी 'हो' म्हटले. त्याच्या डोळ्यांत दुखावल्याची भावना स्पष्ट दिसत होती. इंदिरा गांधींना पाहण्याचा त्याचा उत्साह खूपच कमी झाला.

पावणेसात वाजले. माणसे मैदानभर विखरून बसली होती. फार तर दहा हजार संख्या असावी. स्टेजवर भसाड्या व रडक्या सुरात कोणी तरी पोवाडेवजा कवन म्हणत होते. 'काश्मीरकडे वाकड्या नजरेने पाहणारा मातीत जाईल' अशा अर्थाचे एकच एक चालीचे ते एक हिंदी गाणे (!) होते. माणसे आपापसात गप्पा मारीत बसली होती. दरम्यान काँग्रेसच्या पताका घेतलेले 'समाजवाद झिंदाबाद' वगैरे घोषणा देणारे तीन चार जथे मिरवणुकीने मैदानाशी आले. ट्रकमधूनही बरेच काँग्रेस पाठीराखे घोषणा देत आले. मैदान थोडे तरी भरल्यासारखे दिसू लागले.

इंदिरा गांधी पंधरा मिनिटांत पोहोचतील अशी घोषणा स्टेजवरून करण्यात आली. घोषणा देणारे गृहस्थ म्हणाले 'मेरे साथ इंदिरा गांधी की जय' का नारा लगाईये– बोलो इंदिरा गांधी की– जमावातून 'हाय हाय'च्या आरोळ्या उठल्या. तीन चार वेळा हाच प्रकार घडला. घोषणा देणारे नर्व्हस झाले. त्यांनी मग एक युक्ती केली. ते ओरडले सरदार पटेल की जय– लोकांनी जय म्हणून साथ दिली. महात्मा गांधीकी जय– लोकांनी पुन्हा 'जय'चा घोष केला. घोषणावाले लगबगीने ओरडले– इंदिरा गांधीकी– पुन्हा हाय हाय! दोन तीन वेळा असेच झाल्यावर त्यांनी नाद सोडला. मग त्यांनी गनिमी काव्याने एक घोषणा केली. 'देशके प्रधानमंत्रीकी–' या वेळेस जमाव 'हाय हाय' न म्हणता गप्प बसला. अशी ही इंदिरा गांधी– 'हाय हाय' ची कथा!

सात–पाच झाले. जमाव अस्वस्थ झाला. काश्मीरचा पोवाडा लोक ऐकून घेईनात. टाळ्या–आरोळ्या सुरू झाल्या. अशा वेळी स्टेजवर तारकेश्वरी सिन्हा अवतीर्ण झाल्या. लोकांना वाटले, या आता भाषण करणार. हजारो हात हवेत नको नकोची खूण करू लागले. तारकेश्वरीची देखील कमाल आहे. एवढ्या अस्वस्थ जमावासमोर ही बाई मख्खपणे उभी राहिली. काही शेर सुनावण्याचा तिचा इरादा होता. काश–गुलशन–नशेमन अशा शब्दांनी भरलेल्या काही ओळी तारकेश्वरीने जिवाच्या कराराने म्हटल्या. लोकांनी एवढा आरडाओरडा केला की विचारता सोय नाही. सुदैवाने हा प्रकार लौकर संपला.

इंदिरा गांधी सभास्थानी आल्या. सभास्थानी म्हणजे अगदी स्टेजच्या खाली त्यांची गाडी आणून भिडवली होती. त्या येताना दारात काही गोंधळ झाला म्हणून पोलिसांनी 'सौम्य छडीमार' केला. मघाचे घोषणावाले पुढे सरसावले. मघाचा अनुभव होता म्हणून चिचकत बिचकत मिनतवारीच्या सुरात म्हणाले, 'प्रधानमंत्री अब मंचपर आ रही है–मेरे साथ उनका तालियोंसे स्वागत कीजिये.' काही क्षीण टाळ्या पडल्या. त्यांनी 'की जय' किंवा 'झिंदाबाद' या घोषणा देण्याचे धाडस केले नाही.

शहरातील काँग्रेस उमेदवारांना व्यासपीठावर 'पेश' करण्यात आले. दाखवायला आणलेल्या मुलीप्रमाणे प्रत्येकाने लाजत-बिचकत येऊन कसा तरी नमस्कार केला. इंदिरा गांधींना एक–दोन हार घालून झाले. भाषणाला सुरुवात झाली. गलका चालूच होता.

'अहमदाबादमें मैं कई बार आयी हूँ–हर बार मुझे यहाँ लोगोंका प्यार मिला और' एवढे म्हणत असतानाच माइकचे काही तरी बिनसले. बाई दुसऱ्या माइकसमोर जाऊन बोलू लागल्या. तो माइक जरा उंच होता. 'यहाँ सिर्फ उद्योगका केंद्रही नहीं है' असे म्हणत इंदिरा गांधी गर्रकन वळल्या आणि म्हणाल्या, 'आय वॉंट दिस लोअर्ड' (मध्येच हे इंग्रजी वाक्य ऐकून आंधीमधल्या 'दे शुड बी मोअर इन हिंदी'ची आठवण झाली.)

माइकचे जमले पण लोकांचा गलका कमी होईना. इंदिरा गांधींनी आवाज टिपेत नेला व गडबड करणाऱ्यांना तडकावले; पण त्यांना शेवटपर्यंत तारस्वरातच बोलावे

लागले. संताप, आक्रमकता, तुच्छता, चीड या त्यांच्या भाषणाच्या मूडला या तारस्वराने निराळीच तीव्रता आली. भाषण ऐकण्यामध्ये जो एक सुखद भाग असतो तो येथे नव्हताच. शेवटपर्यंत वातावरण बिथरलेलेच राहिले.

इंदिरा गांधींच्या भाषणांचे बरेच वृत्तांत येऊन गेले आहेत त्यामुळे ते सविस्तर देण्याची आवश्यकता नाही. त्यांनी सुरुवातीलाच, कॉंग्रेस सभांमध्ये गोंधळ करण्याबद्दल जनता मोर्चावर हल्ला चढवला. 'वो लोग तो दुख व्यक्त करते हैं मगर हिंसाको रोकते नही हैं क्या माने है इसके?' वगैरे वगैरे अगदी जहाल शब्दांत त्यांनी जनता मोर्चाच्या नेत्यांचा समाचार घेतला.' विरोधकांना माझ्या शिवाय दुसरे काही दिसत नाही ' असे सांगून त्या म्हणाल्या ' जहाँभी वो देखते हैं, उन्हें मैं नजर आती हूँ. अस्मानमे देखो इंदिरा गांधी-धरतीपर देखो. इंदिरा गांधी—मैं क्या करूं मैं इतनी मोटी तो नहीं हूँ की मैं सामने आऊं तो मेरे सिवा कुछभी नजर न आ सके. जैसे के विरोधी दलोंके कुछ नेता है ' ( हा टोला अर्थात पिलु मोदी यांना उद्देशून होता. इंदिरा गांधींनी सबंध भाषणात केलेला हा एकमेव विनोद—बाकी सर्व भाषण म्हणजे ' लगाव बत्ती ' होते.)

लोकांमधील ओरडयाने इंदिरा गांधींचा मूड चांगलाच बिघडत गेला. विशेषत: त्या जेव्हा नवनिर्माण आंदोलनावर टीका करीत तेव्हा ' हाय हाय—होहो ' चा ओरडा उठे व इंदिरा गांधी जास्त ओरडू लागत. नवनिर्माणबद्दल कसलाही उल्लेख करणे त्यांना अशक्य झालं. त्या रागाने म्हणाल्या, ' लोग पूछते हैं की पीछली बार हमने क्या किया. हमारी सरकार सब प्रश्नोंका हल करनेकी तय्यारी करने लगी तो आंदोलन छिडा. हिंसा हुओ. हमें वक्तहि कहां दिया? क्या हमें एक महिनाभी मिला शांतीसे सरकार चलाने के लिये? या तो आंदोलन हो सकता है या सरकार चल सकती है—दोनो एकसाथ नही हो सकता है!'

या भाषणांत इंदिरा गांधींनी वर्तमानपत्रांवर महाभयंकर हल्ला चढवला. या पेपरवाल्यांना कांही कळत नाही. उगाच काही तरी खरडत बसतात. बंगला देश, निर्वासित, अरब राष्ट्रांविषयीचे धोरण, याबाबतीत माझे धोरण बरोबर होते हे नंतरच्या घटनांनी सिद्ध झाले असे इंदिरा गांधी सांगून म्हणाल्या, ' इन अखबारवालोको इतनीभी शरम नहीं हैं कि जो हमने कहा था की गलत निकला ऐसा कबूल करे—वो तो बस लिखतेहि जाते हैं '

बऱ्याच वेळा भाषणांत इंदिरा गांधींची शब्दयोजना तिखट बनली. विरोधी पक्ष स्वतःला सर्वज्ञ समजतात. दुष्काळांत यांनी काय काम केले, गुजराती साडी नेसल्यावरची टीका वगैरे गोष्टी बोलताना इंदिरा गांधींचा सूर चांगलाच चढा लागला होता. चिमणभाईबद्दल बोलतांना त्यांची फार पंचाईत झाली. घनश्याम ओझा चांगले काम करीत असता, चिमणभाईंनी स्वार्थी बुद्धीने त्यांना हुसकावून लावून कॉंग्रेस बदनाम केली वगैरे गुळमुळीत खुलासा त्यांना करावा लागला.

इंदिरा गांधींची ही सभा पंतप्रधानपदावरील व्यक्तीला शोभेशी मुळीच झाली नाही. लोकांनी त्यांचे शांतपणे शेवटपर्यंत ऐकून घेतले नाही. एकदाही त्यांच्या बोलण्याला अनुकूल प्रतिसाद दिला नाही. सर्वत्र उपहास व उदासीनता यांचेच दर्शन लोकांच्या वर्तणुकीत दिसत होते. भर गावात ही सभा होऊन देखील १५ ते २० हजारांच्या वर जमाव नव्हता. त्यांच्या सभेसाठी नेहमी केला जाणारा बांबूच्या तीन कड्यांचा बंदोबस्त या वेळी गर्दीअभावी फारच हास्यास्पद दिसत होता. मिलिट्रीचे अस्तित्व फारच बटबटीत वाटत होते.

पण याच सभेचे दुसऱ्या दिवशी येथील वृत्तपत्रांत जे रिपोर्टिंग आले ते फारच रसभरीत होते. टाइम्सने म्हटले, ' इंदिरा गांधींना प्रथम अस्वस्थ जमावाला तोंड द्यावे लागले; पण नंतर जमाव लगेच शांत झाला व इंदिरा गांधींना जमावाने खूप वेळा प्रतिसाद दिला. (शी वॉज फ्रीक्वेंटली चियर्ड)' हे सारे अजिबात खोटे आहे. गुजरात समाचार तर बोलूनचालून कॉंग्रेसचाच पेपर. त्यानेही सभेचे जोरदार वर्णन केले. टाइम्स व गुजरात समाचार या दोहोंनी सभेचे वर्णन प्रचंड असे (मॅमॉथ रॅली) केले तेही खोटे आहे. उपस्थिती, जमावाची प्रतिक्रिया, खुद्द इंदिरा गांधींचे भाषण या सर्व दृष्टींनी ही सभा ' सो सो 'च झाली.

इंदिरा गांधींचे भाषण तासभर ऐकत असताना असे सारखे मनात येत होते की, ह्या बाई जे सांगत आहेत त्यावर त्यांचा स्वतःचा तरी विश्वास असेल काय? गुजरातच्या दुष्काळात फक्त कॉंग्रेसचे कार्यकर्ते जनतेची सेवा करीत होते, कॉंग्रेस गरिबांची सेवा करते, कॉंग्रेस हाच पक्ष स्थिर सरकार देऊ शकेल यांसारख्या गोष्टींवर मनापासून खराखुरा विश्वास ठेवणे कोणाला तरी शक्य आहे काय? पण इंदिरा गांधी या गोष्टी ठणकावून सांगत होत्या हे मात्र खरे. इतके नाटक करून, मनाची फसवणूक करून, सत्ता हाती ठेवणे हाच जीवितहेतु मानून जगणे किती अवघड असेल. मानसिक शांती लाभणे अशा अवस्थेत कठीणच!

इंदिरा गांधींच्या प्रचारदौऱ्याने कॉंग्रेसची प्रतिमा सुधारली असे वृत्तपत्रे लिहीत होती; पण मला तसे वाटत नाही. इंदिरा गांधींच्या प्रचारदौऱ्यांत सत्तेचा दर्प, सत्तेचा दुरुपयोग, इतरांबद्दल कमालीची तुच्छता, एक प्रकारची उताविळी, हपापलेपणा यांचे इतके प्रखर दर्शन झाले की, सामान्य माणसाच्या मनातील कॉंग्रेसबद्दलची अढी जास्तच बळकट झाली. कॉंग्रेसच्या समाजवादी पवित्र्यास ' हेलिकॉप्टर समाजवाद ' असे नवे यथार्थ नाव येथे पडले आहे. हेलिकॉप्टर पाठवून, जेवणासाठी चिकन्स मागविणाऱ्या इंदिरा गांधींनी गरीब, सेवा वगैरे शब्दांची कितीही जपमाळ ओढली तरी त्याला काय अर्थ आहे? □


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# सोलकढी

## □ कुठे 'ते' आणि कुठे 'रे'?

भारतीय संस्कृती, भारतीय तत्त्वज्ञान, योगविद्या, नेहरू आणि इंदिरा गांधी, भारतीय रूढी, खादीचे कापड अशा भारताबाहेरसुद्धा चांगल्या ठाऊक असलेल्या ज्या मोजक्याच 'भारतीय' गोष्टी आहेत त्यांच्यात सत्यजित रे या 'गोष्टी'चाही अंतर्भाव करायला हवा. सत्यजित रे यांच्या बाबतीत तर परिस्थिती अशी टुमदार आहे की भारतापेक्षा भारताबाहेरच ते अधिक चांगले ठाऊक आहेत. सत्यजित रे यांनी वीस वर्षांपूर्वी काढलेल्या 'पाथेर पांचाली' या पहिल्याच चित्रपटाला अनेक आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली. तेव्हा मला तो एक सुबक अपघात वाटला होता; पण नंतर हे सुबक अपघात सारखेच घडू लागले. मग मात्र हा चित्रपटकाढ्या बऱ्यापैकी असावा अशी दाट शंका माझ्या मोकळ्या मनाला चाटून गेली : मी सत्यजित रे यांचे चित्रपट हपापहौसेने पाहू लागलो. ते मला आवडूही लागले. अर्थात आवडले म्हणून लगेच डोक्यावर घेऊन नाचायचे अशी गटेबाजी ('गटे' नावाचा एक जर्मन महाकवी होऊन गेला. कालिदास नावाच्या इसवी सनाच्या पाचव्या शतकात होऊन गेलेल्या एका भारतीय महाकवीचे 'अभिज्ञानशाकुतलम्' नावाचे संस्कृत नाटक आवडले म्हणून तो–म्हणजे गटे–ते डोक्यावर घेऊन नाचला, असे म्हणतात. त्यानंतर 'डोक्यावर घेऊन नाचणे' हा वाक्प्रयोग मराठीत रूढ झाला : 'गटेबाजी' हा शब्द मी त्या अर्थाने वापरला आहे. त्याचा 'गटबाजी'शी अर्थाअर्थी संबंध जोडायचा झाल्यास वाचकांनी तो सर्वस्वी स्वतःच्या जबाबदारीवर जोडावा.) आम्हाला आमच्या वडिलांनी शिकवलेली नाही आणि त्यांनी तरी सगळे शिकवायला कशाला हवे? व्यापक परिस्थितीचे भान ठेवले म्हणजे तोलढळ होत नाही.

त्यामुळे सत्यजित रे बऱ्यापैकी चित्रपट काढे आहेत अशी जरी अगदी दाट शंका आली तरी व्ही. शांताराम, राजा परांजपे, राम गबाले, मृणाल सेन, स्व. गुरुदत्त, राज कपूर, बाबूराम इशारा, बी. आर्. चोप्रा, शक्ती सामंता वगैरे इत्यादी प्रभृती जटायु–संपातींशी त्यांची तुलना होऊ शकत नाही, हे मला कळत होते. कुठे 'ते' आणि कुठे 'रे'?

मी असे पाहतो की सत्यजित रे चित्रपट काढतात ते स्वतःसाठी. स्वतःचे समाधान झाले की त्यांचे भागते. 'ते' चित्रपट काढतात ते अगणित मायबाप प्रेक्षकांसाठी. प्रेक्षकांचे समाधान हेच त्यांचेही समाधान असते. स्वतःसाठी काही करणे केव्हाही सोपेच असते; दुसऱ्यांसाठी त्यांना हवे तेच करणे हे केव्हाही अ-सोपेच असते. ... सत्यजित रे यांचे बहुतेक चित्रपट वास्तववादी आहेत. त्यापेक्षा वेगळे चित्रपट हे वेगळेपणाच्या हव्यासातून निर्माण झालेले आहेत. जे आहे तेच दाखवण्यात रे रमतात. 'ते' मात्र जे नाही तेच दाखवण्यासाठी आकाशपाताळ एक करतात. असे करता करता त्यांनी या भारतवर्षात एक वेगळीच चित्रसृष्टी निर्माण केली आहे. सत्यजित रे यांना ते जमण्यासारखे नाही.......सत्यजित रे एखादी बाजू घेत नाहीत, ही आणखी एक गोष्ट. बाजू घ्यायला बेभान धैर्य लागते; मध्य–स्थाला सावध कार्पण्य पुरते. सत्यजित रे यांचा 'प्रतिद्वंद्वी' आणि मृणाल सेन यांचा 'इंटरव्ह्यू' या एकाच समस्येवरच्या दोन चित्रपटांची तुलना केली तर सत्यजित रे यांच्या मर्यादा कोणालाही उमजतील.

कोणालाही म्हणजे परदेशी प्रभुणे सोडून कोणालाही. कारण परदेशी प्रभुण्यांनी सत्यजित रे यांना आपले मानले आहे. 'रे' वेगळी अस्सल भारतीय चित्रपटसृष्टी त्यांना ठाऊक नाही; त्यामुळे ते आपले रे यांनाच डोक्यावर घेऊन नाचताहेत. त्याचे आणखी एक प्रत्यंतर नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका बातमीत आढळते. मि. डेरेक माल्कम हे एक विख्यात चित्रपटसमीक्षक आहेत. 'द गार्डियन' या प्रतिष्ठित वृत्तपत्रात ते दीर्घकाळ समीक्षा करत आहेत. आत्तापर्यंत पाहिलेल्या चित्रपटांत तुम्हाला सर्वांत आवडलेला चित्रपट कोणता? असा प्रश्न 'द गार्डियन'ने डेरेक माल्कम यांना विचारला. या बिकटवेंद्र्या प्रश्नाला उत्तर देताना, आपल्याला अत्यंत आवडलेल्या–कुरोसावाचा 'राशोमॉन,' वर्गमनचा 'विंटर लाइट,' ड्रेयरचा 'डे ऑफ राथ'–अशा काही चित्रपटांचे विवेचन करून अखेर 'सर्वांत आवडलेला' म्हणून सत्यजित रे यांच्या 'जलसा–घर' या चित्रपटाची निवड डेरेक माल्कमनी केली आहे.

'जलसा–घर' ही एका विगतवैभव जमीनदाराची चित्रकहाणी आहे. वैभव झपाट्याने ओसरत असतानासुद्धा आपला डौलदिमाख जपू पाहणाऱ्या एका जिद्दी माणसाची यातली प्रमुख भूमिका छबी विश्वास या नटाने अविस्मरणीय कौशल्याने केली आहे. अभिनय, दिग्दर्शन, छायाचित्रण, संकलन, संगीत यांच्या एकोप्यातून सिद्ध झालेली 'जलसा–घर' ही पडद्यावरची एक कविता आहे. सारे कबूल. त्रिवार कबूल; पण म्हणून एखाद्याने 'सर्वांत आवडलेला' अशी त्याची भलावण करावी, हे जरा जास्तच होते, नाही का?

परंतु इकडे आपल्याला खुपणाऱ्या सत्यजित रे यांच्या मर्यादा परदेशी प्रभुण्यांना खुपत नाहीत. उलट या मर्यादा त्यांना सत्यजित रे यांची ढळढळीत गुणवैशिष्ट्ये वाटतात.

हेच सत्यजित रे यांचे यश;

आणि

हेच सत्यजित रे यांचे अपयश. (व्वा! व्वा!) □

## □ हळव्या मनाचा 'ॲटमबॉंब'

सांप्रत महाराष्ट्रात दोन बाईसाहेब विशेष प्रसिद्धीला येऊन राहिल्या आहेत. त्यातल्या एक, पद्मा चव्हाण; (तर दुसऱ्या कोण, हे 'माणूस'च्या वाचकांना न सांगताही समजण्यासारखे आहे. न सांगता ज्यांना ते समजत नसेल त्यांनी चहा पिताना त्यात चमचाभर हिंगाची पूड टाकावी हे बरे.) 'भारतीय असंतोषाचे जनक' असे जसे लोकमान्य टिळकांचे, तसे 'मादक सौंदर्याचा ॲटमबाँब' असे पद्मा चव्हाणांचे वर्णन केले जाते. पद्मा चव्हाणच्या करंगळीत जे आहे ते

बाकीच्या नटचांच्या अल्ल्या देहात नाही, असे थोरल्या माधवराव मनोहरांनी बजावून ठेवले आहे. त्यामुळे पद्मा चव्हाणची करंगळी पाहण्यासाठी रसिक प्रेक्षक तिच्या नाटकांना हाउसफुल्ल गर्दी करून सोडतात.

'गुंतता हृदय हे' या नाटकाला तेच झाले. प्रायोगिक प्रेक्षकांनी 'उध्वस्त धर्मशाळा' या नाटकाला जितकी आणि जशी गर्दी करून सोडली होती तितकी आणि तशी गर्दी व्यावसायिक प्रेक्षकांनी 'गुंतता हृदय हे' या नाटकाला करून सोडली. त्यामुळे या नाटकप्रयोगात मिळणाऱ्या रॉयल्टीवर, डोंबिवलीहून मुंबईला येण्यासाठी, एक सबंध आगगाडी विकत घ्यायचे शं. ना. नवरे यांनी ठरवले आहे, असे म्हणतात. (इंजिनमधली एक जागा जयवंत दळवीसाठी राखून ठेवण्यात येईल असे समजते) 'अभिजात'चे अनंत काणे तर एकदम 'वाघ' होऊन गेले आणि 'गुंतता हृदय हे' नाटकाचा हजारावा प्रयोग आरे-गौळीवाड्यावर करावा की काय, याचा गंभीर विचार करू लागले. प्रयोग अशा धूमगतीने होत होते की तिच्यापुढे गुजरात-निवडणूक-दौऱ्यातल्या इंदिराजींच्या प्रचारसभा मेंग्या वाटाव्या. सगळे कसे छानछुनछनक चालले होते.

मग अचानक काय झाले कोणास ठाऊक. 'गुंतता हृदय हे' नाटकाचे आगाऊ जाहीर झालेले काही प्रयोग 'अपरिहार्य' कारणासाठी रद्द झाले. आनंद जसा नेहमी 'अवर्णनीय' असतो तसे कारण नेहमी 'अपरिहार्य' असते. अपरिहार्य कारणाचा संबंध कसल्या तरी आजाराशी असतो हे मराठी प्रेक्षकांना अनुभवाने आता ठाऊक झाले आहे. त्यामुळे कोणी तरी आजारी पडले असणार हे त्यांनी ओळखले. पाठोपाठ बातमी आली की साक्षात पद्मा चव्हाणच आजारी पडल्या आहेत. कोणी म्हणाले, त्यांच्या करंगळीला काही तरी झाले आहे. कोणी म्हणाले, त्यांना कसली तरी ॲलर्जी झाली आहे. कोणी म्हणाले, त्यांना नुसताच पण बेसुमार अशक्तपणा आला आहे. कोणी म्हणाले, त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला आहे. आजार काहीही असला तरी पद्माबाई काही आता त्यातून उठत नाहीत असेही कोणी म्हणाले.

इतक्यात सगळ्या वर्तमानपत्रांतून खुलासेवार जाहिरात देऊन, आपली प्रकृती अगदी ठणठणीत आहे; रसिकांनी अफवांबर विश्वास ठेवू नये, असे खुद्द पद्माबाईंनीच मराठी जनतेला आश्वासून सांगितले. जनतेचा जीव भांड्यात पडला. तिचा लाडका ॲटमबाँब सुखरूप होता.

पण जनतेचा जीव भांड्यात पडला एवढेच. तो फुलून आला नाही. कारण मा. सौ. ॲ. पद्मा चव्हाण आपल्या ठणठणीत प्रकृतीचे दर्शन यापुढे रंगभूमीवरून देणार नव्हत्या. त्यांना कंटाळ्याचा आजार झाला आहे. नाटकातल्या सबंग राजकारणाला कंटाळून हवाबदलासाठी त्या रंगभूमीपासून दूर दूर कोठे तरी जाणार आहेत.

पद्मा चव्हाण ही एक आगळीवेगळी नटी आहे, असे मला आपले पहिल्यापासून वाटायचे. नाटकवाले तिच्या ॲटमबाँबी देहाची जाहिरात करायचे; मराठी प्रेक्षक ॲटमबाँबची करंगळी पाहायला हपापून जायचे; समीक्षक ॲटमबाँबच्या स्थूल वैशिष्टयांवर रकाने लिहायचे. पण ॲटमबाँबलाही एक गोजिरवाणे मन असते हे (माझ्याशिवाय) कोणालाही कधीच उमजले नाही. नाटकाच्या बाजारी दुनियेत त्या हळव्या मनाचे आक्रंदन ऐकायला कोणालाच वखत नव्हता. जो तो आपल्याच ह्याच्यात. त्यामुळे ते मन बिचारे एकाकीपणे ठणकत राहिले. अखेर व्हायचे ते झाले : प्रकृती ठणठणीत असल्यामुळे पद्मा चव्हाणना रंगभूमीचा त्याग करावा लागला.

'गुंतता हृदय हे' नाटकात आत्तापर्यंत 'कल्याणी'ची जी भूमिका पद्मा चव्हाण करत होत्या ती भूमिका, 'चंद्रलेखा'च्या सौजन्याने, आता आशालता वाबगावकर करणार आहेत.

त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. (रसिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.) प्रकृतीचा विषय निघालाच आहे म्हणून सांगतो. दादा कोंडके यांची तसेच 'अनंतरावां'चीसुद्धा प्रकृती ठणठणीत आहे. (रसिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.)

—अनंतराव

श्री. संपादक महाशय 'माणूस'
स. न. वि. वि.

सोलकढी हे आपलं सदर वाचलं. चितुराया आणि (पड्द्यामागची) चानी. इतर काही मला म्हणायचं नाही. लेख विनोदी आहे. पण या विनोदातल्याही काही गैरसमज पसरवणाऱ्या मजकुराबद्दल थोडंसं लिहायचंय.

'खानोलकरांचा हा चिंतामणी एकच नाटक एकाच वेळी पाच-सात संस्थांना एकमेकांच्या नकळत देतो.' हा अंतुरायांचा मजकूर अक्षरशः विनोदी नव्हे. या संस्था कुठल्या आणि अशी माझी नाटके कोणती याचा खुलासा अंतुरायांनी करावा ही त्यांना सप्रेम विनंती. आता स्पर्धेच्या वेळी काही छापील नाटके अनेक संस्था करतात हे अनेकांना माहीत आहे. पण ज्या नाटकांचे हक्क काही विशिष्ट संस्थांकडे असतात त्यांच्या परवानगीवाचून त्यांना प्रयोग स्पर्धेतही करता येत नाही. श्री. राजाभाऊ नातूंकडे जोवर 'कालाय'चे हक्क होते तोवर 'कालाय'च्या प्रयोगासाठी मी स्पर्धेतील संस्थांना त्यांना (राजाभाऊंना) विचारण्याची विनंती करीत होतो. हे श्री. राजाभाऊंसारखा ज्याला माझ्याबद्दल आस्था आहे असा माणूस सहज सांगू शकेल. तेव्हा या गोष्टीचा खुलासा व्हावा. एकमेकांच्या नकळत मी संस्थांना (५-७) नाटकांना परवानगी देतो तेव्हा मी त्यांच्याकडून पैसेही घेतो असा दुष्ट अर्थ अंतुरायांना मुद्दामहून काढायचा असल्यास देव त्यांचे भले करो. पण खुलासा मात्र व्हावा.

३०-५-७५ आपला

चिं. त्र्यं. खानोलकर




# अरब–इस्राइल
## संघर्षाकडून समझोत्याकडे

वा. दा. रानडे

सुएझ कालवा आंतरराष्ट्रीय वाहतुकीस पुन: सुरू होणे आणि कालवाभागातील आपल्या फौजा व रणगाडे इस्राइलने निम्म्याने कमी करणे म्हणजे अरब–इस्राइल-संघर्षातील तडजोडीचा आणखी एक टप्पा म्हणता येईल. गेल्या वर्षी जूनमध्ये सीरिया आणि इस्राइलमध्ये युद्धतहकुबी आणि फौजा काढून घेण्याचा करार झाला. त्यानंतर एक वर्षाने तडजोडीचा आणखी एक टप्पा गाठला गेला आहे.

या तडजोडीने अरब–इस्राइल-संघर्ष मिटला असे नव्हे, पण युद्धाचा संभव बराच कमी झाला आहे. सध्याची तडजोड इजिप्त आणि इस्राइल यांच्यात झाली आहे. इतर अरब राष्ट्रे काय भूमिका घेतात यावर तडजोडीचे पुढचे टप्पे अवलंबून आहेत. इजिप्तने केलेल्या तडजोडीस लीबियाने विरोध दर्शविला आहे. इस्राइलचे अस्तित्व मान्य करण्याची सादत यांची तयारी आहे. सौदी अरेबियाही ही भूमिका घेण्यास तयार आहे; पण बाकी अरब राष्ट्रे ही वस्तुस्थिती मान्य करण्यास अजून तयार नाहीत.अरब राष्ट्रांनी इस्राइलचे अस्तित्व मान्य करावे आणि इस्राइलने अरबांचा बळकावलेला प्रदेश सोडून द्यावा, या पायावरच तडजोड होऊ शकेल. इस्राइल नष्ट करण्याची स्वप्ने अरबांनी आता विसरली पाहिजेत. ही आकांक्षा त्यांनी सोडल्याचा पुरावा त्यांच्या कृतीतून मिळत नाही तोपर्यंत इस्राइल बळकावलेला प्रदेश सोडणार नाही हे उघड आहे. याबाबतीत इतर अरब राष्ट्रांचे मन वळविण्यात सादत यांना कितपत यश येते यावर कायम स्वरूपाची तडजोड अवलंबून आहे.

संघर्षाची वाट सोडून सादत तडजोडीस तयार कसे झाले? भावी संघर्षासाठी मॉस्कोकडून शस्त्रे मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते. त्यांनी एक शिष्टमंडळही काही महिन्यांपूर्वी मॉस्कोत पाठविले होते; पण मॉस्कोकडून त्यांना अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. शिष्टमंडळाच्या भेटीनंतर निघालेल्या संयुक्त पत्रकात मात्र हे अपयश दडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. ब्रेझनेव्ह यांची कैरोभेट दोनदा पुढे ढकलण्यात आली. ब्रेझनेव्ह यांच्या आजारपणाचे कारण यासाठी देण्यात आले. पण ते बरे झाल्यानंतरही त्यांनी कैरोस भेट दिलेली नाही. रशियाकडून शस्त्रांची मदत घ्यावयाची आणि अमेरिकेशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करावयाचे, या सादत यांच्या दुटप्पी धोरणामुळे त्यांच्यावर ब्रेझनेव्ह यांचा रोष झाला होता. दोन वर्षांपूर्वी सादत यांनी रशियन लष्करी सल्लागार इजिप्तमधून काढून घेण्यास सांगितले तेव्हापासूनच रशिया-इजिप्तसंबंध बिघडले होते ते पुन: सांधण्याचा प्रयत्न झाला तरी पूर्वीइतके ते सांधले गेले नाहीत व सादत यांचे धोरण लक्षात घेता नासर यांच्या काळाइतका रशियाचा प्रभाव तेथे वाढण्याची शक्यता नाही, हे ब्रेझनेव्ह यांनी ओळखले आहे.

रशियास अरब–इस्राइल युद्ध पुन: व्हावयास नको आहे; पण त्याचबरोबर अरब राष्ट्रांतील आपला प्रभाव नाहीसा होऊन ती अमेरिकेकडे झुकावीत हेही नको आहे. इजिप्तवरचा आपला प्रभाव गेला तरी दुसऱ्या अरब राष्ट्रांना लष्करी व आर्थिक मदत करून तेथे आपला प्रभाव टिकविण्याचा रशियाचा प्रयत्न आहे. सादत यांचे अमेरिकेशी सहकार्याचे धोरण स्पष्ट होऊ लागताच रशियाने इराक व सीरियास मदत वाढविली आणि लीबियास मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत करण्याचा करार नुकताच केला आहे. इजिप्तच्या तडजोडीला लीबियाने केलेला विरोध या संदर्भात पाहिला पाहिजे. याचा अर्थ रशियाला अरब–इस्राइल-संघर्षात तडजोड नको आहे असे नाही; पण आपला प्रभाव राखून ही तडजोड हवी आहे. अरब राष्ट्रे व इस्राइल यांच्यात कायम व टिकाऊ स्वरूपाची तडजोड व्हावयाची असेल तर प्रथम रशिया व अमेरिकेत त्याबाबत एकमत झाले पाहिजे. सध्या फक्त युद्ध टाळण्यापुरतेच हे एकमत आहे. तडजोडीची उभयमान्य योजना त्यांच्यापाशी अजून तयार नाही. उभयतांनी आपली वर्चस्वक्षेत्रे ठरवून घ्यावयाची व त्यात दुसऱ्याने हस्तक्षेप करावयाचा नाही या पायावर ही तडजोड होऊ शकेल. या क्षेत्रात सत्तासमतोलाचेच राजकारण अमेरिका व रशिया खेळत आहेत; पण या धोरणाने टिकाऊ स्वरूपाची शांतता प्रस्थापित होणार नाही. कारण वर्चस्वक्षेत्राचे राजकारण एकदा सुरू केले की त्यातून हे क्षेत्र वाढविण्याचे राजकारण स्वाभाविकच पुढे येते. त्यातून संघर्ष निर्माण होतो व तो तीव्र झाला म्हणजे त्याला युद्धाचे स्वरूप येते.

टिकाऊ शांतता प्रस्थापित होण्यासाठी अरब राष्ट्रे व इस्राइलमधून रशिया आणि अमेरिकेने आपले लष्करी तळ काढून घेतले पाहिजेत. या राष्ट्रांना लष्करी मदत व शस्त्रखरेदीसाठी आर्थिक मदत देणे पूर्णपणे थांबविले पाहिजे. आर्थिक मदत देणे हाहि आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा मार्ग असतो याचा अर्थ या राष्ट्रांना आपल्या विकासासाठी आर्थिक मदत मिळू नये असे नाही; पण युनोमार्फत आंतरराष्ट्रीय विकासनिधि उभारून त्यातून ही मदत दिली जावी. अरबराष्ट्रांना तेलाने अमाप संपत्ति मिळवून दिली असून आर्थिक मदतीचा प्रश्न आज त्यांच्यापुढे नाही. पण या पैशाचा वापर आर्थिक व औद्योगिक विकासासाठी करण्याऐवजी ते मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदी करीत आहेत. त्यातून शस्त्रस्पर्धा व संघर्षाचे वातावरण वाढत जाते.

इजिप्त आणि इस्राइल यांच्यात या वेळी घडून आलेल्या तडजोडीचा एक विशेष म्हणजे ती घडवून आणण्यात अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड यांनी प्रामुख्याने भाग घेतला. परराष्ट्र मंत्री किसिंजर यांनी कैरो आणि तेलअव्हिव्हच्या वाऱ्या करावयाच्या, दोन्ही बाजूंच्या नेत्यांशी बोलणी करून कराराच्या मसुद्यास त्यांची संमती मिळवायची आणि करारावर औपचारिक सही करण्याचे काम तेवढे अध्यक्षांसाठी शिल्लक ठेवावयाचे अशी किसिंजर यांची आतापर्यंतची पद्धती होती; पण या वेळी तसे घडले नाही. सादत यांच्याशी झालेल्या वाटाघाटीत फोर्ड यांनी महत्त्वाचा भाग घेतला. अरब-इस्राइल संघर्षात कायम स्वरूपाच्या तडजोडीची योजना आपण तयार करीत असून ती लौकरच जाहीर करू असेहि त्यांनी सांगितले.

अरब-इस्राइल-तडजोडीला फोर्ड एवढे महत्त्व देत आहेत याचे कारण पुढच्या वर्षी अमेरिकन अध्यक्षपदाची निवडणूक आहे. व्हिएटनाममधील नामुष्कीच्या अपयशानंतर रिपब्लिकन पक्षाची प्रतिमा डागळली आहे ती पुन: उजळण्यासाठी काही तरी भरीव कामगिरी आपण केल्याचे फोर्ड यांना दाखवायला हवे. अरब-इस्राइल-संघर्षात टिकाऊ तडजोड तोपर्यंत घडवून आणता आली तर आपणास निवडणूक जिंकणे सोपे जाईल असे फोर्ड यांना वाटते, म्हणून या प्रश्नात ते विशेष आस्थेने लक्ष घालीत आहेत. □



# पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

## प्रकरण बावीस : कारबोनेरीचा मृत्यू

सेंट जोसेफवर बंडाला तोंड लागले. पॅपिलॉनच्या भविष्याप्रमाणे ते आत्मघातकी बंड उलटले आणि काही लोकांच्या घोडचुकीमुळे सर्व कैद्यांना त्रास भोगावा लागला. गव्हर्नरच्या सांगण्यावरून गोळीबार आणि मारहाण मात्र थांबली. तरी वातावरण अगदी तंग होतं. दैनंदिन जीवन पार विस्कळीत झालं. अव्याहतपणे चालू असलेल्या सवलती बंद करण्यात आल्या. या परिस्थितीत तिसऱ्या दिवशी बदल झाला. गव्हर्नर आणि कैद्यांचा विश्वास प्रतिनिधी म्हणून पॅपिलॉन यांच्यात समेट झाला आणि प्रकरणावर कायमचा पडदा पडला. पॅपिलॉनचं प्रस्थ त्यामुळे अप्रत्यक्षपणे वाढलंच. फ्रान्समध्ये सुरू झालेल्या युद्धाचे पडसाद तुरुंगातही उमटल्यावाचून राहिले नाहीत. सुटकेच्या प्रयत्नाला मृत्युदंडाची शिक्षा देण्याचा कायदा झाला होता. सेंट जोसेफवरून रॉयेल बेटावर परत येण्यासाठी पॅपिलॉनला खूप दिवस वाट पाहावी लागली.

काल माझा मित्र मॅथ्यू कारबोनेरी याचा हृदयात भोसकून खून झाला. या खुनामुळे खुनांचं एक सत्रच सुरू झालं. मोरीमधे उघड्यानं स्नान करताना आणि तोंडावर साबणाचा संपूर्ण फेस असताना हा प्रकार घडला. शॉवर घेताना नेहमी मांडीखाली चाकू उघडा करून ठेवावा लागतो. न जाणो अचानक शत्रू उपटला तर घोटाळा व्हायला नको. ही साधी दक्षता घ्यायला तो विसरला आणि त्याला प्राणाचं मोल द्यावं लागलं. हा खून करणारा एक आर्मेनियन होता.

गव्हर्नरच्या खास परवानगीनं मी स्वत: माझ्या मित्राला स्ट्रेचर-वरून खाली धक्क्यापर्यंत नेलं; आणखी एकानं हातभार लावला. कारबोनेरीचं वजन इतकं होतं की, टेकडी उतरताना तीन ठिकाणी विश्रांती घ्यावी लागली. दोराऐवजी वायर वापरून मी त्याच्या पायाला मोठ्ठा दगड बांधला. त्यामुळे शार्क माशांच्या भक्ष्यस्थानी न पडता तो सरळ खाली जाणार होता.

घंटानाद झाला. संध्याकाळचे सहा वाजले होते. ठराविक पेटीत कारबोनेरीला घालून आम्ही होडीवर चढलो. तो कायमचा निद्रिस्त झाला होता. त्याच्या दृष्टीनं सर्व काही समाप्त झालं होतं. समोर सूर्य क्षितिजाला टेकला होता.

दहा मिनिटांच्या आत होडी रॉयेल आणि सेंट जोसेफ यामधील प्रवाहापर्यंत जाऊन पोचली. एकाएकी माझ्या घशात मोठा हुंदका दाटून आला. सभोवती असंख्य मासे गोळा होऊन पाण्याच्या पृष्ठ-भागावर घिरट्या घालीत होते. कैद्याची त्या पुढील ‘ जबाबदारी ’ स्वीकारण्याचं त्यांचं संकेतस्थळ आलं होतं.

ईश्वर करो आणि त्यांच्या तडाख्यातून माझा मित्र वाचो. त्याला निरोप देण्यासाठी आम्ही सर्वांनी आपापली वल्ही उंचावली. पेटी उघडली गेली. पोत्यात गुंडाळलेला त्याचा देह घसरत खाली गेला. दगडाच्या वजनामुळे क्षणार्धात समुद्रामधे अदृश्य झाला तो.

भयानक ! पुढच्याच क्षणाला पोत्याच्या चिंध्या होऊन तो

पाण्यावर उभा राहिलेला दिसला. पाच, सात, वीस–किती माशांनी त्याला उचलून धरलं होतं देव जाणे ! तो दोन-तीन सेकंदच दिसला. उजवा हात केव्हाच नष्ट झालेला. सरळ होडीच्या दिशेनं तो येताना दिसला आणि नंतर कायमचा दिसेनासा झाला. होडीखालून जाताना माशांनी तळाला एक असा काही धक्का दिला की, आमच्यातला एकजण तोल जाऊन जवळजवळ पाण्यात पडतच होता.

पहारेकऱ्यांसह सर्वांची भीतीनं बोबडी वळली होती. आयुष्यात प्रथमच मला मरावंसं वाटलं. मी स्वतःला पाण्यात अगदी झोकून देण्याच्या बेतात होतो. शार्क मासे एक वेळ परवडले. या नरकपुरीला कायमचा रामराम ठोकावा असं त्या वेळी तीव्रतेनं वाटलं.

सावकाश चालत चालत मी कॅम्पकडे निघालो. स्ट्रेचर खांद्यावर घेतलेलं होतं. वाटेत थोडा वेळ बसलो. सातच वाजले होते तरी अंधार झाला होता. पश्चिमेला प्रकाशाचे अंतिम अवशेष दिसत होते. त्याखेरीज सर्वत्र काळोख पसरला होता. लाइट-हाउसमधील दिव्याचा प्रकाश मात्र एकसारखा चमचम करीत होता. माझं अंतःकरण जड झालं. तसाच बसून राहिलो.

अंत्ययात्रा बघायची अवदसा तुला कुठून आठवली ? ती सगळ्यात जवळच्या मित्राचीच बघायची पाळी तुझ्यावर आली. ठीक आहे, आता तरी सगळं पाहिलंस ना ? तुझं पुरतं समाधान झालं का ? अनावश्यक कुतूहल शमलं का ?

ज्या इसमानं हा खून केला त्याच्याकडे अजून बघायचंय्. केव्हा ? आज रात्री. नको. आज तो पूर्णपणे सावध असेल. त्याच्या गटात दहाजण आहेत. आपण कितीजण आहोत ? माझ्यासह पाच. पुरेसे आहेत. त्याला उडवून लावायला हरकत नाही आणि खटपट करून आपण 'डेव्हिल' बेटावर जावं. तिथे तराफे नको, तयारी करायला नको, काही नको. नारळाचं पातं धरून समुद्रात शिरावं. अंतर काही फार कापायचं नाही. अवघे पंचवीस मैल. इतकं अंतर तर कावळे सुद्धा उडत उडत जातात. लाटा, वारा किंवा भरतीमुळे ते अंतर जरी वाढलं तरी हरकत नाही. मी बळकट आहे. दोन दिवस समुद्रात काढणं काहीच अशक्य नाही.

स्ट्रेचर उचलून मी कॅम्पवर जाऊन पोचलो. दाराशी एक विस्मयकारक घटना घडली. माझी झडती घेण्यात आली. पूर्वी असं कधीच घडलं नव्हतं. पहारेकऱ्यानं माझा चाकू स्वतः काढून घेतला.

'मी ठार व्हावं अशी तुझी इच्छा आहे का ? मला निःशस्त्र का केलं आहे ? तुम्ही माझी रवानगी मृत्यूकडे करताय हे तुमच्या ध्यानात येत नाही का ? माझा खून झाला तर सगळा दोष तुमच्यावर येईल !' कोणीच उत्तर दिलं नाही. दार उघडलं गेलं आणि मी आत शिरलो. 'इथं तर काहीच दिसत नाही. तिनाऐवजी फक्त एकच दिवा का लावलाय ?'

'पपी, इकडे ये !' ग्रँडेटनं मला बाही धरून ओढलं. हॉलमध्ये विशेष आवाज होत नव्हता. काही तरी गंभीर घटना घडणार असं जाणवत होतं, किंवा घडलीही असावी.

'माझा चाकू त्यांनी काढून घेतला.'

'आज रात्री तरी त्याची गरज नाही.'

'का ?'

'तो आर्मेनियन आणि त्याचा एक मित्र मुतारीत आहेत.'

'ते तिथे काय करतायत ?'

'दोघंही ठार झालेत.'

'त्यांच्यावर ही कृपा कोणी केली ?'

'मीच !'

'फारच लवकर हे घडलं. इतरांचं काय ?'

'त्या गटातले चार जण बाकी आहेत. त्यातल्या पॉलोनं शब्द दिलाय् की तूर्त ते काहीच हालचाल करणार नाहीत. हे प्रकरण एवढ्यावरच थांबवावं काय अशी विचारणा त्यानं केली आहे. आपल्या उत्तराची ते वाट बघतायत.'

'मला एक चाकू दे !'

'हा माझा घे. मी कोपऱ्यात उभा राहतोः तू जा आणि त्यांच्याशी बोल.'

मी त्यांच्या भागात चालत गेलो. डोळे एव्हाना अंधाराला सरावले होते. त्यांना मी सहज ओळखून काढलं. चौघंही जवळ जवळ उभे होते.

'तुला माझ्याशी काही बोलायचंय् का, पॉलो ?'

'होय.'

एकट्यानं का तुझ्या मित्रांसमवेत ? तुझं काय काम आहे ?' मी आमच्यात पुरेसं पाच फुटांचं अंतर ठेवलं. डाव्या हातात उघडा चाकू तयार होता.

'मला एवढंच सांगायचं होतं की तुझ्या मित्राबद्दल पुरेसा सूड घेण्यात आलेला आहे–आणि इतक्यावरच थांबावं असं आम्हाला वाटतं.

तुझा एक चांगला मित्र गमावला : आम्ही दोन गमावले. आता आपण थांबावं. तुझं काय मत आहे ?'

'पॉलो, तुझं मी सगळं ऐकलं. तुझी हरकत नसेल तर अजून एक आठवडा दोन्ही गटांनी शांत बसावं असं आपण ठरवू. तसा दोघांनीही शब्द द्यावा. त्यानंतर काय करायचं हे मागाहून ठरेल. काय ठीक ?

'ठीक आहे.'

आणि मी मागे वळलो.

'बोल, त्याचं काय म्हणणं आहे ?'

'असं की मॅथ्यूबद्दल आपण पुरेसा सूड उगवलेला आहे.'

'बिलकुल नाही,' गालगानी म्हणाला. ग्रँडेट काहीच बोलला नाही. जीन कॅस्टेली आणि लुईस ग्रॅव्हन शांतताकराराचे बाजूला होते. 'तुझं काय मत आहे पण, पपी ?'

'पहिली गोष्ट, मॅथ्यूला कोणी मारलं ? आर्मेनियननं, ठीक ? त्यांना एक गोष्ट सुचवली आहे. म्हणजे शब्द दिलाय् आणि त्यांनीही आपल्याला, की पुढचा एक आठवडा कोणीही हालचाल करायची नाही.'

'म्हणजे तुझी सूड घ्यायची इच्छा नाही तर ?' गालगानी म्हणाला.

'सूड तर आधीच पुरा झाला आहे. त्याच्यासाठी दोघं वर घालवलेत. मग इतरांना का उगीच ठार करा ?'

'त्यांची नियत कशी आहे हे आधी तपासून घ्यायला हवं.'

'गुडनाइट मित्रहो. माफ करा पण मी थोडी झोप घेण्याचा प्रयत्न करणार आहे.'

मला एकट्याला विचार करायचा होता, म्हणून बिछान्यावर जाऊन पडलो. माझ्या अंगावरून एक हात हलकेच फिरला आणि त्यानं चाकू काढून घेतला. अंधारात हलक्या आवाजात ऐकू आलं. 'शक्य झालं तर झोप, पपी; स्वस्थ झोप. आम्ही पाळीपाळीनं पहारा देणार आहोत.'

माझ्या मित्राच्या अचानक मृत्यूला तसं पाहिलं तर खरं, पुरेसं कारण काहीच नव्हतं. आदल्या रात्री त्यानं आर्मेनियनला बोली-प्रमाणे एकशेपंचाहत्तर फ्रँक द्यायला भाग पाडलं होतं इतकंच. त्या वेळी ग्रँडेट आणि मॅथ्यूपुढे त्याचा काही इलाज चालला नाही. तीस–चाळीस जणांपुढे आपला तो अपमान झाला असं समजून त्या मूर्ख इसमानं मॅथ्यूला ठार केलं. मारलं तेही बेसावध अवस्थेत, भेकड पणे. याचं मला अतीव दु:ख झालं. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे खुनी इसम काही तासच जास्त जिवंत राहू शकला होता. छोटंसंच पण बहुमोल समाधान.

ग्रँडेटनं वाघासारखी जलद हालचाल करून एकापाठोपाठ एक दोघांना घशामधे भोसकलं. प्रतिकाराची संधीच त्यांना मिळू दिली नाही. ते जिथे पडले असतील तिथे रक्ताचे पाट वाहत असतील. मला समोर माझा मित्र दिसत होता. शार्क माशांनी घेरलेला, उजवा हात केव्हाच नष्ट झालाय्. लाल–जांभळा दु:खद सूर्यास्त! घंटेच्या आवाजानं माशांना सूचना मिळते हे खरं तर! शंभराच्यावर ते जमले होते.

...माझा प्रिय मित्र नरकवासातून केव्हाच मुक्त झाला होता. त्याला नंतरच्या गोष्टींची फिकिरच काय?

किरकोळ संघर्षामुळं वयाच्या चाळिसाव्या वर्षी असा खून व्हावा! बिचारा मॅथ्यू. मला हे आणखी सहन होत नाही. नाही. नाही. नाही! शार्क माशांनी मला खाल्लं तरी हरकत नाही, पण जिवंतपणे खावं; पळण्याच्या धाडसी प्रयत्नात–पण ते पोतं, दोर आणि दगड नको. पहारेकरी किंवा कैदी, कोणीही त्या वेळी बघता कामा नये. घंटा-नादही नको. 'मेनलँड' ला जाण्यासाठी समुद्राशी झगडताना त्यांनी मला गाठावं.

'संपलं सारं. यापुढं अतिकाळजीपूर्वक प्रयत्न बंद! डेव्हिल बेटा-वरून नारळांच्या साहाय्यानं दूर जायचं–सगळं काही देवावर सोपवावं.'

त्या बेटावर जाता आलं तर हा प्रयोग जरूर करून पहावा. दोन दिवस तग धरण्याचा काय तो प्रश्न; पण पाण्यात आपली शक्ति टिकून राहील ना? का पोतं धरून हातातील त्राण निघून जाईल? पहिली गोष्ट रॉयेलहून मुक्काम हलवावा. पुढचं पुढं पाहता येईल.

'झोप लागली का, पपी?'

'छे.'

'थोडी कॉफी हवीय्?'

'चालेल.' मी बिछान्यावर उठून बसलो आणि ग्रँडेटकडून कढत मग हातात घेतला. एक पेटवलेला सिगारही त्यानं दिला.

'वाजले किती?'

'पहाटेचा एक. तुझी अस्वस्थपणे चाललेली चाळवाचाळव पाहून माझ्या ध्यानात आलं की तू जागा आहेस.'

'एक मिनिटसुद्धा झोप लागली नाही. कारबोनेरीच्या मृत्यूनं मी पार खचलोय् आणि त्याची अंत्ययात्रा तर त्याहून दु:खद! छे. अत्यंत भयानक दृश्य! तुला कळलं काय झालं ते?'

'मला ते सांगूही नकोस, पपी; मी अंदाज करू शकतो. तू तिथे जायलाच नको होतं.'

'ती घंटानादाची गोष्ट म्हणजे मला थापाच वाटल्या. शिवाय पायाला प्रचंड धोंडा वायरनं पक्का बांधल्यावर मला वाटलं होतं की आता तरी तो माशांपासून बचावेल–सरळ तळाला जाईल बिचारा! ते दृश्य मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. आणि तुझं काय–इतक्या अल्पावधीत तू दोघांना कसं उडवू शकलास?'

'मला खुनाची बातमी मिळाली तेव्हा मी बेटाच्या एका टोकाला होतो. कॅम्पवर परत न जाता मी कामाची सबब सांगितली आणि तीन फूट लांबीच्या नळीला एक दुधारी पातं बसवलं. ही गोष्ट दुपारची. पाचच्या सुमारास मी त्या नळीसह परतलो. पहारेकऱ्यानं मला त्याबद्दल विचारलं तेव्हा मी म्हणालो की, माझ्या कॉटचा एक पाय निखळला होता, त्या ठिकाणी रात्रीपुरती ती नळी उपयोगात आणणार आहे. उजेड असूनही मी नळी मोरीत लपवून ठेवली. हजेरी-पूर्वी पुन्हा ताब्यात घेतली. अंधार पडू लागला. पातं आधी काढून घेतलं होतं, ते परत बसवलं. त्या वेळी आपल्या मित्रांनी भोवती कोंडाळं केलं. आर्मेनियन आणि 'सॅन्स सॉसी' त्यांच्या बिछान्यापुढे उभे होते, पॉलो त्यांच्यामागे होता. तू येण्यापूर्वी मला कृत्य आट-पायचं होतं, कारण तुलाही त्यात निष्कारण त्यांनी गोवलं असतं. आपल्याला जर पकडलं असतं तर तुझ्या रेकॉर्डमुळं तुलाच जास्तीत जास्त शिक्षा भोगावी लागली असती. जीन आणि ग्रेव्हननं हॉलमधले कडेचे दिवे मालवून टाकले. फक्त मधला दिवा जळत होता. जवळ-जवळ अंधारच. माझ्याकडे देगानं दिलेली एक मोठी विजेची बॅटरी होती. जीन पुढे चालू लागला. मागून मी गेलो. त्यांच्याजवळ गेल्या-वर जीननं त्याच्या तोंडावर प्रकाशाचा झोत टाकला. आर्मेनियनचे डोळे दिपल्यामुळं त्यानं डावा हात डोळ्यावर धरला. एका झेपेतच माझ्या पात्यानं त्याचा गळा गाठला. झोत दुसऱ्यांदा सॉसीच्या डोळ्यांवर पडला. त्यानं हवेतच चाकूचा वार केला; पण तत्पूर्वी मी वेगानं त्याचाही गळा कापला. पॉलो जमिनीवर आडवा पडला आणि बिछान्याखाली सरपटत गेला. जीननं बॅटरी विझवल्यामुळे मी त्याच्यामागे गेलो नाही–त्यामुळे पॉलो बचावला.'

'मग त्यांना मुतारीत कोणी नेऊन टाकलं?'

'कुणास ठाऊक? मला वाटतं त्यांच्या भागातल्या काही जणांनी दोघांच्या चार्जर्स काढून घेण्यासाठी त्यांना मुतारीत नेलं असणार!'

'पण त्या जागी तर रक्ताचा पूर लोटला असेल.'

'अरे, त्यांचे गळे अक्षरश: आरपार कापले होते, म्हणजे शरिरा-तला रक्ताचा थेंबन् थेंब बाहेर आला असणार. त्यांना हवी तर संपूर्ण तपासणी करू द्या. बॅटरी देगापर्यंत पोचती झाली आहे. चाकूचं पातंसुद्धा. म्हणजे त्या बाबतीत तरी धास्ती नाही. मला दु:ख अजि-बात होत नाही. आपल्या मित्राचे डोळे साबणानं भरलेले असताना त्यानं ठार केलं, तर त्यांचे डोळे उजेडानं दिपल्यावर मी त्यांना खलास केलं! जशास तसं! तुला याविषयी काय वाटतं, पपी?'

'तू कामगिरी उत्कृष्ट पार पाडलीस. इतक्या लवकर तू त्यात सफल झाल्याबद्दल तुझे आभार कसे मानावेत हेच मला कळत नाही.

शिवाय मला त्यापासून दूर ठेवण्याचा तुझा मोठेपणाही वाखाणण्याजोगा आहे.'

'त्यात काहीच विशेष नाही. मी माझं कर्तव्य केलं : तुला सध्या काळ वाईट आहे आणि स्वातंत्र्याची तीव्र तळमळही लागली आहे म्हणून ते मलाच करणं आवश्यक होतं.'

'थँक यू, ग्रँडेट. खरंच, मला लवकरात लवकर इथून बाहेर पडायचंय्. हा मामला इथेच थांबावा यासाठी तू मला मदत करशील काय ? झाले एवढे खून पुरे झाले.'

'माझंही तेच मत आहे. फक्त गाल्गानीचं म्हणणं आहे की त्या सर्वांना शिक्षा व्हायला पाहिजे.'

'सकाळी सहा वाजता काय होतंय ते आधी पाहू. मी काही कामाला जात नाही. इथेच राहण्यासाठी मी आजारी असल्याचं जाहीर करतो.'

पहाटेचे पाच वाजले. ब्लॉकचा मुख्य आमच्यापाशी आला. 'मी रक्षकांना बोलावून घेऊ का ? आत्ताच मुतारीत मला दोन मुडदे दिसलेत.' हा सत्तर वर्षांचा हुषार प्राणी आम्हाला भासवू पाहत होता की कालच्या साडेसहापासून त्यानं मुडदे पाहिलेच नव्हते. तोच काय, हॉलमधल्या प्रत्येक कैद्याचे पाय रक्ताच्या सड्यावरून घसरले असणार ! मधल्या मोकळ्या जागेतच दोघंही आडवे पडले होते ना!

ग्रँडेटनंही धूर्तपणे उत्तर दिल, 'काय सांगतोस ? मुतारीत दोन मुडदे पडलेत ? केव्हापासून ?'

'माझी फार तर झडती घे,' तो म्हातारा म्हणाला,' सहा वाजल्यापासून मी झोपलो होतो. आत्ता लघवीसाठी मी तिकडे गेलो तर एक प्रकारच्या चिकट द्रव्यावर घसरून पडलो. लायटर पेटवून पाहिलं तर ते रक्त; आणि नंतर दोन व्यक्ती आडव्या पडलेल्या दिसल्या.'

'त्यांना बोलावून घे. ते काय म्हणतात पाहू.'

'वॉर्डर्स ! वॉर्डर्स !'

'कशाला उगीच बोंब मारतोस रे म्हाताऱ्या ? ब्लॉकला काय आग लागलीय् का ?'

'नो, सर : मुतारीत दोन मुडदे पडलेत!'

'असं ? मग मी काय करावं असं आपलं म्हणणं आहे ? त्यांना पुन्हा जिवंत करू ? आत्ता सव्वापाच वाजलेत : सहा वाजता आम्ही तिकडे बघू. फक्त तिकडे कोणाला जाऊ देऊ नका!'


'ते कसं शक्य आहे ? प्रत्येकजण उठला की आधी तिकडेच धावणार!' 'तेही खरचं म्हणा. एक मिनिट थांब—मी बॉसला सांगून येतो.'

आणि थोड्याच अवधीत पाचजण तिथे आले : तीन रक्षक, एक प्रमुख, दोन इतर. आत न येता गजांच्या दाराबाहेर ते उभे राहिले,

'तूच सांगितलंस ना की मुतारीत दोन माणसं मरून पडलीय्त ?'

'होय, साहेब.'

'केव्हापासून ?'

'ते मला ठाऊक नाही. मला ती आत्ताच दिसली-लघवीला गेलो असताना.'

'कोण कोण आहेत ?'

'कुणास ठाऊक.'

'अस्सं काय ? थेरडया, मग मी सांगतो. एकजण नक्की आर्मेनियन आहे. जा वाटलं तर खात्री करून घे!'

'तुमचं बरोबर निघालं : तो आर्मेनियनच आहे, दुसरा सॅन्स सॉ सी.'

'छान! आपण हजेरीपर्यंत वाट पाहू.' असं म्हणून ते निघून गेले.

सहा वाजले. पहिली घंटा झाली. दरवाजा उघडला. दोघंजण कॉफी आणि एकजण ब्रेड असं घेऊन घाईघाईनं आत आले.

साडेसहाला दुसरी घंटा. दिवस उजाडला होता. रात्री मधल्या मोकळया भागातून ज्यांनी ये-जा केली होती, त्यांची पावलं रक्ताच्या सडयात उमटली होती.

दोन्ही गव्हर्नर हजर झाले. आता चांगलाच उजेड पडला होता. आठ वॉर्डर्स आणि डॉक्टरही आले.

'सगळयांनी कपडे काढा आणि आपापल्या बिछान्यासमोर उभे राहा ! हा तर कत्तलखानाच झालाय् की. सर्वत्र रक्तच रक्त !'

सगळयात आधी डे. गव्हर्नर मुतारीत जाऊन आला. परतला तेव्हा त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता. 'त्यांचे गळे आरपार कापलेत. कोणालाच काही दिसलं किंवा ऐकू आलं नसणार— अर्थातच !'

संपूर्ण स्तब्धता.

'डॉक्टर, ते ठार होऊन किती वेळ झाला असेल ?'

'आठ ते दहा तास.'

'आणि थेरडया, तू सांगतोस की तुला पाच वाजता कळलं ? काही ऐकूही आलं नाही की दिसलंही नाही ?'

'नाही, मला आधीच कमी ऐकू येतं. दृष्टीही कमी झालीय्. माझं वय सत्तर आहे साहेब—त्यातली चाळीस वर्षं इथेच काढलीय्त. म्हणून झोप फार येते. काल सहापासून मी झोपलो होतो. म्हणून मला आताच समजलं. नेहमी तर मी घंटेशिवाय उठतच नाही.'

'खरं आहे,' गव्हर्नर उपरोधानं म्हणाला, 'तुम्ही सगळे कैदी आणि पहारेकरीसुद्धा रात्री शांतपणे झोपला असाल. ठीक. ती दोन प्रेतं ऑपरेशनच्या खोलीत न्या ! डॉक्टर, त्यांचं पोस्ट-मार्टेम करा आणि तुम्ही एक एक तसेच कपडयाशिवाय बाहेर यार्डमध्ये जा !'

प्रत्येक कैद्याची गव्हर्नर आणि डॉक्टरनं कसून तपासणी केली. जखमा कोणालाही झाल्या नव्हत्या, परंतु—रक्ताचे डाग मात्र खूप जणांच्या अंगावर होते. विशेषतः तळपायावर. सगळयांनी सांगितलं की ते मुतारीत घसरून पडले होते. ग्रँडेट, गालगानी आणि माझी जास्त काळजीपूर्वक तपासणी झाली. आमच्या जागाही तपासल्या. माझा चाकू तर रात्रीच काढून घेतला होता. ग्रँडेटचा चाकू स्वच्छ होता—त्यावर एकही डाग नव्हता.

डॉक्टर पुन्हा मुतारीत जाऊन आला. तो म्हणाला, 'दुधारी पात्याचा वापर केलेला आहे. उभे असताना दोघांचे गळे कापलेले दिसतात. कमाल आहे ! कोणीही कैदी बचाव न करता सशासारखा भेदरून उभा राहणं शक्य नाही. कोणाला तरी जखम झाली असलीच पाहिजे !'

'पण तुम्ही पाहिलंच ना—कोणीही जखमी नाही. काल सकाळी आर्मेनियननंच कारबोनेरीला मोरीत ठार केलं असावं. ठीक आहे.' गव्हर्नर म्हणाला, 'चौकशी समाप्त होत आहे. तरीही ग्रँडेटचा चाकू ठेवून घ्या ! सर्वजण ताबडतोब कामावर जा ! अर्थात आजारी सोडून. पॅपिलॉन, तुला बरं नाही ?'

'होय, गव्हर्नर साहेब.'

'तू सूड उगवण्यात मुळीच वेळ गमावला नाहीस, खरं ना ? दुर्दैवानं पुरावा काही मिळत नाही, पुढे मिळेल असंही वाटत नाही. अखेरचं विचारतो, कोणाला स्टेटमेंट द्यायची इच्छा आहे का ? या प्रकरणावर जो कोणी प्रकाश पाडू शकेल, त्याला मी शब्द देतो की त्याला इथून लगेच मेनलॅंडला धाडण्यात येईल.'

पूर्ण शांतता.

आर्मेनियन गटातल्या सगळया लोकांनी आजारी असल्याची वर्दी दिली. ते पाहून ग्रँडेट, गालगानी, जीन आणि ग्रेव्हन यांनीही अखेरच्या क्षणी तसं जाहीर केलं. आता खोलीत दोन्ही गटांचे मिळून नऊजण, घडयाळ दुरुस्त करणारा, ब्लॉकचा म्हातारा प्रमुख आणि इतर दोन-तीन कैदी उरले. म्हाताऱ्यावर रक्तानं माखलेली जमीन साफ करण्याची जबाबदारी होती म्हणून तो एकसारखा कुरकुरत होता.

इतर दोन-तीन जणांपैकी एक 'सिल्व्हेन' होता. त्याच्याविषयी सर्वांना आदर वाटत असे. त्यानं आमच्या दोन गटात वेगवेगळया कोपऱ्यात चाललेली कुजबुज ऐकली. आम्ही आठवडयापुरता शांतता—करार केला होता हे त्याला ठाऊक नव्हतं. म्हणून तो म्हणाला, 'तुम्ही आता यापुढे आपापसात लढत बसणार नाही, अशी मला आशा वाटते—तीन शिलेदार पद्धतीनं !'

'आज तरी नाही,' गालगानी म्हणाला, 'पण नंतर बघू.'

'नंतर कशाला ? आज जे शक्य आहे ते उद्यावर ढकलू नये !' पॉलो म्हणाला, 'पण माझं तरी मत असं आहे की आता आपण एकमेकांना ठार करत बसण्यात काही अर्थ नाही. तुझं काय म्हणणं आहे, पॅपिलॉन ?'

'फक्त एकच सांग : आर्मेनियन काय करणार होता हे तुम्हाला ठाऊक होतं ?'

'माझ्यावर विश्वास ठेव, पपी, आम्हाला कोणालाही त्याची मुळीच कल्पना नव्हती आणि मी त्याला साथ कधीच दिली नसती.'

'तसं असेल तर आपण सर्वांच्या भल्याकरता इथेच का थांबू नये ?' ग्रँडेट म्हणाला.

'आमचंही तेच तर म्हणणं आहे. आता आपण हात मिळवू आणि पुन्हा त्या गलिच्छ प्रकाराबद्दल चर्चा बंद !'

'ओ. के.'

'मी साक्षीदार आहे,' सिल्व्हेन म्हणाला : 'मला खरंच खूप आनंद होतोय्.'

'यावर पुन्हा चर्चा नाही.'

त्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता चर्चमधील घंटा वाजू लागली. ती ऐकल्यावर माझ्या डोळयांसमोर आदला दिवस पुन्हा उभा राहिला : प्रिय मित्राचं निःमं शरीर नष्ट झालंय आणि

आमच्या होडीकडे तो वेगानं येतोय्. चोवीस तासांनंतरही ते दृश्य इतकं धक्कादायक होतं की मी पुन्हा बेचैन झालो. आज आर्मेनियन आणि दुसऱ्याचीही तीच स्थिती होणार !

गाल्गानी गप्प होता. काल काय झालं हे तो जाणून होता. पाय भिंतीवर उंच धरून तो शून्यात नजर लावून बसला होता. घंटानाद होऊन दहा मिनिटं होऊन गेली. तो मला हलक्या आवाजात म्हणाला, 'काल मॅथ्यूला ज्या माशांनी खाल्लं त्यांच्यापैकी आज कोणी हलकट आर्मेनियनला स्पर्श करू नये. नाही तर एकमेकांमुळे ठार झालेले ते दोघंही शेवटी एकाच शार्कच्या पोटात एकत्र यायचे.'

त्या उदार, सच्चा मित्राची अनुपस्थिती माझ्या जीवनात भयानक पोकळी निर्माण करणार होती. त्यामुळे रॉयेलवरून लौकरात लौकर दुसरीकडे जाऊन हालचाल करावी हेच चांगलं. रोज हीच गोष्ट मी स्वतःशी घोकत बसलो होतो.

□

# प्रकरण तेवीस : सुटकेचा नवा प्रयत्न

'सध्या युद्ध चालू असल्यामुळे इथे सुटकेच्या प्रयत्नाबद्दल कडक शिक्षा देण्यात येते, म्हणून खरं तर तसा प्रयत्न करण्याची ही वेळ नव्हे. नाही का, साल्विदिया ?' सोन्याची चार्जर बाळगणाऱ्या इटालियन कैद्याशी मी बोलत होतो. नुकतंच नव्या कायद्या–कानूं-विषयीचं पोस्टर आम्ही वाचलं होतं. मी पुढे म्हणालो, 'तरीसुद्धा अगदी मृत्युदंडाची शिक्षा जरी मिळत असली तरी ती मला पळून जाण्यापासून परावृत्त करू शकत नाही. तुझ्याबद्दल काय ?'

'मीही पळून जायला उतावीळ आहे. इथलं वातावरण आता नाही सहन होत. मग सुटकेचा शेवट कसाही होवो. वेड्यांच्या इस्पितळात मला अटेन्डंट म्हणून ठेवा, अशी मी मागणी केली आहे. तिथल्या औषधालयात दोन पिपं आहेत. प्रत्येकात पन्नास गॅलन मावतात. एकात ऑलिव्ह तेल आणि दुसऱ्यात व्हिनेगार आहे. ती पिपं जर आपण समुद्रापर्यंत नेऊ शकलो आणि एकत्र बांधली तर तराफ्यासारखा उपयोग करता येईल. इस्पितळाच्या भिंतीबाहेर पहारा नसतो. आतही फक्त एकच वॉर्डर आहे. वेड्यांवर काही कैदीच लक्ष ठेवतात. त्यामुळे यत्किंचितही धोका नाही. तू मला तिथे येऊन का सामील होत नाहीस ?'

'अटेन्डंट म्हणून ?'

'ते शक्यच नाही, पॅपिलॉन. तुला चांगलंच ठाऊक आहे की, ते तुला इस्पितळात काम देणार नाहीत. एक तर कॅम्पपासून ते दूर आहे. संरक्षण म्हणावं तसं नाही—आणि तुझ्याविरुद्ध इतर गोष्टी बऱ्याच आहेत; पण तुला तिथे रुग्ण म्हणून प्रवेश मिळू शकेल.'

'झक्क युक्ती! साल्विदिया, एकदा डॉक्टरनं तुम्हाला वेडा ठरवलं की तुम्ही काहीही केलं तरी शिक्षेची भीती नाही. वेड्यांना कोणत्याही गोष्टीबद्दल धरण्यात अर्थ नाही हे मान्य तत्त्व आहे. वेड्याच्या हातून खून होवो किंवा सुटकेचा प्रयत्न; किंबहुना कोणताही गुन्हा घडला तरी कायद्याचे हात त्याच्यापर्यंत पोचू शकत नाहीत. त्यांच्यावरील काही काही उपचार भयानक असतात; पण त्याला इलाज नाही. ते उपचारही सारखे देता येत नाहीत. सुटके-साठी ही चांगली कल्पना आहे.'

'पॅपिलॉन, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. तुझ्यासह पळून जायला मला फार आवडेल. वेडा म्हणून मला येऊन मिळण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न कर! अटेन्डंट या नात्यानं मी तुला कमीत कमी त्रास कसा होईल ते पाहीन. प्रत्यक्षात वेड लागलेलं नसताना धोका-दायक वेड्या लोकांत वावरणं हे तितकं सोपं काम नाही.'

'तू इस्पितळात रुजू हो, रोमियो. मी सगळ्या गोष्टी काळजी-पूर्वक योजतो. वेडाची पहिली पायरी काय असते, ती मी आधी माहिती मिळवतो. त्यामुळे डॉक्टरची पक्की खात्री पटेल. ही कल्पना अजिबात वाईट नाही.'

याबाबत मी गंभीरपणानं अभ्यास सुरू केला. तुरुंगाच्या वाचना-लयात त्या विषयावर एकही पुस्तक नव्हतं. म्हणून मी कैद्यांबरोबरच चर्चा सुरू केली. अनुभवी लोकांकडून मला बरीचशी उपयुक्त माहिती मिळाली. काही गोष्टी सगळ्या वेड्यांमध्ये एकसारख्या आढळतात.

१. सगळ्या वेड्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस खूप वेदना होतात.

२. बहुधा त्यांच्या कानात आवाज ऐकू येतो.

३. रात्री स्वस्थ झोप कधीही लागत नाही. एका स्थितीत न राहता ते विमनस्कपणे हालचाल करतात किंवा दचकून उठतात. शरीर थरथरतं आणि केव्हा स्फोट होईल ते सांगता येत नाही.

आता मला एवढंच करायचं होतं की ही सारी लक्षणं माझ्यात असल्याचं ध्यानात आणून देणे. बरं ते वेडही पराकोटीचं दाखवता कामा नये, नाही तर निर्दय वॉर्डर जालीम उपाययोजना करतात. काटेरी टोप, मारहाण, अन्न कमी करणे, ब्रोमाइड इंजेक्शन्स, थंड किंवा उकळत्या पाण्यात स्नान इ. माझा अभिनय उत्तम झाला तर डॉक्टरनं आपण होऊन यायला पाहिजे.

मी स्वतःच वेडाचं खोटं नाटक करीन असा त्यांना संशय येण्याची शक्यता नव्हती. निदान ही गोष्ट तरी माझ्या बाजूनं होती. माझ्या-पुढेही दुसरा मार्गच नव्हता. त्यांनी मला डेव्हिल बेटावर पाठवण्यास नकार दिला होता. मॅथ्यूच्या खुनामुळे यापुढे मला कॅम्पवर राहणं अशक्य झालं होतं. माझ्या मनाची पूर्ण तयारी झाली. सोमवारी आजारी लोकांच्या यादीत माझं नाव जाणार होतं. दुसऱ्या कोणी तरी मी आजारी असल्याचं सांगणं अधिक हिताचं. मला आता ब्लॉकमध्ये विचित्रपणे वागलं पाहिजे. म्हणजे ब्लॉकचा प्रमुख ते पहारेकऱ्याला सांगेल आणि तो स्वतःच माझं नाव यादीत टाकील.

पुढचे तीन दिवस मी अजिबात झोपलो नाही. दाढी नाही की स्नान नाही. रोज रात्री अनेक वेळा हस्तमैथुन केलं. खाणं अगदी कमी करून टाकलं. काल शेजाऱ्याला त्यानं माझ्या जागेच्या न घेतलेल्या

फोटोबद्दल जोरात जाब विचारला. त्यामुळे अस्वस्थ होऊन त्यानं आपली जागा बदलली. सकाळी सूप वाटताना ते एका टबमधे आणण्यात येई. त्या दिवशी मी टबपाशी गेलो आणि सर्वांच्या देखत त्यात लघवी केली. हॉलमधलं वातावरण तप्त झालं, पण मी चेहेराच असा काही केला होता की पुढे येण्याचं धाडस कोणीही केलं नाही. फक्त ग्रँडेट तेवढा म्हणाला, 'पॅपिलॉन, हे काय करतोय्स?'

'ते यात मीठ घालायला विसरलेत ना, म्हणून,' आणि इतरांकडे अजिबात लक्ष न देता मी माझा मग् सूपसाठी पुढे केला. सर्वत्र स्मशानशांतता पसरली होती. सगळ्यांचं लक्ष माझ्यावर केंद्रित झालेलं असताना मी सूप फस्त करून टाकलं.

या दोन घटना घडल्यानंतर अपेक्षेप्रमाणे आज सकाळी डॉक्टर आला.

'काय डॉक्टर, आता ठीक आहात ना ? आहात का नाही?' मी प्रश्नाचा पुनरुच्चार केला. डॉक्टरनं माझ्याकडे चकित होऊन पाहिलं. मी त्याच्याकडे बारकाईनं टक लावून बघत राहिलो.

'मी ठीक आहे,' तो म्हणाला, 'पण तुला बरं नाही का ?'

'म्हणजे ?'

'तुझं नाव यादीत कसं आलं ?'

'मला काय धाड भरलीय् ? त्यांनी सांगितलं की तुम्हीच आजारी आहात, पण ते खरं नाही, हे पाहून मला फार बरं वाटतंय्. गुडबाय.'

'एक मिनिट, पॅपिलॉन. तिथे, माझ्यासमोर बैस. माझ्याकडे बघ.' असं म्हणून त्यानं छोटयाशा टॉर्चनं माझे डोळे तपासले.

'तुम्हाला हव्या त्या गोष्टी दिसल्या का, डॉक्टर ? टॉर्चचा प्रकाश अगदी कमी आहे, तरीही मी म्हणतो ते तुम्हाला कळलं असेल. सांगा ना, दिसलं काही ?'

'काय दिसलं का ?'

'मूर्खांसारखं काय विचारताय् ? तुम्ही डॉक्टर आहात का हजाम ? तुम्हाला काही दिसलं तरी नाही किंवा मला ते सांगायचं तरी नाही. ते आता लपून बसले असतील ना !' माझे डोळे थकव्यामुळे चमकू लागले होते. दाढी, अंघोळ आणि झोप नसल्यामुळे माझा अवतार बघण्याजोगा होता, अर्थात तो पथ्यावरच पडला. पहारेकरी मजेत बघत बसले होते. पण त्यांनी हस्तक्षेप करावा अशी कोणतीही हालचाल मी केली नव्हती. डॉक्टर मला शांत करण्याच्या हेतूनं थोपटत होते आणि खुलवण्याचा प्रयत्न करीत होते. मी बसूनच होतो.

'होय, पॅपिलॉन. मला ते सांगायला आवडणार नाही, पण सगळं काही दिसलं आहे.'

'तुम्ही खोटं बोलताय्, डॉक्टर. तुम्हाला काहीच दिसलेलं नाही. मी म्हणत होतो ते माझ्या डाव्या डोळ्यातले तीन ठिपके. कुठेच बघत नसताना किंवा वाचतानाच फक्त ते दिसतात पण जेव्हा आरसा समोर घेतो तेव्हा डोळा स्वच्छ दिसतो, ठिपके अदृश्यच होतात. त्यांच्याकडे बघायचा प्रयत्न केला की ते लपून बसतात.'

'याला रुग्णालयात ताबडतोब हलवा! तो पुन्हा कॅम्पवर परत येणार नाही. तुला बरं वाटतंय् ना, पॅपिलॉन ? कदाचित थकव्यामुळं असं होत असेल. म्हणूनच तू काही दिवस रुग्णालयात विश्रांति घे ! चालेल ना ?'

'माझी काही हरकत नाही. इथे काय अन् तिथे काय–शेवटी बेटावरच.'

पहिली पायरी यशस्वी पार पडली. अर्ध्या तासानंतर मी भरपूर प्रकाश असलेल्या रुग्णालयातील खोलीत एका शुभ्र पलंगपोसाच्या कॉटवर आरामात पडलो होतो. दारावर लेबल अडकवलं होतं : 'निरीक्षणाखाली.'

हळूहळू त्यांची माझ्या वेडेपणाबद्दल खात्री पटत गेली. वेडाच्या प्राथमिक अवस्था मी अभ्यासपूर्वक दाखवत होतो. बारीकशी चूक देखील होऊन चालणार नव्हती. कारण सोंग उघडकीस आलं तर गच्छंतीच. तरीही इस्पितळात दाखल होण्यासाठी खेळ चालू ठेवायलाच पाहिजे. सुटकेसाठी त्या मित्राची गरज होती. सुटका ! या जादूच्या एकाच शब्दानं माझ्यात प्रचंड शक्ती निर्माण होत होती. दोन पिपांवर बसून इटालियन मित्राबरोबर मेनलँडच्या दिशेनं माझा प्रवास आत्ताच दिसू लागला होता.

डॉक्टरच्या फेऱ्या होत असत. त्यानं माझी नाना प्रकारे दीर्घकाळ तपासणी केली : आम्ही सभ्यपणे आणि मजेत बोलायचो. त्याला काळजी वाटत होती, परंतु अद्यापि पूर्ण खात्री झाली नव्हती. म्हणून माझ्या डोक्यात भयानक वेदना होतात ही गोष्ट आता सांगावी लागणार होती–पहिले लक्षण.

'कसं काय, पॅपिलॉन ? झोप चांगली लागली ना ?'

'थँक्स डॉक्टर. सगळं ठीक आहे. पण झोपेचं म्हणाल तर काही खरं नाही. माझ्या खोलीमागे एक पंप आहे, आहे ना ? पाण्याचा किंवा कसला तरी तो असेल. पण त्याचा एकसारखा होणारा थप्, थप्, थप् आवाज माझ्या डोक्यात अगदी बसलाय्. मागे घणाचे घाव बसतायत् असं वाटत राहतं. रात्रभर तो प्रकार चालतो. ते अगदी सहन होत नाही. शक्य असेल तर माझी खोली बदलाल का ?'

डॉक्टरनं मेडिकल वॉर्डरला लगेच विचारलं की तसा पंप होता का. वॉर्डरनं डोकं हलवलं. 'असू दे. याला दुसऱ्या खोलीत न्या. तुला कुठे जायचंय्, पॅपिलॉन ?

'त्या पंपापासून दूर, कुठेही. तिकडची शेवटची खोली चालेल. थँक यू, डॉक्टर.'

तो गेल्यावर खोलीत पुन्हा एकटा पडलो. बारीकसा आवाज ऐकू आला. फटीतून माझ्यावर देखरेख चालू होती. तो डॉक्टरच असणार. म्हणून मी मागच्या भिंतीवर हाताची मूठ जोरात आपटून मोठ्यानं पुटपुटलो–पण फार मोठ्यानं नाही–'पुरे पुरे ! तू काय चोवीसच्या चोवीस तास बागेला पाणी घालणार आहेस का, चांडाळा ?' आणि उशीखाली डोकं खुपसून आडवा झालो.

झडप बंद झाल्याचा आवाज आला नाही, पण पावलं दूर जात होती हे मात्र समजलं. म्हणजे हेरगिरी करणारी व्यक्ती डॉक्टरच होती तर.

दुपारी माझी खोली बदलली. सकाळचं नाटक उत्तम वठलं होतं, कारण तीन-चार खोल्यांइतकं अंतर मला चालत नेण्यासाठी दोन वॉर्डर आणि दोन कैदी आले होते. ते माझ्याशी बोलत नव्हते म्हणून मीही काही बोललो नाही. निमूटपणे त्यांच्यामागोमाग चालत गेलो. दोन दिवसांनंतर दुसरं लक्षण–कानात आवाज.

'काय म्हणतोस, पॅपिलॉन ? मी दिलेलं मासिक वाचलंस ?'

'नाही. मी नाही वाचलं. कालचा सारा दिवस आणि अर्धी रात्र मी कानात शिरलेल्या डासाला बाहेर पिटाळण्याच्या खटपटीत होतो. कापडाची सुरनळीही आत घालून पाहिली, पण काही उपयोग नाही. गूं, गूं, हूं असले आवाज आपले चालूच; हा काय प्रकार आहे डॉक्टर ? कानात पाणी घालून त्यांना बुडवायचं का ?'

बोलत असताना मी डोकं एकसारखं हलवत राहिलो. हे त्याच्या लक्षात आलं होतं. त्यानं माझे हात हातात घेऊन थेट डोळ्यात पाहिलं. त्याची काळजी माझ्या ध्यानात आली. 'होय, पपी; आपण त्यांना बुडवून टाकू. चेतल, सिरींज घेऊन ये ! '

रोज सकाळी थोड्याफार फरकानं हाच प्रसंग घडत असे. पण तरीही इस्पितळात मला पाठवण्याचा निर्णय तो घेत नव्हता. ब्रोमाइडच्या इंजेक्शनवरच काम चालू होतं. एक दिवस चेतल म्हणाला, 'तूर्त ठीक आहे. डॉक्टरला चांगलाच धक्का बसला आहे. पण तुला इस्पितळात पाठवण्यात अजून कित्येक दिवस जाऊ शकतील. त्यानं लवकर निर्णय घ्यावा असं वाटत असेल तर तू धोकादायक होऊ शकशील असं त्याला वाटलं पाहिजे.'

'काय मित्रा, पॅपिलॉन ?' खोलीचं दार उघडून आत येताना डॉक्टर म्हणाला. बरोबर एक वॉर्डर आणि चेतलही होते.

'तुमचा मानभावीपणा पुरे झाला, डॉक्टर ! मी धडाक्यानं बोलणं सुरू केलं. 'मी आजारी आहे हे तुम्हाला चांगलं ठाऊक आहे. मला छळणाऱ्या त्या माणसाला तुम्हीहो सामील आहात असं आता मला वाटू लागलंय् ?

'तुला कोणं छळतंय् ? केंव्हा आणि कसं ?'

'जसं काही तुम्हाला ठाऊकच नाही. ठीक आहे, मी सांगतो. माझ्या त्या शत्रूनं केयेनच्या रुग्णालयातून विजेचे उपचार देणारं यंत्र पळवून आणलंय्. मला झोप लागायला लागली की तो त्याचं बटन हळूच दाबतो. त्यामुळं माझ्या पोटात आणि मांडीला प्रचंड धक्का बसतो. माझं शरीर चांगलं सहा इंच हवेत उडतं. एखाद्या स्प्रिंग-सारखं सगळं अंग थरथरत असतं. यापुढं मी ते सहन करणार नाही. डॉक्टर, मी तुम्हाला सांगून ठेवतो. त्या माणसाला मदत करताना मला कोणीही दिसला तर मी त्याचे तुकडे तुकडे करून टाकीन ! जवळ शस्त्र नसलं तरी माझ्यात खूप शक्ती आहे. निदान त्याचा गळा तरी नक्कीच आवळीन. जगातल्या कुठलाही इसम मग समोर येवो आणि तुमचं उपरोधिक 'कसं काय पॅपिलॉन ? ' 'गुड मॉर्निग पॅपिलॉन' हे सुद्धा यापुढे बंद करा ! एकदाच सांगून ठेवतो ! '

या प्रवेशाचा चांगलाच फायदा झाला. चेतलनं सांगितलं की डॉक्टरनं पहारेकऱ्यांना काळजी घ्यायला बजावलं होतं. दोघं तिघं जण जवळ असल्याशिवाय दार उघडू नये आणि माझ्याशी नीट बोलावं अशीही सूचना दिली होती. 'त्याचं माथं आता फिरलंय्,' डॉक्टर म्हणाला, 'त्याला त्वरेनं इस्पितळात पोचवलं पाहिजे! '

मला बांधून नेऊ नये यासाठी चेतल म्हणाला होता, 'त्याला न्यायची जबाबदारी माझी. फक्त एक वॉर्डर बरोबर असू द्या ! '

'काय पपी, रात्रीचं जेवण चांगलं झालं ना ? '

'होय चेतल. ते खूप स्वादिष्ट होतं.'

'तुला माझ्याबरोबर बाहेर यायला आवडेल का ? '

'कुणीकडे ? '

'आम्ही इस्पितळापर्यंत जातोच आहोत काही औषधासाठी. तू आलास तर तेवढंच चालणं होईल.'

'हरकत नाही. चला.' आणि आम्ही तिघांनीही रुग्णालय सोडून इस्पितळाचा रस्ता धरला. वाटेत चेतल एकसारखा बोलत राहिला. तिथे जवळजवळ पोचल्यावर तो म्हणाला, 'तुला कँपचा कंटाळा नाही आला, पपी ? '

'केव्हाच. अगदी वीट आलाय्. कारबोनेरी गेल्यापासून तर जास्तच.'

'मग काही दिवस तू इस्पितळात का राहत नाहीस ? म्हणजे ती विजेचे धक्के देणारी व्यक्ती तरी इथपर्यंत पोचू शकणार नाही.'

'मस्त कल्पना आहे, मित्रा. पण ते मला आत कसे घेतील ? माझं डोकं पूर्ण ताळ्यावर आहे, मग ?

'ते माझ्यावर सोपव ! मी तुझ्यासाठी शब्द टाकीन!' वॉर्डर खुषीत येऊन म्हणाला. मी चेतलच्या सापळ्याला बळी पडलो असं तो समजत होता.

आणि अशा रीतीनं मी शंभर वेड्यांमध्ये येऊन सामील झालो.

वेड्यांबरोबर काळ काढणं ही काही साधीसुधी गोष्ट नव्हती. खोल्या साफ होईपर्यंत आम्ही बाहेर मोकळ्या जागेत व्यायाम करीत असू. रात्रंदिवस सगळ्यांना नग्नावस्थेत राहावं लागे. सुदैवानं हवा उबदार होती. मला स्लिपर घालायची परवानगी होती.

ऑर्डर्लीनं मला नुकतीच एक पेटलेली सिगारेट दिली होती. उन्हात बसून मी विचार करीत होतो. इथे येऊन पाच दिवस झाले तरी अजून रोमिओ सात्त्विदियाची गाठ पडली नव्हती.

एक वेडा जवळ आला. त्याचा इतिहास मला ठाऊक होता. याच्या सुटकेसाठी स्वतःचं घर विकून त्याच्या आईनं पंधरा हजार फ्रँक्स पाठवले होते. मधला पहारेकरी त्यातले पाच हजार ठेवून घेऊन दहा याला देणार होता, पण त्यानं सगळेच हडप केले आणि केयेनला पळाला. हे या बिचाऱ्याला कळल्यावर त्याचं डोकंच फिरलं आणि त्यानं वॉर्डरांवर हल्ला चढवला. परिणती : तपासणी होऊन इस्पि-तळात दाखल होणे. बरेच दिवस तो इथे होता.

'तू कोण आहेस ? ' तो मला प्रश्न विचारत होता. वय फार तर तीस असेल. 'कोण मी ? का बरं ? तुझ्यासारखाच एक पुरुष आहे, कमी नाही आणि जास्त नाही.' 'काय मूर्ख आहेस तू पुरुष आहेस ते दिसतंच आहे. तुला स्त्रीची इंद्रियं नाहीत त्याअर्थी. मी तुला नाव विचारलं होतं. 'पॅपिलॉन. 'पॅपिलॉन ? तू फुलपाखरू आहेस ? गरीब बिचारा. फुलपाखरं उडू शकतात. त्यांना पंख असतात. तुझे पंख कुठे गेले ?' 'हरवले.' 'तू ते शोधून काढले पाहिजेस, म्हणजे तुला पळून जाता येईल. रक्षकांना पंख नसतात. मला तुझी सिगारेट दे!' आणि त्यानं माझी सिगारेट हिसकावूनच घेतली. माझ्या समोर बसून तो आनंदानं झुरके मारू लागला.

'आणि तू कोण आहेस ?' मी त्याला विचारलं.

'मी ? मला सगळे भोळा-भाबडा म्हणतात. दर खेपेला मला माझी कोणतीही वस्तू द्यायची असली की ते चोरतात.' कशी काय ?' 'ती त्यांची नेहमीचीच पद्धत आहे. म्हणून मी रोज जमतील तितक्या पहारेकऱ्यांना खतम करतो. कालच दोघांना फासावर चढवलं.' 'ते का बरं ?' 'त्यांनी माझ्या आईचं घरच चोरलं.

आईनं माझ्यासाठी ते पाठवलं होतं, तर मधेच त्यांनी चोरलं. त्यांना खूप आवडलं होतं ना. म्हणूनच मी शिक्षा दिली. चुकलं का काही ?'

' मुळीच नाही. आता त्यांना घराचा मुळीच उपयोग होणार नाही.'

' तो समोरचा जाडचा रक्षक दिसतोय् का ? तो पण आमच्या घरात राहतो. आज मी त्याचा काटा काढणार आहे.' एवढा संवाद झाल्यावर तो तरातरा निघून गेला.

वा ! काय वातावरण आहे ! वेड्या लोकांच्यात राहायला लागणं हा काही सुखद प्रकार नव्हताच, शिवाय धोकाही होता. रात्रभर माझ्याभोवती त्यांचे गुरगुरण्याचे आणि किंचाळण्याचे आवाज चालायचे. पौर्णिमेच्या दिवशी तर त्यांचा बेफामपणा विचारूच नका. वेड्या लोकांच्या स्थितीवर चंद्राचा परिणाम कसा काय होत असणार ? सांगता येत नाही, पण अनेक वेळा मी तसं पाहिलं आहे.

निरीक्षणाखाली असलेल्या वेड्यांबद्दल रोज अहवाल दिला जाई. माझी त्यांनी उलटसुलट तपासणी केली. खोलीतून बाहेरच न काढणे, एक वेळचं अन्न तोडणे, वेडेवाकडे–असंबद्ध प्रश्न विचारणे इ. आणि मी तक्रार करतो का ते पाहणे; पण मी त्यांना पुरून उरलो. दर खेपेस माझ्या कानांवर एक वाक्य पडे : 'नाही. याचं डोकं ठिकाणावर नाही. गडबड आहे.'

अजूनही डॉक्टर मला 'पूर्ण वेडा' असा शेरा द्यायला तयार नव्हते. शेवटी मी पुढचं पाऊल टाकायचं ठरवलं. रोज जेवताना माझ्या शेजारी एक धूड बसायचं. त्याच्यात शक्ती प्रचंड होती. स्वतःचं खाऊन झाल्यावर तो माझ्या थाळीतले पदार्थही उडवायचा आणि बघता बघता फस्त करायचा. आज मी एका दगडात दोन पक्षी मारायचं ठरवलं. नेहमीप्रमाणे 'आयव्हॅनो'–तो स्वतःला आयव्हॅनो समजायचा–माझ्या शेजारी बसला. त्याच्या वाटचाची लेन्टिल्स संपल्यावर माझी थाळी त्यानं सरळ उचलली. टेबलावर समोरच पाणी ठेवलेलं एक मातीचं भांडं होतं–चांगलं मोठं. त्याच्या लक्षात येण्यापूर्वी मी ते भांडं वेगात त्याच्या डोक्यावर फोडलं. ते जनावर भयानक किंचाळून खाली कोसळलं. त्याबरोबर सगळे वेडे एकमेकांवर तुटून पडले. शस्त्रं होती हातातल्या थाळ्या. निरनिराळे वेडेवाकडे आवाज सर्व दिशांना पसरत होते. धक्काबुक्की रंगात आली.

चार निर्दय वॉर्डरांनी मला अलगद उचलून खोलीत नेऊन टाकलं. त्यांच्यात दयामायेचा अभावच होता. मीही पाय झाडत किंचाळत होतो. 'आयव्हॅनोनं माझी पिशवी आणि ओळखपत्र पळवलंय्.' या युक्तीचा योग्य परिणाम झाला. डॉक्टरांनी हवा तो शेरा द्यायचं ठरवलं. सगळ्या पहारेकऱ्यांनी त्याला पुष्टी दिली. आयव्हॅनोला चांगली तीन इंचाची जखम झाली होती. डोक्याला मोठं बँडेज बांधून तो हिंडताना दिसला. सुदैवानं त्यानंतर आम्ही दोघं एका वेळी बाहेर एकत्र आलो नाही.

शेवटी रोमियोची गाठ एकदाची पडली. त्यानं दवाखान्याच्या किल्लीची नक्कल बनवून घेतली होती. तिथेच ती पिपं होती. दोन्ही पिपं एकत्र बांधण्यासाठी पुरेशी तार मिळवण्याच्या खटपटीत तो होता. मी त्याला दोरही पैदा करायला सांगितला. न जाणो, समुद्रात तार तुटली तर ! त्याला आणखी तीन किल्ल्या तयार करायच्या होत्या. एक माझ्या खोलीची, दुसरी व्हरांड्याच्या लगतच्या दाराची आणि तिसरी इस्पितळाच्या मुख्य दाराची. गस्त फारशी नसायचीच. दाराशी फक्त एक वॉर्डर असायचा. तोही सकाळी नऊ ते पाच. इतरजण झोपाच काढायचे. अशा प्रकारे सगळं साफ होतं, फक्त वेळाचाच काय तो प्रश्न. अजून फार तर महिना.

मी बाहेर यार्डमधे आल्यावर एका रक्षकानं मला एक भिकार सिगार दिला. कसा का असेना, मला त्याची गरज होती. मी समोर जन्माचे वेळी असलेल्या नैसर्गिक अवस्थेत वावरणाऱ्या कळपाकडे नजर टाकली. कोणी गात होते, कोणी रडत होते, कोणी गुरगुरत किंवा विचित्र चाळे करत होते. मला त्यांची कीव आली. त्यांच्या उघड्या शरीरावर रक्षकांनी केलेल्या किंवा आपापसातील मारहाणीच्या खुणा दिसत होत्या. फार वाईट अवस्थेत सगळेजण होते. फ्रान्समध्ये किती वेड्यांवर मानसोपचार–तज्ज्ञांकडून उपचार होत असतील ?

एथे एकेकजण कुत्र्यासारखा मरणार ! त्यांच्यात राहणं म्हणजे आपल्याही प्राणाशी गाठ आहे; पण करता काय ? सुटकेसाठी तोच एक मार्ग शिल्लक होता. पकडलो गेलो तरी मृत्युदंड मिळणार नाही.

रोमिओची तयारी जवळजवळ पूर्ण झाली होती. फक्त माझ्या खोलीची चावी अद्याप बनली नव्हती. चांगला दोर मिळाला होता. त्या दृष्टीनं सर्व काही सुरळीत पार पडत होतं.

जितक्या लवकर हालचाल करता येईल तितकं आवश्यक होतं, कारण वेडाचं नाटक बजावणं दिवसेंदिवस जड जात होतं. वेड्यांची संगतही. स्वतंत्र खोलीत कायम ठेवावं म्हणून मला एकसारख्या नव्या विक्षिप्त आणि बेफाम गोष्टी कराव्या लागत होत्या.

एकदा मी वेडाचा इतका बेमालूम झटका दाखवला की त्यांनी मला दोन ब्रोमाइडची इंजेक्शन्स देऊन गरम पाण्याचं स्नान घालण्यासाठी एका खोलीत नेलं' एका टबमधे मला बसवून गळ्यापर्यंत कॅनव्हसच्या पट्ट्यांनी जखडून टाकलं. फक्त डोकंच तेवढं उघडं होतं. पाण्याचं तपमान कमीजास्त करण्यासाठी काही चाकं होती. जरुरीप्रमाणे गार किंवा कढत पाणी टबमधे सोडता येई. दोन तास मी बसून राहिलो होतो. इतक्यात आयव्हॅनोनं त्या खोलीत प्रवेश केला. माझी भीतीनं गाळणच उडाली. आता हा शक्तिमान प्राणी माझा गळा आवळणार. बांधलो गेल्यामुळे मला बचावही करता येणार नव्हता.

जवळ येऊन त्यानं माझा चेहेरा काळजीपूर्वक न्याहाळला. त्याला ओळख पटली असावी. मदतीसाठी ओरडावं तर तो जास्तच बिथरण्याची शक्यता. मी डोळे मिटून वाट बघत बसलो. ते भीतीचे क्षण मी कधीही विसरू शकणार नाही. शेवटी तो तिथून हलला आणि तपमाननिरोधक चाकापाशी जाऊन ती गरगरा फिरवली. मी उकळत्या पाण्यात भाजून निघू लागलो. जिवाच्या आकांतानं मी किंचाळू लागलो. तो शांतपणे निघून गेला. सगळ्या खोलीत पाण्याची वाफ पसरल्यामुळे श्वासही कोंडला गेला. सुदैवानं मदत आली. वाफ खोलीबाहेर गेल्यामुळे पहारेकरी धावत आले. माझी मुक्तता करून लगेच रुग्णालयात उपचारांसाठी हलवण्यात आलं. मी भयानक रीतीनं भाजलो होतो. विशेषतः मांड्या आणि गुप्त भागाची तर कातडीच जळाली होती. मॉर्फियाच्या इंजेक्शनमुळे एक दिवस मी गुंगीत राहिलो. नंतर डॉक्टरनं मला काय झालं ते विचारलं. मी सांगितलं की 'पाण्यात अग्निदेवता प्रगट झाली होती'. कोणालाच काही बोध झाला नाही.

रोमियोनं माझ्या जखमांवर मलमपट्टी केली. पिक्रिक ॲसिडचं मलम लावलं. त्याची तयारी पूर्ण झाली होती. रुग्णालयातून पळ काढणं जास्त सोपं होतं. इथली किल्ली तो लवकरच बनवून घेणार होता. कुलपाचा ठसा साबणावर त्यानं आधीच घेतला होता. उद्या तेही काम पूर्ण होणार. आता सगळं काही माझ्यावर अवलंबून होतं. मला बरं वाटलं की झोपाळू रक्षकांच्या गलथानपणाचा फायदा घेऊन पसार व्हायचं.

आज मध्यरात्री एक ते पाचच्या दरम्यान पळ काढायचं ठरलं. रेमिओ कामावर आला नव्हता. वेळ वाचवण्यासाठी तो रात्री अकरा वाजताच व्हिनेगारनं भरलेलं पीप रिकामं करणार होता. तेलाचं

पीप आम्ही तसंच ढकलत नेणार होतो, कारण उसळत्या समुद्रात तेलामुळे तरंगायला सोपं जाणार होतं.

माझ्याकडे जाडजाभरडया कापडाची अर्धी चड्डी होती, लोकरीचा स्वेटर आणि चांगल्यापैकी एक चाकू. शिवाय एका वॉटरप्रूफ पिशवीत सिगारेट्स आणि लायटर. रोमियोनं तेलात भाजलेलं मक्याचं पीठ साखर घालून असंच घेतलं होतं. संध्याकाळ होऊन गेली. मी कॉटवर बसून रोमिओची वाट बघत होतो. माझं हृदय धडधडत होतं. काही वेळातच सुटकेला सुरुवात होणार होती. या खेपेला तरी ईश्वर पाठीशी राहो.

मध्यरात्र.

'पपी, चला!' मी त्याच्या मागोमाग गेलो. त्यानं त्वरेनं दार बंद केलं आणि किल्ली व्हरांड्यात लपवून ठेवली. 'लवकर, लवकर.' आम्ही औषधालयात पोचलो; दार उघडचं होतं. रिकामं पीप उचलणं सोपं होतं. अंधारातून मी पीप ढकलत निघालो. आवाज विशेष येत नव्हता. रोमिओ बळकट असल्यामुळे भरलेलं तेलाचं पीप ढकलत नेणं त्याला अवघड गेलं नाही. उतारही होताच.

'हळूहळू; ते फार पुढं जाऊ देऊ नको.' मी त्याची वाट पाहत थांबलो. पीप निसटलं तर वाटेत मी अडवणार होतो. मी उलटा खाली सरकत होतो, म्हणजे पुढे मी आणि मागे पीप. खालच्या रस्त्यापर्यंत आम्ही विनासायास पोचलो. समुद्राकडे जाण्यासाठी असलेला तो रस्ता लहानसाच होता. त्यानंतर मात्र खडकांवरून जाण्याचे कष्ट घ्यावे लागणार होते.

'पीप रिकामं कर: ते भरलेल्या स्थितीत नेणं अवघड जाईल.' वारा वेगानं वाहत होता, त्यामुळे राक्षसी लाटा जोरात खडकांवर आदळत होत्या. छान, पीप रिकामं झालं. नंतर दोन्ही पिपं एकत्र घट्ट बांधली. पण ती खडकांवरून उचलून नेणं त्रासदायक होतं. प्रत्येकी पन्नास गॅलन मावण्याची क्षमता असल्यामुळे त्यांचा आकार अवाढव्य होता. उचलून नेणं गैरसोयीचं होतं. मित्रानं ठरवलेली जागाही अवघडच होती.

'सावकाश,' 'नीट,' 'हळूहळू,' 'थोडं वर,' 'लाटांकडे लक्ष दे, आपटशील.' अशा एकमेकांना सूचना देत आम्ही पाण्याजवळ जात होतो.

'पॅपिलॉन, काळजी घे; नाही तर एखाद-वेळेला हातपाय तुटायचा.'

'हे बघ रोमिओ, शांत राहा. पुढे समुद्राकडे तरी जा किंवा आहेस तिथेच उभा राहा. ठीक. मी ओरडलो की पीप उचलून पुढे हो. त्याच वेळी मीसुद्धा पुढे होतो. त्या विशिष्ट लाटेबरोबर आपण नीट आत गेलो तर पुन्हा खडकावर येऊन आपटणार नाही. पण तोपर्यंत आपल्या जागी पाय रोवून उभं राहायला पाहिजे. मोठ्या लाटा अंगावर येऊन आदळल्या तरी.'

माझ्या मित्राला मी मोठ्यानं या सूचना दिल्या. वारा आणि लाटांच्या प्रचंड जोरामधूनही त्याला त्या ऐकू गेल्या असाव्यात. एका मोठ्या लाटेनं आम्हाला जोरात तडाखा दिला. त्याच क्षणी ओरडून मी पिपावर स्वार झालो. त्यानंही तसंच केलं असावं. कारण पुढच्या क्षणी आम्ही दोघंही आत ओढले गेलो होतो. माझ्याआधी तोच पिपावर चढून बसला. दोर आणि तारेनं पिपं बांधताना आमच्या दोन्ही पिपांमध्ये आठ-दहा फुटांचं अंतर ठेवलं होतं. एकमेकांच्या ताणामुळे आम्ही कायम तेवढ्याच अंतरावर राहणार होतो.

परतणाऱ्या लाटेनं इतक्या वेगानं आम्हाला उडवलं की एखाद्या पिसाप्रमाणे आम्ही दोघंही पिपांसह आत समुद्रात असलेल्या अणकुचीदार दगडावर जाऊन आदळलो. दणका इतका जबरदस्त होता की पिपांचे पार तुकडे-तुकडे झाले. पुढच्या लाटेबरोबर मी सुमारे वीस यार्ड वाहून गेलो. मागे वळून मी जोरजोरात हात मारू लागलो आणि किनाऱ्याकडे जाणाऱ्या उफाळत्या लाटेबरोबर पुन्हा खडकांवर फेकला गेलो. ताबडतोब दोन खडकांमध्ये मी आश्रय घेतला, त्यामुळे डोक्यावरून प्रचंड लोंढा परत जाऊनही मी आत ओढलो गेलो नाही. धडपडत, रांगत मी कोरड्या जमिनीपर्यंत आलो; पण माझ्या लक्षात आलं की मूळच्या ठिणाणापासून चांगला शंभर यार्ड दूर येऊन पडलो होतो.

कशाचीही काळजी न करता मी ओरडलो, 'साल्विदिया! रोमिओ! तू कुठे आहेस?' उत्तर मिळालं नाही. खचून जाऊन खाली कोसळलो. स्वेटर आणि चड्डी काढून टाकली. पुन्हा पहिल्यासारखा नागडा झालो—पायात फक्त स्लिपर्स. परमेश्वरा, माझा मित्र कुठे गेला? परत एकदा जिवाच्या आकांतानं ओरडलो, 'तू कुठे आहेस, रोमियो?' उत्तर फक्त वारा, समुद्र आणि लाटांकडून मिळालं. मी तिथे किती वेळ थांबलो ते सांगता येणार नाही. जबरदस्त धक्क्यानं खचून जाऊन, शारीरिक आणि मानसिक त्राण पार नष्ट झालेल्या स्थितीत. संतापाच्या अतिरेकामुळे मी रडूच लागलो.

लाटांकडे तोंड करून—ज्यांनी आमचं सर्व काही वाहून नेलं होतं—मी आकाशाकडे हात नेले आणि देवाला भरपूर शिव्या दिल्या. 'हलकट, डुक्कर, निर्लज्ज; माझा असा सूड उगवताना तुला लाज नाही वाटली? तुला दयाळू म्हणून सगळे ओळखतात ना? तू तर शुद्ध जनावर आहेस. मला आता ते पूर्ण उमगलं आहे. मी पुन्हा कधीही तुझं नाव घेणार नाही. तुझी तशी लायकीच नाही.'

वारा संथ झाला होता. थोड्या वेळानं जरा शांत झाल्यावर मला वस्तुस्थितीची जाणीव झाली. 'इस्पितळात परत जायला पाहिजे आणि शक्य झालं तर रुग्णालयात पहिल्या जागी जाऊन पडणं चांगलंच. आपलं नशीब ठिकाणावर असेल तर त्यात काहीच कठिण नाही. काय, नशीब? हो. नशीबच.' [क्रमशः]

---

'समुद्रात शिरल्यावर उसळत्या लाटांबरोबर पुन्हा परत मागे येऊन खडकावर आदळलो नाही म्हणजे झालं!'

'काळजी नको,' चँग म्हणाला. 'आम्ही तसा प्रयत्न केलेला आहे. एकदा का तुम्ही पुढे सरकलात की डेव्हिल बेटावर पुन्हा नक्की येत नाही. रॉयेलवरही नाही.'

सिल्व्हेनचं मन वळवायला मला एक आठवडा लागला. त्याचं हाडपेर मजबूत होतं, उंची पाच अकरा आणि शरीर पीळदार. मेनलँडला समुद्रातून पोचायला किती वेळ लागेल हे त्यानं विचारल्यावर मी उत्तर दिलं:

'प्रामाणिकपणे सांगायचं तर, सिल्व्हेन, नक्की काहीच सांगता येणार नाही; सर्व काही हवामानावर अवलंबून आहे. पण लाटांचा आणि ओहोटीचा जोर लक्षात घेतला तर अंदाजे अठ्ठेचाळीस ते साठ तासांच्या दरम्यान आपण जंगलात फेकले जाऊ. पुढचं पुढे.'

# यशस्वी पलायन

पुढील अंकी

पुस्तके

# मराठी कवितेचे नवे आकाश–विज्ञान-कविता

## ' लिटमस ' कवितासंग्रहाच्या निमित्ताने

डॉ. व्ही. आर. देशमुख

अणुपरमाणूंचे उल्लेख तर ज्ञानेश्वरांपासूनच कवितेत येतात. केवळ असलेच पारिभाषिक शब्द वापरून विज्ञान-कविता लिहिली गेली असे कित्येक जाणकार समीक्षक अजाणतेपणाने बोलून किंवा लिहून जातात. विज्ञान-कविता हा शब्द प्रथम रूढ झाला तो कवी शिरीष गोपाळ देशपांडे ह्यांच्या आगळ्या कवितांच्या संदर्भात! विज्ञान-कवितेचा म्हणजे देशपांड्यांच्या ' लिटमस'चा साक्षेपी विचार प्रस्तुत समीक्षेत करावयाचा आहे.

' लिटमस 'मधील विज्ञानेतर कवितांवरून देशपांड्यांनी काव्य स्वतःत किती समर्थपणे जिरवले आहे हे ठळकपणे ठसते. पण ते पारंपारिक काव्याच्या तसेच रूढ झालेल्या नवकाव्याच्या मर्यादेत राहू इच्छित नाहीत हेही जाणवते. त्यांचे पंख त्यांना स्वस्थ बसू देत नाहीत. त्यांना नवे आकाश हवे आहे आणि विज्ञानकवितेत त्यांना नवे आकाश गवसल्याचे कळते. फक्त ते त्या आकाशापर्यंत पोहोचायचे आहेत. अजून अवकाशही आहे. पण ते मार्गस्थ आहेत हे त्यांच्या सादेश वेगावरून जाणवते.

' व्हेक्टर कॅलक्युलसची फडफडताहेत पाने
नुस्ती मॅग्निटयूड वाढवत...डायरेक्शन
न देता ' (पृ. ४३)

हा स्वतःचाच अनुभव कृतीने ते खोडून काढतात.

कवी शिरीष गोपाळ देशपांडे ह्यांनी नागपूर विद्यापीठाच्या गणित विभागाने भरविलेल्या कविसंमेलनात ' लिटमस ' ही कविता म्हटली आणि त्यांच्या विज्ञान-कवितेची वैज्ञानिक कलात्मकता आणि काव्यात्म विज्ञानपरता नागपुरात जिकडे-तिकडे पसरू लागली. प्रस्तुत समीक्षकाच्या माहितीप्रमाणे त्याच कविसंमेलनात देशपांड्यांच्या अशा कवितांना ' विज्ञानकविते'चे लेबल कविवर्य अनिलांनी चिकटविले. नामकरण करण्याच्या घाईत कवितेच्या पैलूंचे नेमके आकलन जाणकारांना करून देण्याचे भान मात्र कुणाला राहिले नाही. स्वतः कवीही अबोल दिसतो. पुस्तकाला प्रस्तावना नाही. फोटो नाही. परिचय नाही. माहितगारांना कवीचा देह नागपुरात वाङ्मयीन क्षेत्रात हिंडताना आढळतो–एरवी त्याच्या विज्ञानकवितेची चव किती समीक्षकांना आहे, देव जाणे !

हे सगळे एवढ्यासाठी की हे विज्ञान-कविता म्हणजे नेमके काय फॅड आहे, हे कळायला हवे. मोठमोठे साहित्यिक, समीक्षक, प्रकाशक ह्यांचे लक्ष एकदम वेधले जावे, असे काही तरी ह्या कवितेत हमखास होतेच; म्हणून ' युगवाणी ' ह्या वि. सा. संघाच्या मुखपत्राने ' लिटमस 'वर समीक्षण प्रकाशित केले. पण पुस्तक पडले मात्र एका अजाण, शिकाऊ समीक्षकाच्या हातात ! खरे म्हणजे ह्या समीक्षकाला कविता कितपत कळते–म्हणजे अनुभूती नसल्यामुळे कितपत जाणवते –हा एक प्रश्नच आहे. शिवाय विज्ञानयुगात वैज्ञानिक जाणीव आणि आकलन शून्य; म्हणून समीक्षा त्यांनी अपरिचयात्मक पातळीवरच गुंडाळून टाकली.

### ' विज्ञानकविता ' म्हणजे काय ?

' मनातल्या आणि विज्ञानातल्या सूक्ष्म प्रतिक्रियांमधला पॅरॅलॅक्स ज्या वेळी रिमूव्ह होतो त्या वेळी विज्ञानकविता कलात्मक जन्म घेते. हे संवेदनांचे कलात्मक कॅलक्युलस आहे.' अशा वैज्ञानिक काव्यसमीक्षेच्या भाषेतच शिरीष गोपाळ देशपांड्यांनी आपल्या कवितेची ओळख प्रकाशनसमारंभात करून दिली होती. सामान्य माणसाला त्यांचे भाष्य हे कवितेप्रमाणेच दुर्बोध आहे.

पदार्थ-विज्ञानात प्रकाशशास्त्रात ऑप्टिकल बेंचवर पदार्थ आणि प्रतिमा ह्यातील आभास नाहीसा करून दोघांचे स्थान नेमकेपणाने एकाच बिंदूवर तोलायचे असते. मग मनातली सूक्ष्म प्रतिक्रिया हा काव्यात्म हेतू (देशपांडे त्याला ' मनीषा ' म्हणतात.) म्हणजे पदार्थ होईल व विज्ञानातल्या सूक्ष्म प्रतिक्रिया म्हणजे ' प्रतिमा '; ज्याला साहित्यशास्त्रात ' प्रतिमा ' हाच शब्द आहे. सरळ अर्थ असा की, देशपांड्यांची प्रतिमासृष्टी वैज्ञानिक आहे. मग प्रश्न असाही येऊ शकतो की आचारी स्वैपाकाची, न्हावी हजामतीची इ. प्रतिमासृष्टी उभारील. ते शक्य आहे. मग त्यात आणि देशपांड्यांत फरक तो काय ? ते पारंपारिक आणि देशपांडेच तेवढे नवीन का ?

–ह्याला लागोपाठ पुष्कळ उत्तरे देता येऊ शकतात. पण ती संपूर्णतः खरी नव्हेत.

(अ) स्वैपाक, हजामत हे सारे जुनेच आहे. तर विज्ञान नवनवोन्मेषशाली आहे.

(आ) हे विज्ञानयुग सुरू आहे. युगाच्या बरोबरीने काव्याने चालावे.

(इ) विज्ञान सामर्थ्यसंपन्न आहे. विधायक, विध्वंसक– दोन्हीही ! त्याच्या बऱ्यावाइटाची गाणी गायिली जायला हवीत.

(ई) विज्ञानातील तरलता व नेमकेपणा ( सटलिटी ) दुसऱ्या प्रतिमासृष्टीत सापडू शकत नाही. अगदी निसर्गातसुद्धा नाही. (म्हणजे सौंदर्यवादी निसर्गात ! शास्त्रीय निसर्गात नव्हे ! ) शास्त्रीय निसर्गातला नेमकेपणा देशपांड्यांनी नेमका हेरलेला जाणवतो.

वरील उत्तरे काही प्रमाणात खरी आहेत पण त्यांना पूर्ण उत्तरे म्हणता यायचे नाही. मर्ढेकरांचे यंत्रयुग आणि देशपांड्यांची कविता यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. मर्ढेकरांना यंत्रयुगातील माणूस दिसतो; ज्ञानेश्वर ते करंदीकर यात वैज्ञानिक दृश्ये दिसतात, पण ती केवळ ठिसूळच नव्हेत तर स्पष्टपणे ' अवैज्ञानिक ' आहेत. मर्ढेकरांना ' नळीत जगणारे जग ' पाहून ' रसायनाचा रुसवा उगीच ' वाटण्यापुरते विज्ञान स्पर्शून जाते. तेही टेस्टट्यूब बेबीज हा आशय येण्या-




साठी ! एरवी विज्ञानाचा स्पर्श लोकलमध्ये अंग घासावे असा !

### कॅलक्युलस

पूर्वी वर दिलेल्या उत्तरांच्या मर्यादा देशपांडयांच्या दुसऱ्या वाक्याचा विचार केल्यावर स्पष्ट होतात. 'संवेदनांचे कलात्मक कॅलक्युलस' म्हणजे काय? कॅलक्युलस हे 'ठोस' गणित नसते. सूक्ष्म बदल नेमकेपणाने आणि काटेकोर टिपून घेणारे गणित आहे. पण विज्ञानकविता ह्या तर्कसंगतीने निर्माण झाल्यात काय?– नाही. हे 'कलात्मक' कॅलक्युलस आहे. म्हणजे सौंदर्यसंगतीतील तर्क अभिप्रेत आहेत. सूक्ष्म–तरल–गूढ–नेमकेपणा अचूक टिपून घेणारे कॉम्प्युटर देशपांडयांच्या काव्यमनात आहे. सर्वात वरची कडी म्हणजे हे कलात्मक कॅलक्युलस 'संवेदनांचे' आहे.

आजच्या दुर्बोध नवकवितेत मनातले व्यामिश्र भाव सुबोध होत नाहीत. ते त्याच पातळीवर उलगडून घ्यावे लागतात. देशपांडयांच्या कवितेत असे काही होत नाही. मन जेवढे व्यामिश्र; मन जेवढे अबोध; मन जेवढे अनाकलनीय... देशपांडयांना अगदी हुबेहूब तशा प्रतिमा विज्ञानात आढळतात. अलकार नव्हे. प्रतिमाही नव्हे. सरूपताच ! पॅरॅलॅक्सच मुळात रिमुव्ह होतो. देशपांडयांची विज्ञानकविता ही स्वतंत्र वाट आहे. इतकेच नव्हे तर तो नवकवितेला सुकरतेचा मिळालेला दुवा आहे.

पण इतकेच त्यांच्या कवितेत आहे, असे नाही. 'असे आहे' एवढे म्हणता येईल. काही कविता ह्या पातळीच्या मागे गेल्या आहेत. काही पुढे. ह्या पातळीच्या मागे गेल्या की त्या सुबोध होतात आणि वर गेल्या की दुर्बोध न होता अधिक कसदार होतात, अशी जादू ह्या कवितेत आहे. एखादा विलक्षण शोध लागून जगाने सुटकेचा निःश्वास टाकावा अशी वाट ह्या कवीने रसिकतेला, समीक्षेला आणि नवकवींना दाखविली आहे.

बा. सी. मर्ढेकरांच्या काव्यसमीक्षेला असे आढळले की, ज्या वेळी एखादी नवीन प्रभावी प्रतिमासृष्टी कवी उभारतो तेव्हा खऱ्या अर्थाने नवकवितेच्या युगाचा प्रारंभ होतो. देशपांडयांनी नवीन प्रतिमासृष्टी उभारली आहे. फक्त ती प्रभावी आहे किंवा नाही, हे काळच ठरवील. देशपांडे वैज्ञानिक प्रतिमांमधून जगाचा अनुभव घेतात. कधीकधी त्यांचा अनुभवच विज्ञानमय असतो. पण त्याचा जास्त अविष्कार अगदी अलीकडल्या कवितांतून आढळतो.

### देशपांडयांची विज्ञानकविता

प्रतिमा विज्ञानाच्या आल्या म्हणून आशय वैज्ञानिक झाला आहे, असे सुरुवातीला आढळत नाही. देशपांडे स्वतःला सापडू घातले आहेत; पण पुरते सापडायचे आहेत, हे लक्षात येते. पूर्वसूरींच्या व स्वतःच्याच प्रेमकवितेचा पगडा अजून कमी झालेला नाही.– 'ब्युरेटच्या तोटीशी अविरत' असलेला 'शून्य बुडबुडा' तिच्या डोळयांकडे सरकतो तेव्हा तिच्या 'निळया डोळयांचा लिटमस लाल' होतो. ह्या कवितेला प्रा. म. शं. वाबगावकरांनी वैश्विक परिमाण दिले आहे. ते पटतेही. पण ह्या कवितेची जात प्रेमकवितेचीच हे नाकारता येत नाही. 'कॉम्प्युटरावर मोजले जाणारे श्वास'; 'टॉव्हीवर रंगणारी प्रीती' संपून 'स्टेशन भकास, चितातूर' होणे; सुवर्णकान्तांनी त्याचा 'रडारपडदा' व्यापून टाकला असला तरी सर्वच विमाने 'दूरच्या तळावर' उतरण्याचा दाहक अनुभव; 'देऊ काळीज कोणाला ! कोण भेटणार मोची' असा स्वतःस हसणारा अनुभव; अशा व्याकुळ अवस्था ह्या स्पष्टपणे प्रेमावस्थाच नाहीत काय ?

### स्वतःवर अविश्वास

'स्वतःवर अविश्वास' हे अतिशय नवीन तत्त्व देशपांडे पहिल्यानेच मांडतात. 'शून्यपूर्ण' (युगवाणी, दिवाळी '७४) ह्या एकांकिकेतही त्यांनी हेच तत्त्व मांडलेले आढळते. लिटमसमधल्या अशाच काही जबरदस्त कविता रसिकमनाला तसेच विचारवंताला भारावून टाकतात.

> " मला सवयीच फार
> किळसवाण्या जडल्या आहेत; हातात
> बाटली असते तीव्र गंधकाम्लाची " (पृ.४४)

असा प्रयोग करीत सुटलेला तो शेवटी स्तनांवर बाटली ओततो. 'तेव्हा नवीन मिळाले रिझल्ट्स्' आणि अशा भीषण प्रयोगातून आलेला चित्तथरारक अनुभव अतिशय थंडपणे तो आपल्याला सांगतो. वस्तुनिष्ठेने–नव्हे, तीही नाहीशी झाली आहे–कारण त्याचा स्वतःवरच विश्वास नाही.

" विश्वासाला पडली भोकं
रॉकेटा, तू नकोस उतरू
घरे काळजाला पडलेली
नकोस चंद्रा अजून विवरू. " (पृ.३७)

स्वत:वरच्या अविश्वासाचा सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी हा सारा आकांत–

" माझ्यावरती मी उतरावे
परंतु सरलेला ऑक्सीजन " (पृ.३७)

छातीवरली हाडांची जाळी रडारच्या जाळीप्रमाणे वाटून दोघांतही ' अदृश्याचे पडसादन ' येते ह्याची कलात्मक खात्री आपल्याला होत राहते. (पृ. ३९). ' विज्ञानाच्या कल्पतरुने लीन ओतलेल्या सुखसोई 'वर भाष्य होते–

' सुखसोईनी सर्व चोचले
मात्र वाहिले देहाला
अणुशक्तीवर जगेल
का मन ? ......' ( पृ. ४१ )

हा प्रश्न आल्यामुळे कवी हताशपणे कवितेची ओळही अर्धीच सोडून देतो–ही अभिव्यक्तीवरील पकड. अणुशक्तीवर रडणारा कण्व त्याला दिसतो. येथूनच देशपांडयांची कविता खरी विज्ञानमय म्हणून विज्ञान कविता होऊ लागते. अलीकडल्या ' लिटमस ' मध्ये नसलेल्या चार ओळींचे उदाहरण देणे वावगे ठरणार नाही.

' युरेनियमच्या परमाणूला
उगीच हसतो भोळा शंकर
तपोवनाच्या गुहेत तेव्हा
निजला असतो ऋषी भयंकर '

मुचकुंदाप्रमाणे असणारी निद्रिस्त भीषण शक्ती परमाणूशक्तीत आहे ह्याचे कलात्मक प्रत्यंतर आल्याशिवाय राहत नाही. ' राजाम्लाच्या आवाक्यात ' असलेली ' शंकरशक्ती पचनपुरातन ' आठवायला हरकत नाही. कारण अणुशक्ती म्हटले की शंकराचा उल्लेख यायलाच हवा. ( पृ. ३९ )

निर्जंग मन आणि देहाने अस्तित्वविहीन झालेला कवी ' न्यूटनचे गतिविषयक नियम खरे की खोटे ह्यावर मन ओठाळतही नाही.- ( पृ. ४७ ) हे स्वतःच सांगतो. त्याला स्टथोवाचुनच अस्थिरलेली हृदयस्पंदने कळतात ( पृ. ४९ ); ' आकाशस्थ ग्रहतान्यांच्या साक्षीत ऐटीने झेपावणाऱ्या ' उल्केसाठी ' उध्वस्त पृथ्वीच्या जागा तो निवडून ' देतो; ' अल्कोहोल आणि सिल्व्हरनेट्रेटचे समग्र पारायण त्याला फिके वाटते. म्हणून–

' मग पायाच्या अंगठयाने
शँपेन दुभंगते
किंवा हृदयाचे दूध खिळयाला लागते. '

' धनिशून्य समता ' प्रस्थापित होत नाही तो प्रयोग; ' टेस्टटयूबच्या तोंडाशी जमणाऱ्या पांढऱ्या फ्यूम्स ' वरून स्वतःची खात्रीलायक तपासणी–हा प्रयोग; किंवा स्वतःच्या दुर्बलतेची पराकोटीची जाणीव होते तो प्रयोग–

' अल्कलीनाम् सोडि ' कार्बोऽस्मि
आम्लानामस्मि ऑग्झॅलिक: ' ( पृ. ५५ )

जगाचा परिचय होणारे प्रयोगही आहेत.

' विखारवशता आत वासना
जरी नेसला वेष वल्कली
पिपेटमध्ये द्रव घेताना
जिभेस कळली आज अल्कली. '

पाण्यावर जळणारा पदार्थ जगात अस्तित्वात आहे.–सोडियम ! त्याचाही अनुभव समृद्धपणे येतो.

### आत्मपरीक्षा

आपल्या काव्याची योग्य अशी संभावना विसाव्या शतकात होणार नाही अशी भीतीही त्यांच्या काव्यातून डोकावते. केशवसुत–मर्ढेकरांना वाटणारी ही भीती देशपांडयांनी वाटू देऊ नये. रसिकता आता प्रगल्भ होत आहे. तेव्हा ' तिसऱ्या स्थानी हर्षल ' आणण्याची घाईही देशपांडयांनी करू नये. ' जुनाट नवता खरचटलेली–' म्हणून त्याला आयोडिन किंवा डेटॉल लावायला त्यांनी सांगू नये. नव्यांनी नवकवितेला जुने म्हणून स्वत: अतिनव होता येत नाही. त्यांनी काव्य बोलावे. काव्यातून आत्मश्लाघा करू नये, असा प्रामाणिक सल्ला. कारण त्याने अलौकिकत्वाला बाधा येते. □



# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २१-६-७५ ते २७-६-७५

### भारताच्या अंतर्गत राजकारणात खळबळ व वाद

गुजरातच्या निवडणुकीचे मी वर्तवलेले भविष्य तंतोतंत खरे ठरले आहे हे वाचकांच्या लक्षात येईलच. या निवडणुकीने सत्ताधारी काँग्रेसची पूर्ण निराशा केली आहेच व पंतप्रधान इंदिरा गांधींच्या पदरात तर मोठे अपयश घातले गेले आहे. या आठवड्यात विशेष खळबळजनक असे काही घडणार नाही; पण पंतप्रधानांसमोर अनेक विचित्र घटनांची प्रश्नचिन्हे उभी राहणार आहेत. अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालाने त्यांना बसलेल्या धक्क्याने त्या सावरतील. विरोधकांनी आपला जोर वाढवला तरी त्याचा उपयोग काही होणार नाही. मात्र या आठवड्यात गुरुमंगळ युतीचे परिणाम जाणवू लागणार आहेत. भारतात राजकीय पक्षात खळबळ माजेल. मतभेद उघड होतील. जवळ आलेले पक्ष एकमेकांवर कुरघोडी करू पहातील. परदेशी व्यक्ति अप्रत्यक्षपणे भारतात हस्तक्षेप करू पहातील. महाराष्ट्रात सरकारी गोटात अस्थिरतेचे धक्के जाणवू लागतील. पावसाने लोक मात्र सुखावतील.

**मेष : स्फूर्तिदायक कालखंड**

आठव्या चंद्रावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. मंगळ उद्याच तुमच्या राशीत प्रवेश करीत आहे. हा मंगळ तुमचे वर्चस्व वाढवणार आहे. यश आणि साफल्य द्विगुणीत करणार आहे. मंगळासारखा सामर्थ्याचा साक्षात्कार घडवणारा ग्रह ध्यानीमनी नसलेले मोठमोठे लाभ सहजपणे पदरात टाकीत असतो. चंद्र-मंगळाचा षडाष्टक योग जरी तुम्हाला अपचनाचा त्रास देणार असतील तरी आर्थिक परिस्थितीत मूलभूत सुधारणा व्हावी अशा घटना घडणार आहेत. रेस व लॉटरीमुळे नशीब बलवान ठरणार आहे. शनिवार व रविवार हे दोन दिवस फार महत्त्वाचे आहेत. सौंदर्यप्रसाधने, मीठ, रासायनिक व्यापार, खते, कडधान्ये व शेतीमाल यांचा व्यापार व तत्संबंधीचे उद्योग नदी अथवा समुद्र याच्या किनाऱ्यावर सुरू करा. मोठे यश पदरात पडणार आहे. अपेक्षित कामासाठी मनात ठरवलेल्या व्यक्तीला भेटायचे असेल तर सोमवार उत्तम आहे. नोकरीसंबंधीचे काम सोमवारी सफल होईल. चालू नोकरीत आशादायक बदल होईल. जमीन व बांधकाम यांच्याशी संबंधीत अशा नोकरदारांना बढती-प्रमोशनचा योग आहे. मेष रास ही अधिकारपदे देणारी रास असल्यामुळे तुमच्यापैकी कुणीही नोकरी सोडून धंदा करू नये. सरकारी नोकरीला विशेष प्राधान्य द्यावे. वकिलांना अधिकाराच्या जागेची ऑफर येईल. तिसरा रवी-शनी जनतासंपर्क वाढवील. राजकारणी लोकांशी संबंध आणील. निवडणुकीत यश मिळवून देईल. विवाहाचा बेत लांबणीवर पडेल. प्रेमात यश कमी. कलावंताची परिस्थिती सुधारेल. महिलांना-विशेष करून नोकरीची अपेक्षा करणाऱ्यांना चांगली नोकरी मिळेल. शुभराशी ३-५-१०.

**वृषभ : वैवाहिक जीवनात गोडवा**

उद्याच होणारा बारावा मंगळ दुर्लक्ष करण्यासारखा नाही. त्याची दखल तुमच्यासारख्या भावनावश व्यक्तीला घ्यावीच लागेल. दुसरा शनी-रवी अर्थप्राप्तीसाठी बरेच प्रयत्न व परिश्रम करायला लावणार आहे. गुरुवार-शुक्रवार पूर्व व उत्तर दिशेला भाग्यकारक घटना घडणार आहेत. सप्ताहाची सुरुवात तुमच्यापैकी अनेकांच्या संसारात संततीप्राप्तीची, कौटुंबिक आनंदाची ठरणार आहे. कॉलेजातील तरुणतरुणी व संवेदनाशील तरुणतरुणी प्रेमात पडणार आहेत. प्रथमदर्शनी प्रेमाने त्यांना आनंद होणार आहे. बारावा मंगळ आर्थिक बाजू दुबळी करणार आहे. जामीन राहाणे, पैशाचे करारमदार करणे, कर्ज काढणे व व्यापाराच्या बाबतीत दलाली स्वरूपाचे वायदे करणे टाळणेच उपयुक्त ठरेल. व्यापारात-प्रामुख्याने कापड व किराणा भुसार मालाच्या व फळफळावळीच्या व्यापारात मंदीचा तडाखा बसणार नाही, पण मालाचा उठाव कमी प्रमाणात होईल. कोणत्याही प्रकारचा छोटा व्यापार सुरू करायला बुधवार ते शुक्रवार अनुकूल आहेत. तुमच्यापैकी कुणी नाटक, सिनेमा अगर संगीत मैफ़लीचे ठेकेदार असतील तर त्यांना भरपूर पैसा मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा मोह टाळता येणार नाही. या वेळी तुम्ही वासनेच्या आहारी जाऊन लोकांची टीका सहन करावी लागेल. राजकारणात लोकप्रियता व निंदा सहन करावी लागेल. जागेचा बदल करू नका. शेतजमीन खरेदी करू शकाल. नोकरीत महसूल खाते, बँक, इनकमटॅक्स, सेल्सटॅक्स, शिक्षण, परवाना व वाहनखाते, कागद व शाई यात प्रयत्न करावा. विज्ञानपदवीधर व संशोधक यांना प्रगतीचा आठवडा आहे. महिलांना चालू नोकरीत प्रमोशन व पगारवाढ मिळू शकेल. शुभराशी ४-५-७.

**मिथुन : संघर्षातून सफलता**

गेल्याच आठवड्यात दशमस्थानी गुरु-मंगळाची युती होऊन गेली आहे व ती तुमच्या व्यावसायिक जीवनाला समृद्धीचे बळ प्राप्त करून देणारी ठरली आहे. आता मंगळ अकरावा आला आहे. तो पैशाचे सारे व्यवहार फायद्याचे करणार आहे. मात्र राशीतच चंद्राला शनी-रवींनी घेराव घातला आहे तो तुम्हाला संघर्षाशिवाय सफलता देणार नाही. हे मार्गदर्शन आहे. तुम्ही बुद्धिवान आहात, बौद्धिक सामर्थ्य व हिशोबी बाजू यात तुमचे मन विशेष रमते. त्यामुळे बँकिंग, साखर कारखाने, इनकमटॅक्स अशा क्षेत्रात तुमच्या बुद्धीचा उपयोग करा. बुद्धीचे कौतुक होईलच पण त्याशिवाय पैसा पाण्यासारखा मिळेल. इनकमटॅक्सऑफिसर कर संकलन अधिकारी व चौकशी अधिकारी आपले उखळ पांढरे करू शकतील. पोलिसखात्यातील व उपरोक्त अधिकारी लाचलुचपतीला बळी पडू शकतील याची मात्र त्यांनी गंभीर दखल घ्यावी. आडमार्गाने पैसा मिळू शकेल असा हा आठवडा आहे. पण तो मोह टाळा. या आठवड्यात तुमच्यापैकी अनेकांना मटक्यात पैसा मिळू शकेल. पण तो बेकायदेशीर मार्ग आहे याची त्यांनी जाणीव ठेवावी. शनिवार-रविवार तब्येतीची काळजी घ्यावी. तिखट आंबट टाळावे. सोमवार ते बुधवार बेकारांना काम व नोकरी मिळेल. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. वरिष्ठ अगर मालक यांच्याबरोबरचा संघर्ष टाळणे इष्ट. विवाहाचा प्रश्न रेंगाळेल.

महिलांनी स्वतःचा धंदा अगर व्यापार सुरू करावा. नोकरीत तात्पुरता बदल. शुभराशी ३-४-१०.

कर्क : खर्च आटोक्यात ठेवा

तुमच्या जीवनाची सूत्रे या आठवड्यात गुरु-मंगळाच्या हाती आहेत. हेच दोन ग्रह तुम्हाला सावरू शकतील. तुम्ही साडेसातीच्या फेऱ्यात अजून गिरगिरत आहात, व त्यातच आता रवी-शनीच्या जवळ मिथून राशीत आला आहे. रवी-शनी तुमचे खर्चाचे मान अतोनात वाढवणार आहेत. तुम्ही कुणाला जामीन वगैरे असाल तर ते प्रकरण भारीच महाग पडणार आहे. त्यातून गुरु-मंगळ तुम्हाला सोडवील. पण तोपर्यंत डोके ठिकाणावर राहील की नाही अशी शंका तुम्हाला येईल. आठवड्याच्या सुरुवातीला चंद्र पाचवा आहे. तो तुम्हाला परीक्षेत उत्तीर्ण करील. तुम्ही व्यावसायिक परीक्षा दिली असेल तर तुम्हाला मोठे यश मिळणार आहे. या राशीचे निरनिराळे विद्यार्थी ज्या परीक्षांना बसले असतील व त्यांचे निकाल या आठवड्यात असतील ते पास तर होतीलच. पण त्यांना बक्षिसे मिळतील. सरकारी नोकरांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. त्यांच्याविरुद्ध तक्रारी होतील. त्यांनी काळजी घ्यावी. आकाशवाणीवरील स्पर्धेत या राशीच्या लोकांना लोकप्रियता मिळेल. नवीन उद्योग सुरू करा. विवाह ठरून पार पडतील. महिलांना क्रीडाक्षेत्रात व सरकारी नोकरीत मानाचे स्थान मिळेल. शुभराशी ६-७-१२.

सिंह : स्थावराचा लाभ

आठवड्याची सुरुवात वृश्चिक चंद्राने होत आहे. ही तुमच्या निवासस्थानाचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने उपकारक घटना ठरावी. भाडेकरू, घरमालक प्रश्न सामोचाराने सुटेल. तुम्ही नवे घर घेणार असाल, बंगला घेणार असाल तर त्यासाठी अनुकूलता आहे. शनिवार ते सोमवार राजकारण व शिक्षण यात तुम्हाला मोठे महत्व मिळेल. परीक्षांचा निकाल अनुकूल लागेल. नोकरीत प्रमोशन मिळेल. हुकलेली संधी पुन्हा मिळेल. मागच्या पगाराची मागणी करा. तो फायदा मिळेल. पदवीधर अगर नोकरीधंद्याचा प्रयत्न करणारा कुणीही या राशीचा माणूस यशस्वी झाल्याशिवाय राहाणार नाही. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. प्रयत्नाशिवाय पैसा अशी अपेक्षा मात्र करू नका. भरपूर श्रम करावे लागणार आहेत. मात्र श्रमांचे चीज होईल. नवीन पर्वाची सुरुवातच मुळी तुमच्या सार्वजनिक जीवनात होणार आहे. सन्मानाचा योग चालून येणार आहे. तुमच्यापैकी कुणी निवडणुकीला उभा असेल तर तो यशस्वी होईल. तुम्हाला या वेळी सहकारी लोकांचे, मित्रांचे सहकार्य मिळेल. प्रतिष्ठा व मोठेपणा मिळणारे प्रसंग घडू शकतील. एखादी आवडती वस्तू तुम्ही घेऊ शकाल. संततीसुख व मातृसुख उत्तमपैकी मिळेल. अनेकांचे विवाहाचे प्रश्न मात्र रेंगाळतील. महिलांनी सार्वजनिक कार्यात अवश्य भाग घ्यावा. त्यांची घराची व बंगल्याची इच्छा पुरी होईल. शुभराशी ३-६-८.

कन्या : अडचणी कमी होतील

नव्या नव्या मित्रांचा लाभ आणि नव्या योजनांवर अनुकूल प्रतिसाद देतच हा आठवडा तुमच्या जीवनात प्रवेश करीत आहे. शनिवार ते सोमवार भरभर अशा महत्त्वपूर्ण घटना घडणार आहेत. तुम्हाला प्रसिद्धी व प्रतिष्ठा मिळणार आहे. तुमच्या महत्त्वाकांक्षा दृष्टिपथात येणार आहेत. राजकारण, समाजकारण यांतील उच्चपदस्थ व्यक्तींबरोबर तुमचा संबंध येऊन तुमची प्रतिष्ठा वाढणार आहे. आठवा मंगळ उद्याच होत आहे. तो त्याच्या स्वगृहीच जात असल्यामुळे जरी हा मंगळ आठवा झाला तरी तसे काही प्रतिकूल घडणार नाही. उलट अनेक बाबतीत अनुकूल प्रत्यय येईल. तब्येतीला जरी थोडाफार त्रास झाला तरी त्याचा दैनंदिन कार्यक्रमावर कोणताच परिणाम होणार नाही. आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा शुभारंभ मंगळवारपासून होईल. तुम्ही जर लॉटरीचे तिकीट घेत नसाल तर ते या वेळी अवश्य घ्या. पतीपत्नीचे संबंध जास्त प्रेमाचे होतील. सासुरवाडीकडून अनुकूल वारे वाहू लागतील. स्थावर व जंगम मिळकतीच्या नव्या कामाला सुरुवात करायला ही वेळ शुभ आहे. नोकरीत तुमची हुषारी व कार्यक्षमता तुमच्या वरिष्ठांना अगर मालकांना पटेल. तुमच्यावरील अन्यायाचे ते फेरविचार करू लागतील. तुमच्यावर एखादी महत्त्वाची जबाबदारी सोपविण्याची योजना सुरू होईल. तुम्हाला स्त्री-प्रेमाचा प्रत्यय येईल. नव्या ओळखी होतील. स्वतंत्र उद्योगाचा विचारविनीमय करा. महिलांना नोकरीत मानाचे स्थान मिळणार आहे. शुभराशी ४-५-१०.

तूळ : संसारात भांडण टाळा.

मंगळाची कृपा तुमच्यावर कमी होत आहे. त्याचा परिणाम प्रामुख्याने तुमच्या संसारावर होणार आहे. आधीच तुम्ही अधिक भावनावश वृत्तीचे. एकदम आनंद वा एकदम निराशा तुमच्यापाशी असते. त्याचा प्रत्यय या वेळी येण्याची शक्यता. सध्या तरी तुम्ही फार मोठ्या आशाआकांक्षा उराशी बाळगण्यात काही अर्थ नाही. कारण ग्रहस्थिती तशी दोलायमानच आहे. नवे वाहन खरेदी केले असेल तर ते अक्षरशः अडचणी निर्माण करणार आहे. कुठे बिघाडच झाला तर कुठे इतर अडचणी. नोकरीच्या बाबतीत तुम्ही मनात उभारलेले इमले हादरून जातील. सर्वच बाबतीत निराशा पदरी येईल असे नव्हे पण विलक्षण अडचणीतून मार्ग काढावा लागेल. कोर्टकचेरीची कामे अर्धवट राहातील. सोमवार ते गुरुवार अनेक बाबतीत महत्त्वाचे दिवस ठरणार आहेत. तुम्ही लेखक व पडद्यावरचे कलावंत असाल तर तुम्हाला मोठा मान-प्रतिष्ठा-प्रसिद्धी मिळणार आहे. मंगळवारी साधूपुरुषाचे दर्शन होईल आशीर्वाद लाभेल. तुम्ही धंदा सुरू करायला हरकत नाही. कापडव्यापार, प्रामुख्याने साडीव्यापार सुगंधी तेले, प्रसाधने, वाद्य-उपकरणे, इत्यादि उद्योगात चार पैसे मिळून मनाला समाधान मिळेल. विवाहेच्छू लोकांनी विवाहाचा विचार करायला हरकत नाही. पण त्यात विनाकारण अडचणी येऊन अंती पदरात यश पडेल. चालू नोकरीत काही वेळा वरिष्ठाबरोबर मतभेदाचे प्रसंग निर्माण होतील. पण नुकसान होणार नाही. महिलांनी व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा व प्रामुख्याने व्यापारात जास्त लक्ष घालावे. शुभराशी ३-७-११.

वृश्चिक : काही तरी नवे घडेल

तुमच्या जीवनाची सूत्रे या आठवड्यांत मंगळाच्या व गुरुच्याच हाती आहेत. या ग्रहांच्या सामर्थ्याने अचाट, अफाट असे काही तरी घडत असते. या वेळी असेच कांहीं तरी घडले तर आश्चर्य वाटू नये. तुम्हाला माहीतहि नसलेल्या तुमच्या एखाद्या नातेवाइकाकडून तुम्हाला एखादे पत्र येईल व आपल्या

स्थावर मिळकतीत तुम्ही वाटेकरी व्हावे अशी इच्छा त्यात प्रकट केलेली असेल. तुम्ही मटका खेळू नका. कारण तो बेकायदेशीर आहे. पण तुमची वृत्ति कायदा मोडण्याकडे आहे. म्हणून तुम्ही जर मटका खेळलांत तर तुम्हाला पैसा मिळू शकेल. शेती व खते, किराणा माल, अॅल्युमिनियम, कोळसा, लाकडी फर्निचर असे उद्योग सुरू केलेत तर त्यांत तुम्हाला यश व सफलता मिळेल. याच धंद्यांत सध्या असलेल्या लोकांना प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. रविवार ते बुधवार नोकरीत बदली व थोडा त्रास. महिलांनी नोकरीत प्रामाणिकपणे काम करावे. नवी नोकरी मिळेल. शुभराशी २-३-५.

**धनू : अनावश्यक कल्पना टाळा**

गुरुप्रभावाची तुमची रास असली तरी तुम्ही वास्तवाकडे डोळेझाक करून अनेक वेळा स्वप्नकल्पनांत दंगून जाता. हा काल्पनिक आनंद तुमचे मन प्रसन्न ठेवतो. पण याचमुळे नुकसानही होते. विशेष करून या आठवडयात अशाच प्रवृत्तीमुळे तुमच्या झोपेवर परिणाम होईल. झोप उडेल. व त्यामुळे तुमच्या रोजच्या कामावर दुष्परिणाम होईल. नोकरीत जरा काळजी घ्या. वरिष्ठ अगर मालक तुम्ही कितीही काम केलेत तरी उगाच तणतणत राहतील. त्यांचे समाधान करणे तुमच्या आवाक्याबाहेर असले तरी उत्तरे देऊ नका. मतभेद व्यक्त करू नका. हो ला हो म्हणा. रविवार नवा मित्र लाभेल. सोमवार ते गुरुवार स्थावराच्या कामात लक्ष घाला. प्लॉट खरेदी, जमीन खरेदी असे काही तरी होईल. नोकरीत, चालू कामात त्रास नाही. नवी जबाबदारी नको. आरोग्याची काळजी घ्या. पाऊसपाणी अंगावर घेऊ नका. महिलांनी लहान प्रमाणात धंदा करायला हरकत नाही. वाहनखरेदीचा योग आहे. शुभराशी ४–५–६.

**मकर : यशापयशाची शर्यत**

सहावा शनी जरी तुमच्या विरोधकांचे तुमच्याविरोधी डाव उधळून टाकीत असला तरी त्याचा त्रास तुम्हाला होतच आहे हे आता अनुभवानेच पटले असेल. म्हणून याही आठवडयात तुम्ही विरोधक वाढवू नका. चुचकारून घेणे हितकारक ठरेल. सोमवारी सत्तेवरील एखादी उच्चपदस्थ व्यक्ती विशेष करून स्त्रीव्यक्ती तुमच्या जीवनात प्रवेश करील. ती तुमच्या विश्वासातील व्यक्ती बनेल. नोकरीत तुमचे प्रयत्न अपुरे पडतील. चालू नोकरी बदलू नका. नव्या नोकरीत तुम्हाला स्थैर्य व प्रतिष्ठा मिळणे कठीण आहे. कृषिपदवीधर, संशोधक यांना त्यांच्या कामात अडचणी वाढतील; पण यश मिळेल. सोमवार ते गुरुवार आर्थिक प्राप्तीचे मान सुधारेल. शिल्लक वाढली नाही तरी सुधारणा होईल. राजकारणात तुम्हाला माघार घ्यावी लागणार आहे. तुम्ही गुरूची अगर तुमच्या कुलदेवतांची उपासना करा. शांती मिळेल. महिलांनी कोणत्याच कामात बेदरकारी दाखवू नये. त्रास होईल. शुभराशी ६–७–८.

**कुंभ : नव्या कल्पनांना वाव**

या आठवडयांत मंगळाचे स्थानांतर होत आहे व तुमच्या दृष्टीने फायदेशीर आहे. तुमचा पिंड प्रामुख्याने राजकारणी आहे. त्याला पूरक वा उपकारक ठरणारे असेच हे राश्यांतर आहे. गेले अनेक दिवस बाजूला पडलेल्या तुमच्या योजना या वेळी आकार घेऊं लागणार आहेत, शेती, नांगर (ट्रॅक्टर) लोखंडी फर्निचर, औषधे, तेले, खते, मुद्रणसाहित्य असे कांहीं उद्योग या आठवडयात फलदायी आहेत. या उद्योगाबरोबर किंवा या उद्योगांत जर तुम्ही मन रमवले तर तुम्हाला पैसा व स्थैर्य मिळेल. राजकारणांत तुम्ही अवश्य भाग घ्या. तुम्हाला जर तुमच्या फायद्यासाठी डावपेच करायचे असतील तर ते अवश्य करा. तुम्ही विरोधकांवर मात करू शकाल. रविवार, बुधवार व शुक्रवार विशेष महत्त्वाचे दिवस आहेत. नव्या ओळखी होतील. श्रीमंत व्यक्तीचा परिचय होईल., आर्थिक बाजू बळकट होईल. मोठे व्यवहार होतील. लेखी करार होतील. नोकरीत कार्यक्षमता वाढून वरिष्ठांच्या विश्वासाला पात्र ठराल. महिलांनी नोकरीतच प्रवेश करावा. पैसा व अधिकार मिळतील. शुभराशी ६–७–१०.

**मीन : स्वास्थ्य व यश मिळेल.**

या आठवडयात तुमच्या उपासनेचे योग्य फळ व मानसिक शांती याचा तुम्हाला मोठा लाभ होणार आहे. जीवनांत पारमार्थिक यश हे सहजासहजी माणसाला मिळूं शकत नाही. पण तुम्ही मोठे भाग्यवान ठरणार आहांत. सध्या राशीवर गुरुचे कृपाछत्र आहेच. त्याचा प्रत्यय या वेळी येईल. कल्पनेत नसलेल्या घटना घडतील. मंगल व अद्वितीय अशी व्यक्ती तुमच्या स्वप्नांत येईल. ती तुम्हाला प्रत्यक्षांत नंतर भेटेल. चालू धंद्यातील अडचणी व त्रास कमी होईल. गुरुकृपा मानसिक आनंद देईल. सोमवारी नोकरीत तुम्ही मोठे अधिकारी व्हाल. पगारवाढ व जबाबदारी असे दोन्ही मिळेल. नोकरीतील अनिश्चितता कमी होईल. पत्रकार व त्या धंद्यातील नोकरदार, प्रोफेसर, शिक्षक, इतिहाससंशोधक, लेखक, प्रकाशक यांचाच हा आठवडा आहे. उद्योग अगर स्वतंत्र व्यवसाय नको. चालू व्यापारव्यवसाय दुर्लक्षीत राहील. आर्थिक परिस्थिती फक्त गरज भागवील. महिलांनी शैक्षणिक संस्था सुरू करावी. त्यांत प्रतिष्ठा मिळेल. शुभराशी ३–६–८.

□ □


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)
पंचावन्न रुपये

# अक्कलकुव्याचे 'पट' प्रकरण : पृष्ठ ९ वरून

पृष्ठ ९ वरून

जमिनीचे मालक बनता यावे हा होता. त्यामुळे सरकारची या जमीनधारकांना राज्याच्या इतर भागातील कुळांसारखे लेखण्याची चूक दुरुस्त होणार होती. अर्थात चिफटनांचे या तरतुदीमुळे आर्थिक नुकसान होणार होते. त्यामुळे काही संस्थांच्या चिफटनांनी याविरुद्ध मुंबई हायकोर्टात दावा दाखल केला. हायकोर्टाने १९६२ चा रेग्युलेशन व नोटिफिकेशन भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या संपत्तीच्या अधिकाराचा भंग करणारे असून ती अवैध आहे असा निकाल दिला. भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत हक्कात असलेल्या १९ (१) (एफ्) या कलमाने सर्व नागरिकांना संपत्ती मिळविण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क दिला आहे. कूळकायद्याने चिफटांना त्यांच्या कुळांकडून जमिनीची किंमत मिळविण्याचा हक्क दिला होता. हायकोर्टाच्या मते घटनेच्या वर उल्लेखिलेल्या कलमाप्रमाणे चिफटनांचा हा हक्क म्हणजे संपत्ती आहे. १९६२ च्या रेग्युलेशनने व नोटिफिकेशनने नुकसानभरपाई मिळण्याच्या हक्कात बरीच कपात केली होती, त्यामुळे चिफटनांच्या संपत्तिधारणाच्या मूलभूत हक्कावर गदा येत होती. त्यामुळे हायकोर्टाने रेग्युलेशन व नोटिफिकेशन रद्दबातल ठरवली. हा निर्णय १९६८ मध्ये देण्यात आला.[५]

या निर्णयाने मेवासी जमीनधारकांच्या बाबतीत झालेली चूक दुरुस्त करण्याचा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न अयशस्वी ठरला. या निर्णयाविरुद्ध सरकारने १९६९ साली अपील दाखल केले व ते अद्याप सुप्रीम कोर्टात पडून आहे. (सिव्हिल अपील क्रमांक २२१२ (एन्) १९६९ ).

मध्यंतरीच्या काळात सुप्रीम कोर्टातील अपिलाचा निकाल लागेपर्यंत मुंबई हायकोर्टाच्या निर्णयावर सरकारने स्थगिती मागितली. १९७२ मध्ये यावर मत देऊन सुप्रीम कोर्टाने स्थगिती नाकारली. त्यानंतर मात्र सरकारने एकदम आपले धोरण बदलले जमिनींची किंमत ठरविण्यासाठी १५ टेनन्सी मामलेदार नेमले. या मामलेदारांनी आदिवासी व इतर जमीनधारकांना धडाधड नोटिसा देणे सुरू केले. यातील काहीजणांनी तर शेतकऱ्यांना दमदाटी करून आपण पट भरावयास कबूल आहोत असे त्यांच्याकडून कबूल करवून घेण्यास सुरुवात केली. चिफटनांनी सर्व सरकारी यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली. चिफटनची संमती आणल्याशिवाय सहकारी बँकेचे कर्ज मिळणार नाही वगैरेसारखे हुकूम निघू लागले. मामलेदारांनी जमिनींच्या किमती ८० पटच काय पण काही केसेसमध्ये त्यापेक्षाही जास्त ठरवल्या. याविषयी शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या छापील हुकुमत ही रक्कम किती पट आहे, जमिनीवरील झाडांची किंमत काय वगैरे तपशील नाही.[६]

आदिवासींना सरकार फुकट कायदेशीर सल्ला मिळवून देण्याचा प्रयत्न करील असे एक आश्वासन सरकार देते; पण अक्कलकुव्यात सरकारने अशी काहीही व्यवस्था केलेली नाही.

या सर्व प्रकारामुळे अक्कलकुवा भागातील शेतकऱ्यांत अतोनात असंतोष पसरला. त्यांनी पट निवारण संघर्ष समिती सुरू केली व सर्व शेतकऱ्यांनी पट न भरण्याचा निश्चय केला आहे. अक्कलकुव्यातील वातावरण हळूहळू तापत आहे.

सरकारने यावर योग्य उपाय योजले नाहीत तर सरकारला जमिनी जप्त करून शेतकऱ्यांना हुसकावून लावावे लागेल. दहा हजार शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरून हुसकावून लावणे अतिशय कठीण आहे. या शेतकऱ्यात बहुसंख्य आदिवासी भिल्ल आहेत. नोटिसीत मागण्यात आलेला पट भरणे त्यांना मुळीच शक्य नाही. अशा वेळी संघर्ष जवळजवळ अटळ आहे असे दिसते.

या संघर्षामुळे आदिवासी विभागाच्या विकासात अडथळा येईल हे खरे. पण त्याला मूळ कारण सरकारी धोरणच आहे. मेवासी विभागाविषयी काहीही निश्चित विचार न करता सरकारने सर्व कायदे त्यांना लागू होतील असा रेग्युलेशन १९४९ साली काढला. तसेच १९६१ चा रेग्युलेशन कायदेशीर राहील यासाठी काही खास तरतूद केली नाही. त्यामुळेच आजचा पेचप्रसंग निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर गुजराथ सरकारने दाखविलेला समंजसपणा अधिकच उठून दिसतो. १९६० च्या राज्यपुनर्रचनेत या भागातील ३७ खेडी गुजराथ राज्यात गेली. १९६२ साली गुजराथ सरकारने एक रेग्युलेशन काढून मेवासी जमीनधारणापद्धती रद्द केली. (गुजराथ रेग्युलेशन, क्रमांक १, वर्ष १९६२) या रेग्युलेशनप्रमाणे जमीनधारकांना जमीनसाऱ्याच्या फक्त ३ ते ६ पट रक्कम भरून जमीन आपल्या मालकीची करून घेता आली. गुजराथ सरकारने हा रेग्युलेशन भारतीय राज्यघटनेच्या ९ व्या शेड्यूलमध्ये घालून घेतला. घटनेप्रमाणे या शेड्यूलमधील कायद्यांनुळे मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असले तरीही ते अवैध ठरविता येत नाहीत. घटनेच्या १९६४ साली झालेल्या १७ व्या दुरुस्तीत हा रेग्युलेशन शेड्यूलमध्ये घालण्यात आला. गुजराथ सरकार १९६० साली राज्यात समाविष्ट झालेल्या ३७ खेड्यांतील शेतकऱ्यांसाठी जे करू शकले ते महाराष्ट्र सरकार आपल्या १६३ खेड्यांतील शेतकऱ्यांसाठी करू शकले नाही. या निष्काळजीपणाचा परिणाम हजारो आदिवासींना भोगावा लागणार आहे.

अशा रीतीने आज आदिवासी विरुद्ध चिफटन व सरकार, न्याय विरुद्ध कायदा असा संघर्ष निर्माण झाला आहे, या संघर्षात न्याय जिंकतो की कायदा हे काळच ठरवील. □ □

टीपा

(१) गॅझिटिअर ऑफ दी बॉम्बे प्रेसिडन्सी, भाग १२, खानदेश, पान ४ व २१.

(२) बेडन पॉवेल, दी लँड सिस्टिम्स् ऑफ ब्रिटिश इंडिया, भाग ३, पान २७९.

(३) माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांचा रिपोर्ट सिलेक्शन ऑफ पेपर्स फ्रॉम दि रेकॉर्डस अॅट दि ईस्ट इंडिया हाउस भाग ४ यात दिलेला आहे. पान १८३.

(४) मुंबई सरकार, सिलेक्शन फ्रॉम रेकॉर्डस्, क्रमांक ५२४, कॅरेक्टर ऑफ लँड टेन्युअर्स अँड सिस्टिम ऑफ सर्व्हे अँड सेटलमेंट इन दी बॉम्बे प्रेसिडेन्सी, पान ११.

(५) संपूर्ण निकालपत्र बॉम्बे लॉ रिपोर्टर, खंड ७०, १९६८ मध्ये दिले आहे. पाने ६५४–६८३.

(६) यासंबंधीची हकिकत 'माणूस' ३१ मे १९७५ या अंकात प्रसिद्ध झाली आहे.

# झिलमिल सितारे

# पद्मा चव्हाण

## " माझ्यानंतर सुन्दर चेहरा मराठीत आलाच नाही "

अरुणा अंतरकर

काही काही माणसांबद्दल आपण दुरूनच आडाखे बांधलेले असतात. ' मादक सौंदर्याचा ॲटमबाँब ' म्हणून जिची जाहिरात होते, बिनदिक्कतपणे जी स्टेजवर टॉवेल गुंडाळून येऊ शकते, अशा नटीबद्दल पांढरपेशा म्हटल्या जाणाऱ्या वर्गाचे काय अंदाज असणार ? बस्स्, माझेही तेच समज होते. आणि ' पद्मा चव्हाण ना ? तुफान बोलते. स्वतःबद्दलच बोलते. ' अशा ऐकीव माहितीनं त्यामध्ये अधिकच भर पडलेली. तेवढ्यावरून काही पद्मा चव्हाणबद्दल माझं वाईट मत झालेलं नव्हतं, पण का कोण जाणे, तिला मुलाखतीच्या निमित्तानं भेटावं की नाही याबद्दल मन द्विधा होतं. सगळ्यात मोठी अडचण म्हणजे, ' अनोळखी ' आणि ' आदमी ' हे दोन चित्रपट सोडले तर, मी तिचा कोणताच सिनेमा वा नाटक पाहिलेलं नव्हतं.

अखेर हो–ना करता करता भेट घेतली खरी आणि पहिल्यापासूनच आडाखे चुकायला सुरुवात झाली. " ' माणूस ' मी नेहेमी आवडीनं वाचते हं. " पद्मानं सलामीलाच सांगून टाकलं. ' अरे वा ! ' म्हणून मी थांबले, आणि पद्मा पुढं काय म्हणणार याचा अंदाज करून विनय वगैरे दाखवायच्या तयारीला लागणार, तर तिनं माझी सपशेल जिरवली. धाडकन पुऱ्या केलेला तिच्या वाक्याचा उत्तरार्ध असा : ' त्यातल्या क्रांतिकारकांच्या कथा मला फार आवडतात. '

टीपायवर ' अग्निफुले ' ( किंवा ' अग्निफुले ' असेल ) नावाचं पुस्तक अर्धवट मिटल्या स्थितीत पडलं होतं. ' तुमचं वाचन चांगलं दिसतंय. या वाचनाचा अभिनयकलेसाठी काही खास उपयोग होतो का ?'

' छे: हो ! वाचनाचा कसला आलाय उपयोग ?' पद्मानं स्वच्छ सांगून टाकलं, ' वाचनाचा हेतू वेगळा; अभिनयाचा वेगळा. माझ्यापुरतं बोलायचं तर मी एवढं ' सीरियसली ' वाचत नाही. पण वेळ मिळेल तेव्हा पुस्तक वाचायला मला आवडतं. वाचनात माझं मन तासन् तास रमतं खरं. एखादी चाकोरीबाहेरची कादंबरी अस्वस्थ करून जाते, मनुष्यस्वभावाची आणि आयुष्याची आपली समज ती वाढवून जाते हे मला मान्य आहे अशा चांगल्या कादंबरीच्या वाचनाचा अभिनय वाढवायला जरूर मदत होईल; पण अशा कादंबऱ्या काही रोज रोज जन्मत नाहीत. बहुतेकसं साहित्य थोडा वेळ मजेत जावा म्हणूनच लिहिलं गेलेलं असतं. शिवाय मी आधीच सांगितलं, माझं वाचन खोल नाही. कधी मी ' माणूस ' वाचते, तर कधी कधी मला ' चांदोबा ' वाचायलादेखील आवडतं. वाचनाचं सिनेमासारखंच नाही का ? मला सिनेमा पहाणंही फार आवडतं. त्यातही गंभीर, भावनाप्रधान सिनेमा मला जास्त पसंत पडतो. पण कधी कधी मला ' जुगनु ' नाही तर ' सती अनसूया ' किंवा ' भगवान श्रीकृष्णलीला ' पहायलादेखील आवडतं. '

' आत्ता एवढ्यात कोणता सिनेमा बघितलात ?'

' कालच ' करावं तसं भरावं ' पाहिला. '

' कसा वाटला ?'

' संपूर्णपणे ऐकायला आला ! यशवन्त दत्तचं काम मात्र आवडलं. मनापासून. '

' अलीकडे आवडलेला सिनेमा कोणता ?'

' ' आँधी ' लग्नाच्या वाढदिवसाचा म्हणून ह्यांनी मला ' आँधी ' दाखवला. मी त्यांना त्याची एल. पी. भेट दिली.

' ' आँधी ' का आवडला सांगाल ?'

' गुलजारचे सिनेमे मला नेहमीच आवडतात. मी सहजासहजी रडणारी बाई नाही. सिनेमा पहाताना तर नाहीच नाही. पण ' आँधी 'नं माझ्या नकळत मला रडवलं. अक्षरशः लहान मुलासारखी रडले मी. माझ्या डोळ्यांत पाणी आणणारा आयुष्यातला पहिला सिनेमा ! ' आँधी ' पाहताना, करियर करणाऱ्या प्रत्येक स्त्रीला वाटेल, मीच इथे आहे. संजीवकुमार आणि सुचित्रा सेन यांची कामंदेखील झकास झालीयत. सुचित्रानंतर या रोलसाठी फक्त दोनच नटींचा विचार करता येईल. एक नर्गिस आणि दुसरी– सोफिया लॉरेन. '

' आंधी ' पहाताना तुम्हाला कुठे नेमकं वाटलं की, आपण इथे आहोत ? तुमच्या आणि तोरण्यांच्या संसारात असे मतभेदाचे प्रसंग येतात का ?'

' येतात तर ! म्हणूनच तर ' आंधी ' फार जवळचा वाटला. आताचंच पहा. हे ' ज्योतिबाचा नवस 'च्या कामात दिवसरात्र गर्क होते, आणि ' गुंतता हृदय 'च्या प्रयोगांच्या गर्दीपुढे मला फुरसत नसायची. बरेचदा घरात आमची एकत्र गाठ पडायची नाही; पडलीच तर ' हॅलो–हॅलो 'च्या स्वरूपाची. अर्थातच मग नाराजी, रुसवेफुगवे हे आलेच. पण त्याशिवाय कुणाचा संसार झालाय ?'

पद्माचा रुबाब, तिचं आक्रमक व्यक्तिमत्त्व, तिचा तिनं मिळवलेला पैसा आणि प्रसिद्धी– हे सगळं लक्षात घेता एखादा हीरो वा अन्य क्षेत्रातला श्रीमंत सहचर तिच्या वाट्याला येणं सहज शक्य होतं.

श्री. कमलाकर तोरणे आज मराठीतले नामवन्त आणि यशस्वी दिग्दर्शक आहेत, पण त्यांचं आणि पद्माचं लग्न झालं तेव्हा ते नुकतेच सिनेसृष्टीत आले होते. सौम्य स्वभावाच्या, साध्या रूपाच्या या

दिग्दर्शकाची निवड पद्मानं आपला सहचर म्हणून का केली असेल ? या कुतूहलाला पद्मानं काहीही आडवळणं न घेता उत्तर दिलं. ' माझा हा दिमाख आणि तोरण्यांचा कमालीचा साधेपणा पाहून हा प्रश्न विचारताय ना ? माझ्या मते ' ऑड कॉम्बिनेशन्स ' नेहमीच यशस्वी ठरतात. मला अशी कॉम्बिनेशन्स नेहेमीच आवडतात. हीरोशी लग्न ? शी शी शी ! लग्न करताना माझ्या काही ठाम अपेक्षा होत्या. मला माझ्यापेक्षा वरचढ, आणि खूप शिकलेला नवरा हवा होता. स्वतःची बायको सोडता त्याला कसलंही व्यसन असता कामा नये, हा माझा हट्ट होता. मी ही अशी अशिक्षित, सातवी नापास बाई आणि त्यातच कमालीची लहरी !

(' बॅकवर्ड ' आणि ' व्हिमझिकल '— हे पद्मानं इथं वापरलेले शब्द.) म्हणूनच मला समंजस नवरा हवा होता. नवऱ्यापासून बापाचं, भावाचं आणि नवऱ्याचं प्रेम मिळावं ही माझी अपेक्षा.

' लग्नाबाबत माझी एक विचारसरणी होती. मी माझ्या वडिलांना म्हणायची, माझ्या लग्नाच्या वयातच माझं लग्न तुम्ही करून द्या. तुमच्यासाठी मी पाहिजे तर आणखी पाच सात वर्षं काम करेन. तोरणे सर्व दृष्टींनी माझ्या अपेक्षांचं समाधान करणारे होते. ते एम्. एस्. सी. झाले नाहीत, पण तिथवर जाऊन मग परत आले. फर्स्ट क्लासची करिअर होती त्यांची. त्यांचा सालस स्वभाव मला आवडायचा. माझ्या इच्छेचा मान ठेवून माझ्या कुटुंबासाठी काम करीत राहायची परवानगी त्यांनी मला समंजसपणे दिली.

' तुम्हाला एक गंमत सांगू ? आमचा प्रेमविवाह वगैरे काही नाही. ओळख झाल्यापासून दोन महिन्यांमध्ये आमचा विवाह झाला. आता दोन महिन्यात कसलं आलंय डोंबलाचं प्रेम आणि कोर्टिंग ? आम्ही दोघंही म्हणतो, आमचं लग्न अपघातानं झालं. आणि त्याबाबत पुढाकार घेतला मी. एकदा तोरणे कोल्हापूरला आमच्या घरी आले. एकमेकांशी बोलण्याइतपत आता आमची ओळख झाली होती. मी त्यांना सरळ गाडीत घातले आणि पन्हाळा गाठला आणि तिथे गेल्यावर पहिला सवाल केला तो लग्नाबद्दल. '

'तोरण्यांनी चटकन होकार दिला का ?' —मी.

'तीच तर गंमत आहे ! ' पद्मा सांगू लागली, ' तोरणे एवढंच म्हणाले, ' आईला विचारून सांगतो. ' ' आणि आई नाही म्हणाली तर?' —मी म्हटलं. ' नाही म्हणजे ते ऽऽऽ... त्याचं काय आहे ऽऽऽ... ' तोरणे तत्पप करायला लागले ! क्षणभर मला त्यांचं उत्तर फार झोंबलं. माझा अहंकार डिवचल्यासारखा झाला. मी होऊन विचारल्यावर कोणताही पुरुष होकार देईल असा माझा समज होता. काही मिनिटं गेल्यावर तोरणे म्हणाले, ' पण आई नाही म्हणाली तरी मी या लग्नाला तयार आहे. '

यापुढे पद्मानं जे काही सांगितलं ते वास्तविक गंभीर होतं; पण त्या गोष्टी आहेत म्हटल्यावर त्या ऐकताना हसू आवरणं कठीण होतं. विशेषतः पद्मा ज्या आक्रमक आवेशानं सांगते, त्यामुळं. तिनं आपल्या भावी पतीला चक्क दम भरला : ' हे पहा, काय ते आत्ताच स्पष्ट सांगा. मला फसवलंत तर लक्षात ठेवा, तुम्ही जिवंत राहणार नाही आणि मीही ! '

' खरा घोटाळा यापुढेच आहे ! ' पद्मा हसून म्हणाली, ' हे माझं वक्तव्य सगळं एकतर्फीच चाललं होतं. या सगळ्यात ' मी तुम्हाला पसंत आहे का ? ' हे विचारायचंच राहून गेलं होतं ! ' (...पद्माच्या एकूण आवेशावरून त्या वेळी तोरण्यांना काय, कुणाही पुरुषाला ' नाही ' म्हणण्याचं धैर्य झालं असतं की नाही देव जाणे ! )

पद्माच्या या बोलण्यावरून ती स्त्रीमुक्ती चळवळीसाठी ठाकली आहे वगैरे गैरसमज होऊ देऊ नका. ती लगेच त्यापाठोपाठ म्हणते : ' असली काही फॅडं मला मंजूर नाहीत. स्त्रीला शेवटी लक्ष्मणरेषेतच राहिले पाहिजे. ' घटस्फोट, फारकत वगैरे शब्द ती भलतेच निषिद्ध समजते. ' वाट्टेल तेवढे मतभेदाचे प्रसंग आले तरी संसारात तडजोडीचा मार्ग कधीही बंद नसतो. ' ती ठामपणे सांगते, ' एकदा सात पावलं नवऱ्याबरोबर चालली की स्त्रीला मागं फिरण्याचा मार्ग नाही—तिनं फिरू नये. तुमच्याजवळ लाखोंची मालमत्ता असो, अप्सरेचं लावण्य असो, घटस्फोटित स्त्रीला आजच्या समाजातही कुठे जागा नाही, काही किंमत नाही; पण घटस्फोटापर्यंत वेळ येऊच द्या कशाला ? आपण एकमेकांना हवे आहोत, एवढी नवराबायकोंची खात्री असली की डोंगराएवढे मतभेद असले तरी त्यांचं एकमेकांशी पटतं. शिवाय एखादं मूल संसारात आलं की त्याच्या जबाबदारीची जाणीव नवराबायकोंना मिळतं घ्यायला लावतेच. —हो ! करिअर करणाऱ्या नटीला मूल असू नये वगैरे थोतांडं मला मंजूर नाहीत हं ! मूल होऊ न देणाऱ्यांचं प्रेम फक्त सेक्सवर आधारलेलं असतं असं माझं मत आहे. '

' काही वर्षांपूर्वी तुमची एका विशिष्ट पद्धतीनं जाहिरात व्हायची. ती कधी तुमच्या संसारात अडचण बनली नाही का ? तुम्हाला काय वाटायचं त्या जाहिरातीबद्दल ?'.

' मला काहीही वाटत नाही त्या जाहिरातीबद्दल. तेव्हाही वाटलं नाही. '— पद्मा शान्तपणे उत्तरली, ' काही वाटायला मला चॉइस तर हवा ना ? समजा, मी जाहिरात देणाऱ्यांना म्हटलं असतं, नका हो मला ॲटमबॉंब वगैरे बनवू, तर माझं कोण ऐकणार होतं ? आणि असं म्हणायचा माझा हक्क काय ? मी पोटासाठी नाटका—सिनेमात आले. खानदानी श्रीमंती भोगल्यानंतर, भुईत गाडून टाकणारी गरिबी आमच्या कुटुंबाच्या वाट्याला आली होती. काय वाट्टेल ते करून पोटासाठी पैसे मिळवणं तेव्हा प्राप्त होतं. माझ्याजवळ शिक्षण नव्हतं. येऊन जाऊन माझं भांडवल म्हणजे माझं रूप ! मला ठाऊक होतं, मी सुंदर आहे. माझ्या सगळ्या गुणदोषांसकट मी स्वतःला पूर्ण ओळखणारी बाई आहे. उगीच का मी गेली चौदा वर्षं इथे टिकून आहे ? एक सांगते : त्या जाहिरातीनं माझं काही वाईट केलं नाही. ' ॲटमबॉंब ' ही काही शिवी नव्हे, की मला ॲटमबॉंब म्हटल्यानं मी पेटणार नव्हते. त्या जाहिरातीनं माझ्या गरजेच्या वेळी मला पैसा मिळवून दिला त्या पैशाचं मी अन्न खाल्लं; माझ्या कुटुंबाला त्यातून जेवू घातलं. त्या पैशावर मी माझ्या वडिलांना नाटककंपनी काढून दिली आणि त्या पैशातूनच माझ्या भावांची शिक्षणं

झाली. मग मी त्या जाहिरातीबद्दल कमीपणा का बाळगावा ? भल्याभल्यांच्या नाटकात अर्वाच्च शिवीगाळ ऐकण्यापेक्षा का अॅटमबॉंब म्हणवलं जाणं वाईट होतं ?'
' या जाहिरातीचा समाजात वावरताना कधी त्रास झाला ?'
' नाही. कधीच नाही. कारण एकदा नाटक संपलं की आपलं नटीपण संपलं याची मला जाणीव असे. समाजात मी कधीही नटी म्हणून वावरलेली नाही. समाजातल्या माझ्या वागणुकीत किंवा सेटवरच्या अथवा नाटकांच्या तालमीच्या वेळच्या वागणुकीत मी कधीही डिग्निटी सोडून वागलेली नाही. आपला मान आपण ठेवून घ्यायचा असतो. आपण बरं–आपलं काम बरं, ही माझी नेहमीची वृत्ती आहे. मी थिल्लरपणानं, उथळपणानं वागत राहिले, तर अॅटमबॉम्बची उपाधी मागे नसती तरी लोकांनी माझी योग्य संभावना केली असती; पण मी अभिमानानं सांगते, अशी वेळ माझ्यावर कधीही आली नाही.
' त्या अॅटमबॉम्ब विशेषणापासून मात्र माझी सुटका दिसत नाही. या ' गुंतता हृदय हे ' नाटकाच्याच वेळची गोष्ट. काही वेळा अजूनही त्याच्या परगावच्या जाहिरातीत माझा अॅटम बॉम्ब म्हणून उल्लेख असतो. आता या नाटकातल्या कल्याणीच्या स्वभावाचा आणि त्या विशेषणाचा काही तरी मेळ बसतो का ? पण काहीकाही गोष्टी अशा असतात, की त्या तुम्हाला येऊन चिकटल्या म्हणजे चिकटल्या ! त्यांच्यापासून सुटका नाही.'
या प्रकारच्या जाहिरातीबद्दल तोरण्यांना काय वाटत होतं ? निदान लग्न करण्यापूर्वी काय वाटलं होतं ?
'प्रथम ती जाहिरात मला खटकायची खरी.' तोरण्यांनी कबूल केलं, ' पद्माचीच काय, कुणाच स्त्रीची अशी जाहिरात मला रुचणार नाही. पण केवळ समाजाला घाबरून पद्माशी लग्न करण्याचा विचार सोडायला मी तयार नव्हतो. अखेर ते विशेषण ही जाहिरात होती; ती पद्माच्या स्वभावाची जाहिरात नव्हती. पद्माशी ओळख होत गेली, तेव्हा तिचा पिंड मला समजून आला. त्या जाहिरातीचं मग बाऊ करण्याचं मला कारण दिसेना.
' माझ्या मते, त्या उपाधीतून मी सुटका करून घेतली आहे. स्वतःची स्वतःपुरती तरी. मला हवा होता तेवढा पैसा मिळाल्यावर, सिनेमा-नाटकातल्या भूमिका निवडून घेण्याचा प्रयत्न मी चालवला– पद्मा.
' तुम्ही स्टेजवरून निवृत्त होणार हे खरं का ?'
' होणार का ? मी तिथून निवृत्त झालेदेखील. काही काळापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत मी सांगितलंच होतं, एकोणिसशे पंचाहत्तर साली मी स्टेजवरून निवृत्त होणार. आता पंचाहत्तर साली मी म्हणते आणखी तीन वर्षांनी मी पडद्यावरूनही निवृत्त होईन. एकदम अभिनयसंन्यास. ' पद्मानं हे अगदी ठासून सांगितलं.
' परत यायचा मोह टाळता येईल ?
' गुंतता हृदय हे 'नं तुम्हाला कीर्ती मिळवून दिली. कदाचित यापुढेच खऱ्या चांगल्या भूमिका तुम्हाला मिळतील. चांगल्या लेखकांचं, दिग्दर्शकाचं तुमच्याकडे लक्ष गेलं आहे, त्याचा फायदा मिळायची हीच संधी नाही का ? गुणवत्तेचा विचार केला तर मराठी नाटक सध्या मराठी सिनेमाच्या कितीतरी पुढे आहे. आता स्टेजवर काम करण्यात तुम्हाला विशेष आनंद मिळणार नाही का ?'
' नाही. ' पद्माचं थंड उत्तर– ' गुंतता हृदय हे ' हा माझ्या स्टेजवरच्या आयुष्यातला शेवटचा टप्पा होता. त्याहून मोठी उंची मी कधी गाठू शकले नसते. माझ्या मर्यादा मला पूर्णपणे ठाऊक आहेत. ' गुंतता... ' ताच कल्याणीला माझ्यातलं जेवढं देता येणं शक्य होतं तेवढं मी दिलं. कलावंत किती काळ किती काम करतो आणि किती काळ करतो याला महत्त्व नाही. महत्त्व आहे तो काय ग्लॅमरनं करतो याला. '
' ग्लॅमरला तुम्ही एवढं मानता ?'
' हो तर ! ग्लॅमरशिवाय नटी असूच कशी शकेल ?' पद्मानं प्रश्न विचारता विचारता उत्तरही स्वतःच देऊन टाकलं होतं.
'आजवर मी दिमाखानं स्टेजवर वावरले. ' हाउसफुल ' थिएटर पहायची मला चटक लागली आहे. मी चांगलं काम करत्येय– पण प्रतिसाद द्यायला पुरेसे प्रेक्षक नाहीत हे मी सहनच करू शकत नाही. गर्दी हेच माझ्या अभिनयाचं यश आहे. गर्दीविना माझा अभिनय गुदमरून जाईल आणि माझं ग्लॅमर कमी झालं की गर्दी कमी होणारच. ते बघण्यापेक्षा मी स्टेजपासून दूर रहाणं पत्करेन. ' अरेरे ! बिचारीला अजून कामं करावी लागतात ' अशी केविलवाणी सहानुभूती किंवा ' या आता निवृत्त का होत नाहीत ' असली आशाळभूत विचारणा वाट्याला येणं मला खपणार नाही. त्यापेक्षा वैभवशाली गतकाळाच्या आठवणींवर गुजराण करणं मला एक हजार एक टक्के रुचेल. आता माझ्यासाठी म्हणून मुद्दाम भूमिका लिहिली गेली तरी मला ती नको. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात त्याचा म्हणून एक दिवस येतो. ' गुंतता 'नं माझा दिवस मला दिला. त्या तृप्तीतच मी आता स्टेज सोडणार !'
ग्लॅमर हे आजकाल सारं काही मानलं जात नाही, ग्लॅमर हा जिथे प्राण समजला जायचा त्या हिंदी पडद्यानंसुद्धा काही अन्–ग्लॅमरस चेहेरे स्वीकारले नाहीत का ?
या प्रश्नाला पद्माचं उत्तर : ' एखादी जया भादुरी यशस्वी ठरली असेल. सगळ्या काही जया भादुरी ठरणार नाहीत. (सात्त्विक संतापानं) काय हो, या अलीकडच्या हिंदी-मराठीतल्या हीरॉइन्स ! यांना कोण हीरॉइन म्हणेल ? दुर्गाबाई खोटे आज साठीच्या वयातदेखील अशा रुबाबात वावरतात, की त्या नुसत्या आल्यावरच लोकांची नजर समजते– हीरॉइन आली ! '
पद्माच्या या विधानावरून सुचलेला प्रश्न : ' मराठीत फारसे नवे तरुण चेहरे दिसत नाहीत, याचं कारण काय असावं ?'
' आपल्या लोकांकडे बुद्धि आहे, गुण आहेत, संस्कार आहेत, पण धाडस नाही. चांगल्या मराठी घराण्यातली मुलं-मुली अद्याप सिनेमाकडे यायला साशंक दिसतात. कारण आपल्या समाजानं नटमंडळींना अजून म्हणावं तसं सामावून घेतलेलं नाही. पंजाबी समाजानं मात्र नटमंडळींना हक्काची जागा दिलेली दिसते. तसे आशा वाटणारे चेहेरे अधूनमधून मराठी सिनेमात दिसतातही; पण त्यांच्याजवळ सातत्य नसतं, आपल्या करी-

अरची व्यवस्थित आखणी करण्याचं चातुर्य त्यांच्याजवळ दिसत नाही. मला आव्हान देणारे, ' महाराष्ट्राची प्रति मेरिलीन मन्रोवर ताण करण्याची ईर्षा दाखवणाऱ्या अनेक तरुण नटी आल्या आणि गेल्या. त्या गेल्या— मी आहे तिथेच आहे. सबंध चित्रपट आपल्या खांद्यावर वाहून नेणारी मराठी नटी आज मला तरी कुणी दिसत नाही. सुंदर चेहेऱ्यांची परंपरा जणू संपली आहे; जयश्री गडकर-सारखा अष्टपैलू अभिनय करणाऱ्यांची परंपरा जणू संपली आहे. '

' भारतीय स्त्री ' या कल्पनेप्रमाणेच ग्लॅमर ही कल्पना पद्माच्या मनात तीव्रपणे आहे. दोन्ही शब्दांचा ती वारंवार उच्चार करते; पुरस्कार करते. ग्लॅमर संपलेली नटी जिवंत असून मेल्यात जमा, या जॉन क्रॉफर्डच्या मताशी तिचं पूर्णपणे सहमत आढळतं हे नवल नव्हे.

पद्माचं कोणतंही मत कोणत्याही गोष्टीबद्दल असो, ती ते ठामपणे, खणखणीतपणे मांडते. मग आपल्याला ते पटो की न पटो. कोणत्याही बाबतीत हात राखून बोलणं वा लपवाछपवी करण्याची वृत्ती नाही. ' गुंतता हृदय हे ' मधे मी काशीनाथ घाणेकरांना सरस ठरले, हे ती ताठपणे सांगते. काशीनाथजवळ दुसऱ्याचा मोठेपणा सहन करायची शक्ती नाही, प्रेक्षकांची टाळी मिळवण्यासाठी तो इरेला पेटतो, अभिनय ही काही दुसऱ्याला खाण्यासाठी निर्माण झालेली वस्तू नव्हे, नाटक ही सांघिक कला आहे याचं त्याला भान नसतं इ. इ. विधानं ती निर्भीडपणे करते.

' माझ्यानंतर सुंदर चेहरा मराठीत आलाच नाही ' हे ती सांगते आणि आपल्या मर्यादाही कबूल करते. ' मी सुंदर दिसते; पण मी सगळ्या भूमिकांमधे शोभत नाही. उदाहरणार्थ तमासगीर नर्तकीच्या भूमिकेला माझं व्यक्तिमत्त्व आड येतं ' हे ती स्वतःच सांगते.

' आदमी ' या चित्रपटात तिनं दिलीपकुमार आणि वहीदा रहमान यांच्याबरोबर काम केलं होतं. त्या काळातली एखादी विशेष आठवण विचारली, तर आधी ती ' वहिदा दिलीपकुमारवर छाप मारायचा प्रयत्न करायची; पण दिलीपकुमारला फक्त तिनं आणलेल्या जेवणाच्या डब्यात इंटरेस्ट असायचा 'असली चविष्ट पण संदर्भहीन माहिती पुरवते. मग खुद्द दिलीपकुमारबद्दलच काही विचारलं तर ती सांगते, ' त्या माणसाजवळ जबर आत्मविश्वास आहे; पण त्यानं स्वतःला ओळखलेलं नाही. तो कमालीचा जबरदस्त नट आहे. पण दिग्दर्शन करायला जातो आणि तिथेच फसतो. मेहबूब, बिमलरॉय वगैरे लोकांनी त्याला बरोबर ओळखलं होतं आणि त्याच्यातलं बेस्ट काढून घेतलं होतं. आता मात्र तो फार गोंधळल्यासारखा वाटतो. अर्थात माणूस म्हणूनही तो फार चांगला आहे. सहकार्यवादी आहे. ' मराठी नटी इतक्या हुशार असतात, की त्यांना फारसा अभिनय शिकवावाच लागत नाही ' असं तो नेहमी म्हणायचा.

' आदमी 'नंतर हिंदी सिनेमाकडे पाठ का फिरवली ? '

' मला किरकोळ भूमिका करायच्या नव्हत्या. ' पद्मानं ' खुलासा केला : ' हिंदीतल्या छोट्या-छोट्या भूमिकांमागे लागलं, की स्टेजवरच्या नाही तर मराठी सिनेमातल्या करीअरचा सत्यानाश ठरलेलाच ! इकडे मराठीत आपण राणीच्या रुबाबात वावरायचं आणि हिंदीत दासी-बटकीच्या भूमिका करायच्या हे कुणी सांगितलंय ? हिंदीकरता नावबिव बदलणंदेखील मला साफ नामंजूर आहे. हिंदीत जर बच्चन, भादुरी नि खन्ना ही नावं चालतात तर चव्हाण नाव चालायला काय हरकत आहे ?'

' आता मराठीच्याबरोबर हिंदीतही काम करणार ना ? तेवढ्यासाठी तीन वर्षांची मुदत पुरेल ?'

' मराठीबरोबर हिंदीत कामं करणारच आणि येत्या तीन वर्षांतच काय मिळवायचं ते मिळवणार. ' हे उत्तर ठसक्यात येणं अपेक्षितच होतं. ' मी सांगितलं ना मघाशी, आपलं ग्लॅमर असेतोवरच काम करायचा माझा निश्चय आहे. मला सांगा, नर्गीस नाही म्हणून हिंदी सिनेमाचं आज काय नडलंय ? लोक आपले म्हणतात, नर्गीस ' आज हवी होती. पण काय करणार होती नर्गीस आज ? ती आता पडद्यावर येत नाही म्हणूनच लोक तिची अशी हुरहुरती आठवण काढतात. त्यातच कलावन्ताच्या आयुष्याचं सार्थक आहे. मला नर्गीस-मीनाकुमारीचं नि नूतनचं, आमच्या सुलोचनाचं नि जयश्री गडकरचं आयुष्य नटी म्हणून दोनच दिवस जगायला मिळालं तरी चालेल. पण जे दोन दिवस येतील ते त्यांच्या कारकीर्दीसारखे असावेत. ते दोन दिवस मी भाग्याचे समजेन. '

नर्गीस, मीनाकुमारी, सुचित्रा सेन, गुरु दत्त, बलराज सहानी ही नावं निघाली की पद्मा एरवीची शहाणीसुरती व्यवहारचतुर स्त्री वा ख्यातीप्राप्त नटी राहत नाही. मग ती तुमच्याआमच्यासारखी साधी प्रेक्षक बनते आणि सगळा रोखठोकपणा विसरून उमाळ्यानं बोलते. ' माझ्या घरी तुम्हाला माझ्याशिवाय एकाच नटीचा फोटो आढळेल—मीनाकुमारीचा. ' ती उत्साहानं सांगेल, ' जिच्याकडे रूप आहे, ग्लॅमर आहे, साधेपणा आहे तरी रुबाब आहे, सेक्स अपील आहे आणि अभिनय आहे, अशी ती दुर्मिळ कलाकार होती. प्रेक्षकांतल्या वडिलांना ती मुलगी वाटायची, भावाला बहीण वाटायची, पुरुषांना प्रेयसी आणि स्त्रियांना मैत्रीण वाटू शकायची, हे तिच्या यशाचं रहस्य होतं. '

आय. एस. जोहरच्या ' कीर्ती 'मुळे आपण त्याच्यापासून दहा हात दूर असायचो; पण प्रत्यक्षात तो भेटला तेव्हा अतिशय ' डीसेंट ' असल्याचं आढळलं, हे कबूल करायला पद्माला कमीपणा वाटत नाही. ' आम्ही


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

जातो आमच्या गावा 'ची (दिग्दर्शक : अर्थात कमलाकर तोरणे) 'तीन चोर' ही हिंदी आवृत्ती अगदीच फडतूस होती, हे तुमचं खरंखुरं मत असेल तर ऐकवा, पद्मा दिलखुलासपणे दाद देईल. हिंदी सिनेसृष्टीत डॉ. श्रीराम लागू आणि पद्मा चव्हाण ही फक्त दोनच नावं मराठीतली बडी नावं म्हणून माहीत आहेत, हे सांगताना चेहऱ्यावरला आनंद लपवण्याचा वा खोटा विनय दाखवण्याचा ती चुकूनही प्रयत्न करणार नाही. डॉ. लागू आणि निळू फुले आणि त्या दोघांचं 'सामना 'मधलं अभिनयद्वंद्व याबद्दल किती बोलू न् किती नाही असं तिला होऊन जाईल.

'जिंदा दिल 'मधे आपण प्राणबरोबर काम करतो आहोत हे सांगताना, त्यातल्या एका 'रिस्की शॉट 'साठी (मोटारअपघाताच्या) आपण 'डबल ' न वापरता स्वतः काम केल्याचा अभिमान ती छपवून ठेवणार नाही. जाता जाता 'जिंदा दिल 'चा दिग्दर्शक सिकंदर खन्नाचं ती तोंडभर कौतुक करून जाईल आणि हळूच सिकंदर खन्ना नसल्यामुळे मनोजचे हल्लीचे सिनेमे बंडल वाटतात, ही 'अंदरकी बात 'ही सांगून टाकेल. (सिकंदर खन्ना हा 'उपकार 'च्या वेळी मनोजचा प्रमुख सहाय्यक होता.) पद्मा कदाचित जास्त बोलणारी असेल. माझी त्याबद्दल तक्रार मुळीच नाही. अशी माणसं हमखास चांगली मुलाखत देतात. किती तरी उच्च विद्याभूषित वा 'फॉरेन रिटर्न्ड ' हिंदी नटींपेक्षा पद्माजवळ सरस संभाषणचातुर्य आहे. (तिचे मॅनर्सही त्यांच्यापेक्षा उजवे आहेत.) अस्खलितपणे तासनं तास ती इंटरेस्टिंग गप्पा मारू शकते. तिची पुन्हा एखादी भेट घ्यावी, एवढं औत्सुक्य तिनं माझ्यापुरतं निर्माण केलं आहे खचित. ■

## राजेशमहिमा

बंगलोरमधे एका सिंधी धनिकानं नुकतंच एक अलिशान हॉटेल उभारलं आहे. एन्. गंगाराम–प्रस्तुत हॉटेलमालक–हा राजेश खन्नाचा निस्सीम चहाता आहे. त्यामुळे त्याच्या हॉटेलभर जळीस्थळीकाष्ठीपाषाणी राजेश खन्नाच भरून राहिलेला आढळेल. त्याच्या या हॉटेलचं नाव आहे 'हॉटेल आविष्कार.' हॉटेलच्या कॉन्फरन्स हॉलचं नाव आहे आनंद. विवाहसमारंभासाठी राखून ठेवलेल्या खास हॉलचं नामकरण 'आशीर्वाद ' करण्यात आलं आहे. ('आशीर्वाद ' हे राजेशच्या बंगल्याचं नाव.) हॉटेलचा शाकाहारी डायनिंग हॉल 'आराधना ' म्हणून ओळखला जातो, तर, मांसाहारी 'अमर प्रेम ' म्हणून. हॉटेलला स्वीमिंग पूल आहे किंवा नाही, आणि असल्यास त्याचं नाव 'डिंपल ' आहे किंवा कसे, ही माहिती अद्याप हाती आलेली नाही. एक मात्र संभवतं, या अलिशान हॉटेलमधल्या जेवणाचं आणि निवासाचं बिल हाती येताच 'कटी पतंग ' म्हणत मंडळी राजेश–आख्यानाचा उचित शेवट करीत बाहेर पडत असतील.

'तुम्ही लोक कलाकारांना एका मूडमधून दुसऱ्या मूडमधे शिरण्याच्या सफाईबद्दल धन्यवाद देता तेव्हा तुम्ही स्वतःचा त्यातला भाग विसरलेले असता ! मी तर म्हणेन, आम्हा कलाकारांइतकाच भारतीय प्रेक्षक देखील मूड बदलण्यात आणि प्रसंगाशी जमवून घेण्यात वाकबगार आहे.' प्रेक्षकांचं इतकं भान ठेवणारी माला सिन्हा ही बहुधा पहिली कलाकार असावी. टेलिव्हिजनवरच्या मुलाखतीत आपल्या या मुद्द्याचं स्पष्टीकरण देताना ती म्हणाली, 'आमच्या जमान्यात कथा आणि स्वभावचित्रण या बाजू भलत्याच पसरट असायच्या. औचित्याचा भाग त्यांमध्ये कमीच असायचा. वानगीदाखल सांगायचं तर, एका चित्रपटात मी डॉक्टरीण होते. रोग्यांची सेवा करता करता मला मधेच एकदा पंजाबी भांगडाही करावा लागला होता. एखाद्या पेशंटच्या मनोरंजनासाठी नव्हे हं ! आमच्या पंजाबी डिस्ट्रिब्यूटरचा हट्टच होता की, पिक्चरमधे एक तरी भांगडा पाहिजेच. म्हणून डायरेक्टरनं तो घातला. झालं ! मुळात कथा इतकी गंभीर वळणाची होती, की हा भांगडा अगदीच हास्यास्पद वाटतोय हे आम्हा सर्वांनाच जाणवत होतं. पण नाइलाज होता. तो भांगडा तसाच सिनेमात ठेवला गेला. अशा अवघड प्रसंगी आमच्या मदतीला प्रेक्षक धावून येतात. आम्हाला पुढच्या प्रसंगासाठी मूड बदलायचा असेल तर अवधी तरी मिळतो, पण प्रेक्षकाला एका क्षणाचीही फुरसत मिळत नाही. तरीसुद्धा कथेतल्या प्रसंगाच्या मूडशी स्वतःचा मूड जमवून घेत ते सिनेमाचा आनंद लुटतात.' ■

## अष्टपैलू (!) दाक्षिणात्य नट

हिंदी सिनेमातल्या नटांच्या लहरी आणि मिजाशींबद्दल वरचेवर गाजवण्याच्या त्यांच्या बादशाही वृत्तीबद्दल बरंच काही उलटसुलट ऐकू येत असतं; पण त्यांचे दाक्षिणात्य भाईबंद याबाबत त्यांच्यावर ताण करून आहेत, याची कल्पना नव्हती. ताज्या 'फिल्मफेअर ' मधे प्रसिद्ध झालेलं, मद्रासच्या श्री. टी. के. अब्दिल मजीद यांचं पत्र रंजक आणि उद्बोधक ठरावं. आपल्या पत्रात त्यांनी म्हटलं आहे,–

'कोण म्हणतं हिंदी कलाकार अहंकारी नि आत्मकेंद्री आहेत ? ' रोटी, कपडा और मकान ', ' दीवार ', ' प्रेमकहानी '– अशा किती तरी चित्रपटांमध्ये बडे कलाकार एकमेकांबरोबर काम करताना दिसतात. तेच आमच्या दाक्षिणात्य कलाकारांचं पाहा ! ते अहंकारशिरोमणी आहेत. आपल्यासमोर दुसरा नामवन्त कलाकार ते सहनच करू शकत नाहीत.

'बेईमान ' च्या तमिळ आवृत्तीचं उदाहरण पाहा. शिवाजी गणेशननं त्यात मनोजची आणि प्राणचीही भूमिका केली आहे. मूळ कथेत हे अपेक्षित आहे काय ?' जंजीर ' च्या तामिळ अवताराची तीच तऱ्हा. एम्. जी. रामचंद्रननं त्यात अमिताभ बच्चनची आणि प्राणची भूमिका एकाच वेळी वठवण्याचा चमत्कार करून दाखवला आहे आणि हे कमी वाटतंय म्हणून की काय, 'यादोंकी बारात ' च्या तमिळ आवृत्तीत तो हिंदी आवृत्तीतल्या धर्मेंद्र आणि विजय अरोरा यांनी केलेल्या भूमिका करणार आहे. याबाबत अशीही वदंता आहे की, सदर चित्रपटाचा ('यादोंकी बारात ' च्या तमिळ आवृत्तीचा) निर्माता एका अशाच (दाक्षिणात्य) नटाला या भूमिकेबद्दल विचारायला गेला तर या नटवर्यांनी धर्मेंद्र-विजयचीच नव्हे, तर तारीकचीही भूमिका करण्याचा हट्ट धरला म्हणे. नशीब, झीनत अमानतची भूमिकादेखील आपण करू, असा हट्ट त्यानं धरला नाही !'


–मद्रासी चित्रपटांना खिचडी का म्हणतात ते आता कळलं ना मंडळी ?

–आणि हो ! 'नवरात्री ' त शिवाजी गणेशनकरता नऊ भूमिका का लिहिल्या गेल्या असतील, या रहस्याचाही खुलासा आता समाधानकारक होतोय ना ? ■ ■

# दो जासूस

मधील दो प्रेमी......
शैलेन्द्र सिंग आणि भावना भट्ट

'दो जासूस' की तीन जासूस ?
राजेन्द्रकुमार आणि राजकपूर
यांच्या मध्ये उभे आहेत
'दो जासूस'चे दिग्दर्शक नरेशकुमार



## लव्ह इन काश्मीर ?

'जख्मी'ची प्रौढ प्रणयी जोडी
सुनील दत्त आणि आशा पारेख






सुखी संसार - अव्वल मद्रासी
फॅमिली फिल्म स्टाईल !
मंजुळा आणि राकेश पांडे
'जेमिनी'च्या
'एक गावकी कहानी' मध्ये



नव्या वाटेकडे -
आणखी एक पायरीवर.
पतितोध्दाराचं प्रतीक ?
धर्मेन्द्र आणि सायराबानू
बिमल राय प्रॉडक्शन्स'च्या
'चैताली' मध्ये.
'चैताली' आता प्रकाशनाच्या
वाटेवर आहे.



"मला अभिनय येत नाही - येत नाही -
येत नाही म्हणून त्रिवार ओरडणारांकडून,
मला अभिनय येऊ लागल्याची पावती
मिळवूनच मी रंगभूमीचा निरोप घेतलेय.
ताठ मानेनं." इति पद्मा


पद्मा चव्हाण - १९७५ !

श्री कमलाकर तोरणे आणि पद्मा
छोट्या प्रियासह

# कुस्ती

सर्वसाधारण अजिंक्यपदाचा मान सेनादलाला मिळाला. त्यासाठी त्यांना लढावे तर लागलेच पण भांडावेसुद्धा! सुस्पष्ट नियमांचा अभाव आणि दिल्लीकरांची दादागिरी दूर होत नाही तो पर्यंत हे असेच चालणार





अशा आकर्षक लढती संपूर्ण स्पर्धेत अपवादानेच आढळल्या. एरवी औपचारीक पध्दतीनेच ही स्पर्धा पार पडली.




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**